
# ॥ श्री गुरुदेवदत्त ॥



******************************

**∗ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ ∗**

संदर्भ: प्रयाग, प.पू. श्री दत्त महाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ | (संकलन व लेखन- श्रीमती नीला कृष्ण जोशी)


प्रकाशन- श्री वासुदेव निवास, पुणे.

https://vasudevniwas.org/shree-dattatraya-kavishwar-maharaj/


******************************************

# * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-१ *

कवीश्वरांची कुलपरंपरा

कवीश्वर घराण्याचा पूर्व इतिहास अत्यंत उज्ज्वल आहे. पूर्वजांची खडतर व तीव्र तपश्चर्या श्रेष्ठ दर्जाची आहे. त्यामुळे या घराण्यावर श्रीगणपती व श्रीदत्त या उभय देवतांचा कृपाप्रसाद झाला आहे.

वे. शा. सं. दादा दीक्षित, श्री.बाळकृष्ण शास्त्री, श्री भालचन्द्र उर्फ दाजी दीक्षित, श्रीवक्रतुंडमहाराज, श्रीधुंडीराजमहाराज व श्रीदत्तमहाराज अशी ही विद्वानशास्त्री व उपासकांची अखंड परंपरा. वैदिक प्राच्य संस्कृत विद्या, श्रौत-स्मार्त योगानुष्ठान, मंत्रतंत्रशास्त्र, महाभारत, भागवत इत्यादींवर प्रभुत्व असलेल्या, ईशसेवेत रममाण होणाऱ्या, ईश्वरी वरदान पावलेल्या, पवित्र, पंडित व थोर नामवंत शास्त्री घराण्यांमधील श्रीदत्तमहाराज!

श्रीदत्तमहाराजांचे घराणे मूळचे नगरजवळील मांडवगण येथील असून त्यांचे गोत्र 'उपमन्यू' व आडनांव 'सप्तर्षी' असे होते. नंतर यांची एक शाखा वाईस आली. प. पू. श्रीदत्तमहाराज यांचे पणजोबा श्री. दाजी दीक्षित यांचा रामायण, महाभारत या ग्रंथांचा फार चांगला व्यासंग होता. सातारा दरबारात धर्मशास्त्राच्या प्रश्नावरील निर्णयासाठी वाईच्या पंडितांना मुद्दाम निमंत्रण येई. श्री. दाजी दीक्षित हे व्युत्पन्न पंडित व धर्मशास्त्रांत पारंगत असल्याने त्यांना प्रामुख्याने निमंत्रण येत असे. असाच एकदा एक ग्रामण्य प्रश्न निघाल्यावर ह्यावर दरबारमान्य निर्णय देण्याचा प्रसंग टाळण्यासाठी श्री. दाजी दीक्षित यांनी वाई सोडली. घोड्यावरून नरसोबाचे वाडीस आले. ते तेथेच राहिले. केवळ धर्मनिष्ठेकरिता केलेला असा स्थानत्याग आजकाल दुर्मिळ आहे.

श्री नरसोबाचे वाडीला श्री. दाजी दीक्षित यांनी श्री. दत्तात्रेयांची उत्कृष्ट उपासना केली. जपजाप्य, अध्यात्मचिंतन, श्रीगुरुचरित्राची पारायणे व दत्तसेवा यात ते दंग असत. रोज पाच श्लोक रचत. ती स्तुति-सुमने श्री दत्तांच्या चरणी अर्पण करण्याचा त्यांचा परिपाठ नित्य होता. त्यांच्या उत्कृष्ट व प्रासादिक काव्यप्रतिभेवरून लोक त्यांना 'कवीश्वर' म्हणू लागले. तेच नाव पुढे प्रचलित झाले.

श्री. दाजी दीक्षितांच्या पत्नी सौ. सगुणाबाई या आदर्श पतिव्रता व धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. पतीच्या आज्ञेवरून, त्या वाडीस श्री.दत्तांस, औदुंबर पादुकांना, दररोज १०८ प्रदक्षिणा घालून जप करीत असत. त्याचे पर्यवसान त्यांना महान भगवद्भक्त सुपुत्र प्राप्तीत झाले. शके १७६१ मध्ये आश्विन संकष्टी चतुर्थीला त्यांना पुत्ररत्न झाले. सर्वत्र आनंद पसरला. तेच हे आपल्या प. पू. श्रीदत्तमहाराजांचे -आजोबा श्रीवक्रतुंडमहाराज होत.

श्रीवक्रतुंडमहाराज वाडीला रहात असत ते दत्ताला पुत्रवत् मानीत असत.

दत्तात्रय हाच आपला बाळ । असे समजून केला वत्सलतेने सांभाळ॥

त्यांचा जास्त उपासनेचा काळ नारायणस्वामींच्या देवळात जी श्रीदत्तात्रेयांची उत्सवमूर्ती आहे तिथे जाई. वक्रतुंडमहाराजांवर सरस्वतीचा मोठा वरदहस्त होता. महाभारत व भागवतावर ते फार उत्तम प्रवचने करीत. हजारो श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत असत. त्यांचे प्रवचन प्रभावी होई.  वाडीला गोविंदशास्त्री नावाचे एक फार मोठेसत्पुरुष होते. त्यांची श्रीवक्रतुंडमहाराज मन लावून सेवा करीत. श्रीवक्रतुंडमहाराजांची संतती जगत नसे. त्यामुळे ते चिंतातुर होते. एक दिवस त्यांनी संन्यास घेण्याचे ठरविले. मला संन्यास द्या असा श्रीगोविंदस्वामींजवळ हट्ट धरला. श्रीगोविंदस्वामींनी त्यांना त्याविचारापासून परावृत्त केले. ते म्हणाले, "तुम्हाला मुलगा पाहिजे ना, मग संन्यास घेऊन कसे चालेल? तुम्ही चिंता करु नका. हा घ्या दत्तूबाळ!" असे म्हणून आपल्याजवळील दत्ताची मूर्ती त्यांना दिली. श्रीवक्रतुंडमहाराजांचा कंठ भरुन आला. डोळ्यातून अश्रू सुरु झाले. त्यांनी मोठ्या प्रेमाने त्या दत्तमूर्तीला जवळ घेतले. "दत्तूबाळ, दत्तूबाळ" असे म्हणून खरोखरच आपल्या मुलाप्रमाणे हाक मारू लागले.

या दत्तूबाळाची पाठ भाग्याचीच. सौ. सावित्रीबाईंची दत्तसेवा अधिक जोमाने सुरु झाली. त्या रोज पहाटे देवाच्या कट्ट्यावर जात. देवाला पाचशे प्रदक्षिणा तरी त्या घालत असत. सातत्याची सेवा त्यांच्या फळाला आली. ईश्वरभक्तीपरायण असा कुलदीपक मुलगा परमेश्वरांनी त्यांना दिला. तेच श्रीदत्तमहाराजांचे पिताजी श्री धुंडिराजशास्त्री होत. श्री वक्रतुंडशास्त्री व त्यांच्या पत्नी दत्तूबाळाबरोबर या झालेल्या मुलाला सांभाळीत.

क्रमश:

**************************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-२ *

कवीश्वरांची कुलपरपंरा

श्री धुंडिराज शास्त्र्यांचे बालपण वाडीला गेले. त्यांचे सारे शिक्षण श्रीकृष्णशास्त्री वष्ट यांच्याजवळ इंदूर येथे झाले. श्री धुंडीराजशास्त्र्यांनी न्यायशास्त्रावरील ग्रंथांचा अभ्यास पूर्ण केला होता. श्रीमत् वासुदेवानंदांचा श्री धुंडिराजशास्त्र्यांवर फार लोभ. वाडीला स्वामीमहाराज चारचार महिने असत. तो सहवास श्री धुंडिराजशास्त्र्यांना खूप लाभला होता. वाडीमध्ये श्रीधुंडिराजशास्त्र्यांनी  संस्कृत पाठशाळाही सुरु केली होती.

श्री धुंडिराजशास्त्रींचा विवाह वयाच्या १८ व्या वर्षी सिरहट्टी येथील श्री गोपाळराव हणमसागर यांची कन्या गंगुबाई यांचेशी झाला. त्यांचे नांव सासरी सरस्वतीबाई असे ठेवण्यात आले. दैवगती काय असते कुणास ठाऊक! श्री वक्रतुंडशास्त्री व त्यांची पत्नी सावित्रीबाई यांनी खूप तपस्या केल्यावर त्यांना श्रीधुंडिराजमहाराज लाभले. आता श्री धुंडिराजमहाराजांनाही संतती नव्हती. त्यामुळे सौ. सरस्वतीबाई दुःखीकष्टी होत्या.

श्रीधुंडिराजमहाराजांनी श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामींना पत्र लिहिले. श्रीस्वामींनी, धर्म-सिंधूत सांगितलेल्या मंत्राचा जप, विधीविधान, होमहवन त्यांचेकडून करून घेतले. आईवडिलांनी केलेल्या देवाच्या सेवेचा संस्कार हा आईवडिलांनी मुलाला दिलेला फार मोठा संस्कार ठरला ज्या संस्कारातून कुटुंबाचा, समाजाचा देशाचा अभ्युदय होईल असा कुलदीपक जन्माला आला.

सौ. सरस्वतीबाई याही आपल्या सासूबाईंप्रमाणे वाडीला प्रदक्षिणा घालीत. त्या सासूबाईंचा नेम पुढे चालवीत होत्या. प. पू. श्री धुंडिराज महाराजांबरोबर त्या गावोगावी जात. त्यावेळी श्रीदत्तमहात्म्य, स्वामीमहाराजांचे विस्तृत चरित्र व तृतीय पुष्प श्रीस्वामी महाराजांची ग्रंथसंपदा मराठीत असल्यामुळे स्त्रियांनी ती वाचावी म्हणून आग्रह भरीत.

वासुदेव यती वदती। वक्रतुंडबुवा फिरूनी जन्म घेती।

सौ. सरस्वतीबाई ज्या अपत्यलाभासाठी येवढी तपश्चर्या करीत होत्या, त्याचे फळ प्राप्त होण्याची वेळ आली. सर्वांनाच फार आनंद झाला प्रदक्षिणासेवा श्रीनरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी मान्य करून घेतली. इतक्या सत्वशील ईश्वरी कृपापात्र कवीश्वर घराण्यावर गणेशदत्त प्रसन्न झाले. प. पू. श्रीधुंडिराजमहाराज व सौ. सरस्वतीबाई यांच्या जीवनात निराशेची रात्र जाऊन उष:काल झाला. प. पू. श्रीदत्तमहाराजांचा जन्मही उष:काली म्हणजे सकाळी ६ वाजता झालेला आहे. घरादाराला प्रसन्नता आली. फार मोठा प्रसाद स्वामीवासुदेवांनी दिला.

बुधवार दि. २ मार्च १९१० माघ वद्य ६, शके १८३१ या दिवशी वाडीत श्रीदत्तमहाराजांचा जन्म झाला. श्री धुंडिराजशास्त्रींना फार आनंद झाला सकाळची वेळ होती. वाडीच्या दिवसाचा प्रारंभ कट्ट्यावरील काकड आरतीने होई पादुकांचे दर्शन घेऊन मंडळी परत येत होती. घाटावर स्नानाची गर्दी उसळलेली होती. सूर्याची कोवळी किरणे घराघरातून पसरु लागली होती. सौ सरस्वतीबाई आपल्या मुलाला घेऊन ओटीवर बसल्या होत्या. तोंडाने अभंग गुणगुणत होत्या. इतक्यात "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा" असा गोड गजर कानी आला. त्यांनी पाहिले, तो स्वामीमहाराज घराकडेच येत आहेत. प्रातः काळी होणारे हे श्रीवासुदेवानंदांचे दर्शन. मोठा आनंद झाला. सौ सरस्वतीबाई चटकन उठल्या. आपल्या बाळाला खाली दुपट्यावर ठेवून त्यांनी महाराजांना आसन दिले. नमस्कार करुन महाराजांसाठी फळे आणावी म्हणून लगबगीने घरात गेल्या. स्वामीमहाराज मुलाशी बोलू लागले. त्याच्याजवळ जाऊन बसले. आई बाहेर येत आहेत, तो त्यांच्या कानावर स्वामींच्या हास्याचा ध्वनी उमटला. महाराज म्हणत होते "काय वक्रतुंडमहाराज आलांत ? आपण या पांढऱ्या वेषात व आम्ही या भगव्या वेषात एवढाच काय तो तुमच्या आमच्यात फरक!" असे म्हणून स्वामी महाराज मनापासून हसले. आईंना कळून चुकले की दत्तमहाराज कोण आहेत ते! त्यामुळे दत्तमहाराजांच्या पिताजींनी ते इतके मनोमनी ठसवून घेतले की त्यांनी कधी त्यांना एकेरी नावाने संबोधले नाही.

क्रमश:-

*******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-३ *

बालपण

कृष्णामाईच्या तीरावर सर्व दत्तभक्तांच्या दरबारात प.पु.श्रीदत्तमहाराजांचे बालपण गेले. पादुकांचे दर्शन, कृष्णामाईत रोज स्नान हा नित्याचा नेम. पु.श्रीदत्तमहाराजांना पोहण्याची फार आवड! आट्यापाट्या, खोखो हे तर त्यांचे आवडते खेळ होते. पुरात उड्या मारून पोहण्यात त्यांना फार आनंद वाटे. नदीकाठचे त्यांचे बालपण होते.

कर्म, भक्ती, ज्ञान ह्या तिन्ही गोष्टी प्राप्त होण्यासाठी वाडीक्षेत्री घालविलेल्या रम्य बालपणाचा फार उपयोग झाला असे पु.दत्तमहाराज मानत.

१९१८ साली म्हणजे वयाच्या ८ व्या वर्षी देवाच्या कट्ट्याजवळ दत्तमहाराजांचे मौजीबंधन झाले. ७ वी पर्यंत ते वाडीलाच शाळेत होते. संस्कृत अध्ययनाला बालपणापासूनच सुरवात झाली होती. वाडीत श्रीमद् जगतगुरू शंकराचार्य जेरेस्वामी महाराज यांची पाठशाळा होती. त्या शाळेत त्यांचे काव्य व व्याकरण यांचे अध्ययन झाले.

मुंजीनंतर लगेच त्यांचे श्रीगुरूचरित्र वाचन सुरू झाले. यावेळी वाडीला प. प. श्रीदीक्षितस्वामी रहात होते. मुंजीनंतर त्यांना मंत्रोपदेश मिळाला प. प. श्रीदीक्षितस्वामींचा सहवासही मिळाला. तैसीच गुरुकृपा उखा उखळली। ज्ञानाची वोतपली पडली । तेथ साम्याची हृद्धि उघडली तयाचिये दिठी॥

प. प. श्रीदीक्षितस्वामींच्या कृपाप्रसादाने पु. दत्तमहाराज अंतर्बाह्य बदलून गेले. देवाच्या दर्शनाची ओढ तीव्र होऊ लागली. ज्ञानाने ती मिळविण्याचा प्रयत्न सुरू झाला. प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराजांनी भागवत वयाच्या १६ व्या वर्षी हाती दिले. पहिले सप्ताहवाचन प. प. श्रीदीक्षितस्वामींचे समोर झाले.

पु.दत्तमहाराजांना देवाचा कट्टा फार प्रिय. अभ्यास संपवून कट्ट्यावर यावे. सायंकाळ व्हायला आली की तो परिसर मोठा विलोभनीय होतो. सूर्याची किरणे नदीवर आपला हात फिरवितात. पादुकांपाशी येऊन दिवसाच्या अखेरची वंदना  करून निरोप घेतात घाटावर सायंदर्शनासाठी भक्तांची रीघ लागलेली असते उदबत्त्यांचा सुवास दरवळत असतो अशावेळी पु. दत्तमहाराज घाटावर त्यातल्या त्यात एका बाजूची निवांत जागा बघून चिंतनात मग्न होऊन जात. गंभीर, अबोल, विरक्त असणारी त्यांची वृत्ती त्यावेळी मूकपणे गुरुपादुकांशी एकरूपता साधायला बघत होती. परमेश्वरी ज्ञानाची ओढ त्यांना लागली होती. गुरूभक्तीची ओढ त्यांना खेचत होती.

पलिकडच्या काठावरच असलेले श्रीदत्तअमरेश्वर मंदिर. तिथे निवास करणारे प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराज. वारंवार भेटीगाठी घ्याव्या असे त्यांना वाटे. औरवाडला चौसष्ट योगिनीचे स्थान आहे. तेथे भजनपूजन चाले. पु.दत्तमहाराजांचे मन येथे फार ओढ घेई.

ओढ लागली गुरुभेटीची

औरवाडला जावयाचे म्हणजे त्याकाळी फारशा नावा वगैरे नव्हत्या. पोहूनच जावे लागे. दत्तमहाराज सांगलीला शिकावयास गेले होते व वाडीला आले होते. घरी आजीकडे अधिक महिन्याचे तीस तीन ब्राह्मण जेवायला होते. दत्तमहाराज आजीला म्हणाले, "मी औरवाडला जाऊन स्वामींना भेटून येतो." आजी म्हणाल्या, 'आज ब्राह्मण घरी आहेत. तेव्हा जायलाच पाहिजे का? बरे, जाऊन परत येणे तरी वेळेवर होईल का?' पु.दत्तमहाराजांना गुरूमहाराजांना भेटायची इतकी ओढ लागली होती की त्यांचे मन राहीना. ते आजीला म्हणाले, 'मी अकरा वाजेपर्यंत नक्की परत येईन.' आजी म्हणाल्या, 'बरं. पण नीट जपून जा!' दत्तमहाराज निघाले. घाटावर आले. नदीला पूर आला होता. पुरात पोहणे तर महाराजांना फार आवडे. कृष्णामाई आईसारखीच परिचित असल्यामुळे देवाला वंदन करून त्यांनी कृष्णामाईत उडी घेतली आणि सपासप अंतर कापून औरवाडला पोचले. गुरूदेवांचे दर्शन घेतले.

प्रसन्न चेहरा, दिव्य तेज, मुखावर स्मितहास्य असे श्रीदीक्षितस्वामींचे व्यक्तिमत्व होते. त्यांनी दत्तमहाराजांची विचारपूस केली. पोहून आल्याचे पाहून कौतुकपूर्ण दृष्टी टाकली. नेसायला कोरडे वस्त्र दिले. अंगावर उपरणे घातले. कृपादृष्टीने पाहिले. या प्रेमपूर्ण वागणुकीने महाराज भारावून गेले. प्रसाद घेऊन जेवण करून चला म्हणाले. आजी वाट पाहील म्हटल्यावर श्रीदीक्षितस्वामींनी जाण्याची परवानगी दिली. गुरुदेवांचा निरोप घेतला. दर्शनाने, स्पर्शाने, हास्याने मधुशब्द व कल्याण करणारे आशीर्वाद मिळवून पु.दत्तमहाराज मोठ्या उत्साही मनाने परतले. मन आनंदाने भारावून आले होते. गुरूमाऊलीच्या निर्हेतुक प्रेमाचे मनात चिंतन चालले होते. डोळ्यांतून अश्रूधारा येत होत्या. ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभावीण प्रीती । असे विचार मनात येत होते.

क्रमशः

******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-४ *

श्री दत्त महाराज कृष्णामाईत पोहत जाऊन औरवाडला पोहोचले. गुरुमहाराज श्री दीक्षित स्वामींचे दर्शन घेतले. गुरुदेवांचा निरोप घेतला. सद्गदित मनाने कृष्णामाईला म्हणाले, 'ने मजसी परत तीराला.' महाराज पोहू लागले. पण मन मात्र या सद्भावाने गुरूप्रेमाने उचंबळले होते. त्या भानात ते कृष्णामाईच्या

जवळ असलेल्या भोवऱ्यात सापडले. खोल खोल जाऊ लागले. क्षणाक्षणाला आपण खाली जात आहोत असे वाटू लागले. मन आनंदात होते. हातापायाच्या क्रिया थांबल्या, आता तळाला जाणार असे वाटले. एकच विचार मनात आला, घरी ब्राह्मणभोजन आहे, काही घोटाळा तर होणार नाही?

इतक्यात त्या स्थळी दत्तगुरु पाहिले। धन्य जीवन झाले | पुण्य फळा आले ||

असे दर्शन होऊन श्रीदत्तमहाराज भोवऱ्यातून सुटले. कृष्णामाईने त्यांना परत केले हेच खरे!

अमरेश्वर येथे आल्यावर प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराजांनी तेथील पंचक्रोशी व जवळपासच्या यात्रा कराव्या असे ठरविले. कोल्हापूर म्हणजे गया. त्रिस्थळीपैकी एक असे मानून ते अमरेश्वर येथील मंडळींना म्हणाले, "आम्ही करवीरक्षेत्री जाऊन येतो. यात्रा करून येईपर्यंत तुम्ही सुंदर मंदिर तयार करा!" असे म्हणून आपल्या गुरुदेवांची प. प. श्रीवासुदेवानंदांची मूर्ती बरोबर घेऊन ते निघाले. सर्वमंडळी नौकारूढ झाली.नौका अनेक छोट्यामोठ्या ठिकाणी थांबे. प्रेमाचा स्वीकार करीत स्वामीमहाराज पुढे पुढे चालले होते. कवडे गाव, नंतर गणेशवाड़ी क्षेत्रात गणेशपूजन झाले. सर्व मंडळी श्रीस्वामीमहाराजांकडे आकर्षित होत होती. श्रीदत्तात्रेय कवीश्वर हे सर्व दृश्य मनांत साठवून घेत होते. वानवडी गावी तर जैन व मुसलमान लोक होते. त्या लोकांनी श्रीदीक्षितस्वामींना प्रार्थनापूर्वक उतरायला लावले, समदर्शी स्वामी उतरले. असे ठिकठिकाणी उतरून लोकांना भजनाची व 'दिगंबरा दिगंबरा' या नामगजराची गोडी लावीत अनेक लोकांना आपलेसे करीत करीत कोल्हापुरी आले.

कोल्हापुरात श्रीदीक्षितस्वामी महाराजांचे एक जुने मित्र श्री गोपाळराव दंडगे हे होते. ते भेटावयास आले तेव्हा श्रीदीक्षितस्वामींना आनंद झाला.

प. प. श्रीदीक्षित स्वामींनी त्यांना चाक्षुषी दीक्षा दिली. चाक्षुषी दीक्षा म्हणजे डोळे उघडून भक्तांकडे पाहत असताना त्यांच्या हृदयात पितृशक्तीचा उदय करून देणे. ही चाक्षुषी दीक्षा, स्पर्श दीक्षा, संकल्प दीक्षा श्रीदीक्षितस्वामी महाराज देत असत.

## पहिला भागवत सप्ताह

श्री अमरेश्वर मंदिर पुरे व्हायचे होते. ते पुरे होईपर्यंत व तेथे गुरूदेवांची नीट व्यवस्था लागेपर्यंत श्रीदीक्षितस्वामींना अमरेश्वर सोडायचे नव्हते. वाडीला श्री दीक्षितस्वामी वेदशास्त्रसंपन्न श्रीधुंडिराज महाराजांकडून भागवत सप्ताह करून घेत असत. इथे आल्यावरही श्रीदीक्षितस्वामींनी भागवत सप्ताह करायचे ठरवले. श्रीदत्तात्रेय कवीश्वरांना अमरेश्वराला बोलावून घेतले. कवीश्वर हे आता संस्कृत पाठशाळेत जाऊ लागले होते. चिमुकल्या शास्त्र्यांना बोलावून श्रीदीक्षितस्वामी म्हणाले, 'तुम्हीच सप्ताह करा भागवताचा! नुसता मूळ ग्रंथ वाचा म्हणजे झाले!'

आपल्याला स्वामींनी सप्ताहासाठी बोलावले याचा श्रीदत्तमहाराजांना विलक्षण आनंद झाला. संहिता वाचण्याइतपत आपली तयारी नाही. आपण संस्कृतची नुकतीच सुरुवात केली आहे. स्वामी महाराजांसमोर बसून वाचन होणार, महाराज काय ते बघून घेतील, या विचाराने ते तयार झाले.

या बालशास्त्र्यांनी संहितेचा आरंभ केला. संपूर्ण संहिता वाचन होईपर्यंत श्री दीक्षितस्वामी उठत नसत. त्यांची गुरूकृपादृष्टी दत्तात्रेयांकडे सतत लागलेली होती. असे सात दिवस एकापेक्षा एक आनंदाचे गेले. सप्ताह पूर्ण झाला.

श्रीदीक्षितस्वामी महाराज संतुष्ट झाले. दत्तात्रेयांच्या पाठीवरून हात फिरवून प्रेमाने म्हणाले, 'वा! फारच छान! एकाग्र मनाने वाचलेस. तू पुढे मोठा ज्ञानी होशील. तू माझा प्रिय भक्त आहेस. असे म्हणून दत्तबाळाला आशीर्वाद दिला. त्याचे अंगावर आपले हाताने उंची शाल घातली. कृपेचे पांघरूण होते ते! चांदीचे संध्यापात्र दिले.

क्रमशः

****************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-५ *

श्री दत्तात्रेय कवीश्वरांनी पहिला भागवत सप्ताह केल्यानंतर प.प.श्री. दीक्षितस्वामी फार संतुष्ट झाले व भागवताची मिरवणूक काढूया म्हणून एक नौका तयार केली. प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराज, जवळ दत्तात्रयेशास्त्री हातात भागवताची पोथी व तोंडाने चाललेले दिगंबराचे भजन, कृष्णामाई या सर्वांना घेऊन मोठया डौलाने वाहत होती. काय तो अनुपम सोहळा! दोन्ही तीरांवरील लोक नावेतील ही मिरवणूक मोठ्या कौतुकाने पाहत होते. पशुपक्षीदेखील झाडावर थबकले होते. श्रीदत्तात्रेयशास्त्रींच्या डोळ्यातून प्रेमाश्रू वाहात होते. असे हे नौकानयन चालले होते.

भागवतासारखा पावन ग्रंथ दत्तात्रेयांचे हाती देऊन श्रीदीक्षितस्वामी त्यांना प्रेमाने सांगत होते, 'माझ्याबरोबर येण्याचा हट्ट तू करू नकोस. पण मी सांगतो म्हणून एक काम अवश्य कर. या अमरेश्वराच्या देवळात माझे गुरूदेव श्रीवासुदेवानंद सरस्वती निवास करीत आहेत. दर भाद्रपद महिन्यात भागवताचा सप्ताह करीत जा. माझ्याबरोबर न येता येथे येऊन हे काम करशील ना?" श्रीदत्तात्रेयांनी अर्थातच गुरुमहाराजांचे चरणी वंदन करून मान्यता दिली. पण आपल्याला बरोबर नेत नाहीत हे दुःख त्यांना अतीव झाले. चरणांवर डोके ठेवून ते म्हणाले.

तू माय मी लेकरू । गुरू रे नको विसरू । रे नको विसरू ।

श्रीदीक्षितस्वामींनी पुन्हा एकदा महाराजांचे पाठीवर हात फिरविला. कृपापूर्ण दृष्टीने त्यांच्याकडे पाहून मनात म्हणाले, 'छोटे शास्त्रीबुवा तुमचे कार्य फार मोठे आहे! एक महान योगीराजांचे आपण

मानसपुत्र होणार आहात. भागवत सप्ताहातून ज्ञानप्रबोधन करणार आहात. आपल्या निरूपणावर श्रोते लुब्ध होणार आहेत. म्हणून मी माझे गुरूदेव श्रीवासुदेवानंद स्वामी यांना प्रार्थना करीत आहे की त्यांचा आशीर्वाद आपल्याला लाभावा!

दत्तात्रेय सांगे लोकां भक्ती भागवता ॥ निरूपण सांगायला द्यावे बळ गुरूनाथा ॥

अध्ययन व गुणगौरव

कर्नाटक प्रांतातले धारवाड हे तसे लहानसे शहर. बेळगावला जवळ असल्यामुळे मराठी भाषिकांची वस्ती मोठी. वैदिक परंपरा आजही अखंडपणे चालू आहे. धारवाडचे एक वैशिष्ट्य म्हणजे तेथील १०० वर्षाहुन जुनी असलेली श्रीजगद्‌गुरु शंकराचार्य संस्कृत पाठशाळा. याच पाठशाळेत ब्रह्मश्री पं. नागेशशास्त्री उप्पन बेट्‌टीगिरी यांचेकडून प. पू. श्रीदत्तमहाराजांचे न्यायशास्त्राचे अध्ययन झाले. सन १९३३ ते १९३७ या पाच वर्षांच्या काळात श्रीमहाराजांचा विद्‌वान पंडित म्हणून नावलौकिक झाला. पंडित श्रीनागेश शास्त्री यांचे पुत्रवत प्रेम त्यांना लाभले. ते अनेकवेळा त्यांचे विषयी गौरवोद्‌गार काढीत की, श्रीदत्तमहाराज जेष्ठाप्रमाणे सर्वगुणांनी अनुरुप असे विद्‌यार्थी आहेत.

धारवाडला येण्यापूर्वी श्रीमहाराजांचे पुण्याला मीमांसा विद्‌यालयात पं. श्रीसुब्बाशास्त्रीवर्यां जवळ मिमांसाशास्त्राचे अध्ययन झाले. वेदान्त, अलंकार, धर्मशास्त्र व शास्त्रातील विविध परीक्षा देवून त्यांनी पदव्याही मिळविल्या होत्या. तरल, सूक्ष्म, कुशाग्र बुद्‌धी आणि परिश्रम करण्याची वृत्ती त्यामुळे कोणत्याही शास्त्रांचा परीपूर्ण अभ्यास श्रीदत्तमहाराजांचा होत असे. लहानवयातच प. पू. श्रीदत्तमहाराजांनी वेदाभ्यास, व्रत, उपोषण, तपश्चर्या, ज्ञान, शुचित्वादि पावित्र्य संपादन केले असल्यामुळे त्यांचे ठिकाणी वेदाभ्यासतपस्वी ज्ञान या मनुस्मृतीप्रणीत सात्विक गुणांची लक्षणे दिसू लागली.

धारवाडला श्रीमहाराजांबरोबर पं. श्री. नागेशशास्त्रींचे जेष्ठ चिरंजीव ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री, पं. श्रीपादशास्त्री जेरे, श्री. ह. रा. महाजनी पुढे लोकसत्ता या दैनिकाचे संपादक म्हणून प्रसिद्‌धीस आलेले अशी नावारुपाला आलेली मंडळी पाठशाळेची भूषणे होती. विद्‌यार्थीवर्गाचे श्रीमहाराज केवळ सहाध्यायी नसून आवडते असे उपदेश गुरुही होते. त्यांचेबद्‌दल सर्वांना नितांत आदर वाटायचा. त्यांच्या तोंडातून कोणतेही प्रसंगी अपशब्द, परद्‌वेष, परनिंदा, क्रोधावेश दिसत नसे.

विद्‌याध्ययन व्यसनम् अथवा हरिपादसेवनं व्यसनम्

ही त्यांची नित्यवृत्ती असे. गुणांचा आदर व कौतुक करण्याची त्यांची प्रवृत्ती होती.

क्रमशः

*******************************************

# * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-६ *

## म्हैसूरची विद्वत् परीक्षा

धारवाडला अध्ययन करीत असतानाच विद्वतसभांमधे शास्त्रचर्चा करण्यासाठी पं. श्रीनागेशशास्त्री पू. श्रीदत्तमहाराजांना आवर्जून नेत असत वा पाठवीत असत. त्यांचेबरोबर श्री ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रीही असत. प्रत्येक ठिकाणी पू. श्रीदत्तमहाराज आपल्या विद्वतेने, विनम्रतेने सभेचे मन जिंकून घेत असत. म्हैसूरच्या विद्वत परीक्षेत पू. श्रीदत्तमहाराज गेले असता, परीक्षा घेणाऱ्या विद्वानांना श्रीमहाराजांची विद्वता पाहून अचंबा वाटला. श्रीमहाराजांनी सर्व शास्त्रांचे अध्ययन, मनन व चिंतन केले होते. त्यामुळे त्यांच्या विचारात परिपूर्णता होती. शास्त्रकारांना नेमके काय सांगायचे आहे त्याचे अचूक ज्ञान त्यांनी आपल्या सर्वांगीण अभ्यासाने प्राप्त करून घेतल्याचा प्रत्यय विद्वत् सभेत यायचा.

एकस्मिन जन्मनि एकमेव शास्त्रम् अशा आर्यविद्येतील नियमाला श्रीमहाराज अपवाद होते.

परमगुरुजी ब्रह्मीभूत कुडली शृंगेरीचे जगद्गुरु श्रीविद्यामिनव वाळुकेश्वर भारती स्वामी महाराज (पूर्वाश्रमीचे पंडित विरुपाक्षशास्त्री, हनगळ) यांनी धारवाडला अद्वैत ब्रह्मविद्या परिषदेचे आयोजन केले होते. स्वाहाकार, अनुष्ठान व विद्वतसभा असा भरगच्च कार्यक्रम होता. 'वेदान्ता' वर पू. श्रीदत्तमहाराजांनी आपले विचार मांडले. त्यावेळी श्रीमहाराजांची प्रतिमा, विद्वता, गांभीर्य, सात्विकता, सदाचार आदी गुणसमुच्चय पाहून आपल्या विद्यावंशामध्ये हे प्रदीपक शिष्यरत्न आहेत, असे गौरवोद्गार श्रीशंकराचार्यांनी काढले. पूर्वाश्रमीचे पं. विरुपाक्षशास्त्री हे पं. नागेशास्त्रीचे गुरु म्हणजेच श्रीदत्तमहाराजांचे परात्परगुरु होते. गुरुजींनी केलेल्या गौरवाने श्रीदत्तमहाराज अतिशय सद्गदित झाले.

शृंगेरीच्या बद्रीशंकराचार्यांनी एक विद्वत सभा मद्रासच्या ताम्रम् विभागी बोलाविली होती. ह्या सभेला भारतात सर्वोमुखी झालेले मद्रासचे प्रकांड पंडित श्री व्यंकटेशशास्त्री उपस्थित होते. त्यांनी पू. श्रीदत्तमहाराजांवर 'चिद् - सुखी' ह्या वेदान्तातील प्रसिद्ध ग्रंथावर भाष्य करण्याची जबाबदारी सोपविली होती. ह्या ग्रंथाचे अध्ययन व अध्यापन फार विरळपणे होत असते. ही कठीण, अवघड गोष्ट श्रीदत्तमहाराजांनी ज्या सहजतेने केली की त्याला तोड नाही. कोणच्याही भाष्यावर टीका करणारे म्हणून श्रीव्यंकटेशशास्त्रींची प्रसिद्धी होती. परंतु श्रीमहाराजांच्या भाष्यावर ते एकदम संतुष्ट झाले. आपला टीका करण्याचा स्वभाव विसरले. श्रीमहाराजांची त्यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली.

## जगद्गुरुकृत अलौकिक सन्मान

कांचीकामकोटीचे जगत्गुरु शंकराचार्य परमाचोर्य श्री. चंद्रशेखरसरस्वती यांनी श्रीशंकरजयंती निमित्त एक विद्वत्तसभा बीजवाडला आयोजित केली होती. भारतातले ४०० घनपाठी, २०० शास्त्रीविद्वान मंडळी

सभेला हजर होती. हा सोहळा पाहण्यासाठी असंख्य भक्तमंडळी श्रोते म्हणून आली होती.पू. श्रीदत्तमहाराजांवर वेदान्तावर बोलण्याची जबाबदारी होती.

सभेला आदल्या दिवशी श्रीमहाराज व ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री पोहचले. श्रीजगत्गुरु शंकराचार्यांना दत्तमहाराज आले आहेत हे कळतांच तातडीने शिष्यांना पाठवून श्रीमहाराजांना सन्मानपूर्वक आपल्या खोलीत आणविले. खोलीचा दरवाजा बंद करून घेतला. महाराजांबरोबर शास्त्रचर्चा तास दीडतास केली. न राहवून शेवटी श्री. शंकराचार्यांना, मृदू शब्दात श्रीमहाराजांनी, बाहेर दर्शनासाठी आलेल्या लोकांची आठवण करून दिली. श्रीशंकराचार्यांनी आवरते घेताना उद्गार काढले की, "बाहेरची मंडळी नेहमीचीच आहेत. आपला सत्संग कधीतरी श्रीकृपेने लाभतो"

दुसरे दिवशींच्या विद्वतसभेत पू. श्रीदत्तमहाराज तास दीड तास उत्कृष्ट बोलले. सर्वांना समजेल अशा सोप्या भाषेत सामान्यांना तर समजेलच पण विद्वानांचेही समाधान होईल, अशा तऱ्हेने केलेली विषयाची मांडणी तर श्रीशंकराचार्यांनाही मोहित करून गेली. कुणालाही सहसा स्पर्श करु न देणारे श्रीशंकराचार्य आपल्या आसनावरून पटकन उठले. सभेच्या लक्षात येण्यापूर्वी श्रीदत्तमहाराजांच्या गळ्यात आपल्या गळ्यातील ताजा टवटवीत घसघशीत हिरव्यागार बेलपत्रांचा हार घालते झाले. जणू साक्षात शिवप्रभू शंकरांनी तो घातला आहे,असे अभूतपूर्व भावपूर्ण, हृदयंगम दृश्य साकारले आहे, असे लक्षात येताच् टाळ्यांचा प्रचंड निनाद वातावरण भारून टाकता झाला.

क्रमशः

****************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-७ *

सुवर्ण कंकण

धारवाडला अद्वैत ब्रह्मविद्या परिषद झाली. त्याचा समग्र अहवाल कांची कामकोटीच्या श्री. शंकराचार्यांनी मागविला. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रींनी तत्परतेने तो पाठविला. त्याने श्रीशंकराचार्य फार प्रभावित झाले. पू. श्रीदत्तमहाराजांसाठी सुवर्ण कंकण, मानाचा हार, श्रीफळ व वस्त्र मुद्दाम सेवेकरी पाठवून अर्पण केले आणि रु. पाचशेचे वर्षासन सुरु केले. हा फार मोठा सन्मान श्रीमहाराजांचा झाला. प. पू. श्रीगुळवणी महाराजांना तो कळताच त्यांनीही त्यांचा जाहीर सत्कार केला.

ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री त्यानंतर काही दिवसांनी पुण्यास आले. श्रीमहाराजांचे बिऱ्हाडी गेले. प्राथमिक क्षेमकुशल झाल्यावर श्रीमहाराजांनी आईसाहेबांना हाक मारून श्रीशंकाराचार्यांकडून आलेले सुवर्ण कंकण आणायला सांगितले. सौ. आईसाहेबांनी ते सुवर्ण कंकण श्रीभालचंद्रशास्त्रींचे हाती ठेवले. त्यावेळी श्रीमहाराज म्हणतात, की ही किमया सर्व श्रीभालचंद्रशास्त्रींची आहे. त्यांनी आमचे नांव पुरस्कारासाठी

सुचविले म्हणून आमचा हा सन्मान झाला. पू. श्रीदत्तमहाराजांचा हा विनम्र भाव पाहून ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री अचंबित झाले. त्यांना महाराजांच्या विनयाची माहिती असल्यामुळे ते म्हणाले की,

न ही कस्तुरी कामोदः रापयेन विभायते ।

कस्तुरीला कुठे आपल्या गंधासाठी सांगावे लागते. प. पू. श्रीशंकराचार्यांनाच ते ज्ञात झाले त्याचा आम्हाला आनंद झाला. पू. श्रीदत्तमहाराजांचा गुणविशेष असा होता. त्याची प्रचिती प्रसंगोपात सर्व मंडळींना वेळोवेळी येत होती.

## अथा तो ब्रह्मजिज्ञासा

आंध्रप्रदेश सरकारच्या पुढाकाराने एक विद्वतसभा तिरुपतीला आयोजित करण्यात आली होती. शृंगेरीचे अभिनवविद्यातीर्थ जगद्गुरु श्रीशंकराचार्य हे अध्यक्षस्थानी होते. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रीं बरोबर पू. श्रीदत्तमहाराजही खास निमंत्रित म्हणून उपस्थित होते. 'अथा तो ब्रह्मजिज्ञासा' हा आयोजित केलेल्या चर्चासत्राचा विषय होता. विद्वान पंडितात अनेक विद्वान मंडळी होती. 'अथ' शब्दाचे एवढे सुंदर विवरण पू. श्रीदत्तमहाराजांनी करून एक नवीन दृष्टीच सर्वांना दिली. आपल्याला हा अर्थ कसा सुचला नाही, असेच सर्व विद्वानांना वाटले.पू. श्रीमहाराजांची एकमुखी तारीफ सर्वांनी केली.

## बारा प्रश्नांची चर्चा

साण्डूर संस्थानचे अधिपती श्री. यशवंतराव घोरपडे हे शास्त्रकर्माची आवड असणारे होते. त्यांनी कुंडाभिषेक व मयूरस्वामी प्रतिष्ठापना असा जोडकार्यक्रम आयोजित केला. या साण्डूर संस्थानाचे युवराज हे आंग्लविद्या विभूषित असे बॅरिस्टर मुरारी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी धर्म व राजकारण यावर आधारित अशा बारा प्रश्नांची मांडणी केली. त्याची उकल करावी अशी पू. श्रीदत्तमहाराजांना विनंती केली. युवराजांची प्रशंसा करून या बारा प्रश्नांचे पाच प्रश्नात रुपांतर करून सर्वांवर श्रीमहाराजांनी एवढे सुंदर विवरण केले की बॅ. मुरारींचे समाधान झाले.

श्रीमहाराजांचा गौरव करताना, आपण अनेक ठिकाणी हे प्रश्न विचारले होते, परंतु कुणीही समाधान करणारे उत्तर दिले नव्हते याचाही उल्लेख केला. भारतीय वैदिकशास्त्र, अध्यात्मशास्त्र केवढे प्रगत आहे याची प्रचीती श्रीमहाराजांच्या उत्तराने आज मिळाली, असा गौरवपूर्ण उल्लेख केला.

## श्री. गुरूदक्षिणा

धारवाडच्या श्रीजगद्गुरु शंकराचार्य संस्कृत पाठशाळेचा हीरक महोत्सव १९५१ साली झाला. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रींचे पिताश्री, ब्रह्मश्री नागेश शास्त्रींचे अध्ययन याच पाठशाळेत झाले होते. मोठी परंपरा लाभलेली शंभर वर्षाहूनही जुनी असलेली संस्कृत पाठशाळा धारवाड शहराचे भूषण आहे. ह्या पाठशाळेचे प्रमुख ब्रह्मश्री नागेशशास्त्री तर पू. श्रीदत्तमहाराजांचे गुरू व पुत्रवत प्रेम करणारे असे होते.

ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री सांगतात् की, ब्रह्मश्री नागेशशास्त्रींचे वय झाले होते, अशावेळी ते पुण्याला श्रीमहाराजांचे बिऱ्हाडी आले होते. जाता जाता श्रीमहाराजांना त्यांनी पाठशाळेची बिघडलेली आर्थिक परिस्थिती सांगितली. पाठशाळेकडे लक्ष पुरविण्यास सांगितले. श्रीमहाराजांनी पित्यासम असलेल्या आपल्या गुरूंना पुढील काळात भरघोस गुरुदक्षिणा दिली. ह्या दानाची कुठेही वाच्यता नाही. श्रीमहाराजांनी वडिलांच्या विनंतीप्रमाणे पुढे त्यांचेकडून झालेल्या भागवत सप्ताहातील रक्कम पाठशाळेकडे पाठविली. जवळजवळ ४० हजारांच्या आसपास ही गुरुदक्षिणा असेल.

क्रमशः

*****************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-८ *

परम पूजनीय श्रीदत्तमहाराज वस्तीला त्यांचे आप्त श्री. केळकर वकील यांचेकडे असत. पाठशाळेत त्यांचे न्याय मीमांसा व्यतिरिक्त इतरही अभ्यास चालू असे. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्री सांगतात की, ब्रह्मश्री नागेशशास्त्रींच्या आज्ञेवरून शांकरभाष्यावर ते पाठ देत असत. संध्याकाळी त्यांचेबरोबर फिरायला जाण्यातही शास्त्रचर्चेचा लाभ घडत असे. गावापासून दूर असलेल्या एखाद्या शेतात ही संध्याकाळची चर्चा रंगत असे. ब्रह्मश्री भालचंद्रशास्त्रींनी त्याचा अनेकवार सहभाग लुटला आहे. श्रीपादशास्त्री जेरेंसारखी मंडळी धारवाडला आली की ही चर्चा अधिकच सखोल व्हायची आणि ती एक पर्वणीच ठरायची.

कैवल्यस्वामी पादुका प्रतिष्ठापना

धारवाड सोडल्यानंतर पू. दत्तमहाराज पुण्याला आले तरीही धारवाडमुळे कर्नाटक प्रांतात त्यांचा संबंध कायम राहिला. कैवल्यस्वामींची पादुका प्रतिष्ठापना पू. दत्तमहाराजांचे शुभहस्ते गोकाकला झाली. गोकाकला श्रीमहाराजांवर प्रेम करणारी, त्यांच्या विद्वतेबद्दल आदर असणारी, त्यांना देवपुरुष मानणारी मंडळी आहेत. पादुका स्थापनेनंतर श्रीमहाराजांनी पादुकांचे महत्त्व आणि सद्गुरु महात्म्य यावर दिलेले प्रवचन आजही अनेकांच्या स्मरणात आहे.

हल्याळ, गोकाकचा भागवत सप्ताह

हल्याळ येथेही पू. दत्तमहाराजांनी एक भागवत सप्ताह केला होता. शृंगेरी पीठाचे श्रीशंकराचार्य त्याला उपस्थित होते.

गोकाकला पू. दत्तमहाराजांचा भागवत सप्ताह प. पू. श्रीयोगीराज गुळवणी महाराजांचे उपस्थितीत झाला. दशमस्कंधावरील भागवत तीन दिवसात पार पडले हे त्याचे खास वैशिष्ट्य. त्या व्यतिरिक्त होमहवनही झाले. त्यावेळी तिथे आंध्रातले ब्रह्मश्री नरसरामशास्त्रीं हे मांत्रिक शास्त्रात पारंगत असलेले एक पंडित आले होते. त्यांनी अनसूया मंत्राचे विधान प. पू. श्री गुळवणी महाराजांना दिले. नरसोबावाडीचे श्रीविष्णूस्वामींनी दत्तमंत्र लिहून ठेवला होता. त्यावरून प. पू. श्री गुळवणी महाराज पाठ करीत होते. अनसूया मंत्राने प. पू. श्रीगुळवणी महाराजांना परम संतोष झाला.

## प. प. श्री नारायणस्वामींचा अतिरुद्र स्वाहाकार

केडगांवचे श्रीनारायणस्वामी महाराज यांनी ब्रह्मश्री नागेशशास्त्री यांच्या अधिपत्याखाली अतिरुद्र स्वाहाकार आयोजित केला होता. ठिकठिकाणच्या एकंदर २५०० ऋत्विजांची निमंत्रणे, त्यांची सर्व व्यवस्था पू. दत्तमहाराजांवर सोपविली होती. त्यासाठी पत्रव्यवहारा पासून त्यांचे मान, सन्मान वगैरे सर्व बाबी पू.दत्तमहाराजांनी समर्थपणे सांभाळल्या. नऊ दिवस चाललेल्या त्या सोहळ्यात निरनिराळी अनुष्ठानेही चालू होती. असंख्य भक्तगणांनी ह्या सोहळ्यास आपली उपस्थिती लावली. अभिषेक, स्वाहाकार, पूर्णाहुती व महाप्रसाद झाल्यावर संध्याकाळी ६ चे सुमारास प. प. श्रीनारायणस्वामी महाराजांनी देह ठेवला तेव्हा एकच हल्लकल्लोळ झाला. पू. दत्तमहाराजांनी त्यावेळी समर्थपणे भक्तांचे सांत्वन तर केलेच, त्याचबरोबर श्री. नारायणस्वामी महाराजांचे और्ध्वदेहिक अंत्यसंस्कार शास्त्राधारे कसे केले पाहिजे त्याचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प. पू. श्री नारायण स्वामी महाराजांना अंत्यसंस्कार घडले.

## उगार येथील श्रीगुरुंची आराधना

कांची कामकोटीचे जगद्गुरू श्रीशंकराचार्य यांचा उगार येथे १५ दिवस मुक्काम होता. त्यांच्या गुरुंच्या आराधनेचा कार्यक्रम त्यावेळी आयोजित केला होता.पू. दत्तमहाराजांना अगत्यपूर्ण निमंत्रण होते. त्यावेळी वेदान्तचर्चा घडायची. पू.दत्तमहाराजांचा वेदान्ताचा अभ्यास, त्यावरील त्यांचे मुद्देसूद विवरण, त्यातील निरनिराळ्या प्रश्नांची त्यांनी केलेली उकल सर्वांनाच आनंद देणारी ठरली. ज्ञानलालसी प्रश्नकर्त्यांचे पूर्ण समाधान करणारी उत्तरे यांनी जगद्गुरु श्रीशंकराचार्यांना परमसंतोष झाला.

उगारचे यति श्रीनारायणानंद सरस्वतीमहाराजांनी पूर्वाश्रमी पू. दत्तमहाराजांपाशी वेदान्ताचे अध्ययन केलेले होते. त्यांनाही वेदान्ताच्या अभ्यासाचा पुन्हा आनंद लाभला.

क्रमशः-

******************************************



शास्त्राभ्यास

प. पू.श्री. दत्तमहाराजांनी न्यायमीसांसा, व्याकरण, वेदान्त, वेदांगे यांचा अभ्यास केला. त्या त्या शास्त्रात ते पारंगत झाले असे आपण वाचतो. आमच्यासारख्या सामान्यांना ही शास्त्रे म्हणजे काय याची कल्पनाच येत नाही. पू. दत्तमहाराजांच्या ज्ञानाची खोली त्यामुळे आम्हा सामान्यजनांना अज्ञात असते. ती खोली थोडी तरी समजावी म्हणून त्याबद्दल थोडक्यांत झलकः

न्यायदर्शन

षडदर्शन न्याय हे प्रमुख दर्शन आहे. विविध प्रमाणांच्या साहाय्याने वस्तुतत्वाची परीक्षा करणे म्हणजे न्याय होय, अशी त्याची व्याख्या केली आहे. न्यायाचे प्रतिपादन करणे हा न्यायदर्शनाचा विषय आहे. न्यायविद्येचा उगम कधी झाला हे निश्चित सांगता येत नाही. पण तर्काच्या सहाय्याने वस्तुतत्त्व पारखण्याची पद्धती फार प्राचीन आहे. आत्मदर्शनासाठी तर्कानुकूल मनन करणे हा एक उपाय श्रुतींनी सांगितला आहे. न्यायदर्शनाची ग्रंथसंपदा विपुल आहे. सनपूर्व ६ व्या शतकापासून तो विसाव्या शतकापर्यंत अनेक प्रथितयश नैय्याकरणी होऊन गेले. निःश्रेयस प्राप्ती हे न्यायशास्त्राचे मुख्य प्रयोजन आहे. त्यामुळे आत्मसाक्षात्कार होतो.

मीमांसाशास्त्र

परस्परविरोधी वेदमंत्रातला विरोध दूर करून त्यांच्या अर्थाचा निर्णय ठरविणे याचे नाव मीमांसा होय. मीमांसा या शब्दाचा नेमका अर्थ म्हणजे संबंध निश्चिती होय. एखाद्या शब्दाचा अथवा वाक्याचा अर्थ निश्चित करतांना जो विचार करावा लागतो, जो तर्कवाद स्वीकारावा लागतो त्याला मीमांसा असे म्हणतात. ज्या परस्परावलंबी शब्दांनी अथवा वाक्यांनी अशी पद्धती शिकवली जाते त्या शब्दांना अथवा वाक्यसमूहाला मीमांसाशास्त्र हे नाव दिले गेले. धर्म या नावाच्या विषयाचे विवेचन करणे हे मीमांसेचे प्रयोजन आहे.

श्रुतीचे धर्मकांड व कर्मकांड असे दोन भाग आहेत.

यज्ञयागाच्या विधीचे व अनुष्ठानाचे वर्णन करणे हा कर्मकांडाचा विषय आहे. जीव, जगत, ईश्वर यांचे रूप व परस्परसंबंध या गोष्टीचे निरूपण करणे हा ज्ञानकांडाचा विषय आहे. या दोहोत दिसून येणाऱ्या विरोधांचे निराकरण करण्याच्या प्रधान उद्देशाने या दर्शनाची प्रवृत्ती झाली.

कर्मकांड हे वेदांचे पूर्वखंड आहे, तर ज्ञानकांड हे वेदांचे उत्तरकांड आहे.

म्हणून या दर्शनाला पूर्व मीमांसा व ज्ञानकांडाला उत्तर मीमांसा असे म्हणतात.

वेदान्त

अद्वैत वेदान्त दर्शनाला वेदान्त म्हणतात. अद्वैत वेदान्त हे भारतीय अध्यात्म शास्त्रात मुकुटमणी मानले जाते. हे दर्शन उपनिषदातील सिद्धांतावर आधारलेले आहे. उपनिषदातील रहस्यमय वैदिक सिद्धांताचे प्रतिपादन करीत असल्यामुळे त्याला दिलेले वेदान्त (वेदाचा अंत) हे नाव सार्थ ठरते.

वेदांगे

वेदातील मंत्राचा अर्थ नीट समजण्यासाठी तसेच त्याचे विशेष विवरण करण्यासाठी वेदांग ग्रंथाचा उपयोग होतो. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिष ही सहा वेदांगे आहेत. वेदांगे शब्दाची फोड वेद + अंगे वेदाचे अंग अशी होत असली तरी वेदांगाचे समावेश श्रुतीत करीत नाहीत. श्रुती म्हणजे वेद. हे अपौरुषेय मानले आहेत. वेदांगे ही मानवनिर्मित आहेत म्हणून त्याचा अंतर्भाव श्रुती वाङ्मयात करीत नाहीत. श्रौतविधी व यज्ञयाग करण्यासाठीही हे ग्रंथ सहाय्यकारी होतात.

हे सर्व वाचल्यावर आपली बुद्धी विस्मय पावते, हे तत्वज्ञान ग्रहण करणारी बुद्धी किती निर्मळ सूक्ष्म असेल याची कल्पना येते.

पू. दत्तमहाराजांची ग्रंथ संपदा

श्री. निंबाकाचार्य

श्री निंबाकाचार्यांचे मूळ नाव नियमानंद होते. ते दिसायला सुंदर असल्यामुळे लोक त्यांना सुदर्शन असेही म्हणत. यांचा जन्म दक्षिणेत तेलंगण प्रदेशात झाला असला तरी त्यांची कर्मभूमी व्रजमंडळ ही होती. श्रीनिंबाकाचार्यांनी ज्या स्वतंत्र दर्शनाचा पाया घातला त्याला द्वैताद्वैत दर्शन असे म्हणतात. त्यांनी वेदान्त पारिजात सौरभ हा ग्रंथ लिहिला. त्याचा अनुवाद दत्तमहाराजांनी केला. या सिद्धांतावरील पारिजात सौरभ या ग्रंथाचा पू. श्रीमहाराजांनी मराठी अनुवाद केला असून तो ग्रंथ प्रसिद्ध आहे.

क्रमशः

*******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-१० *

प. पू. श्रीदत्तमहाराजांची ग्रंथसंपदा

श्री. माधवाचार्य

श्री. माधवाचार्य हे इ. स. १४ व्या शतकातील एक महापंडित व भाष्यकार होऊन गेले. भारततीर्थ, विद्यातीर्थ व श्रीकंठ असे यांचे तीन गुरू. श्री. माधवाचार्य हे विजयनगरच्या बुक्कराजाचे अमात्य होते. बुक्कराजा हा वैदिक वाङ्मयाचा चाहता होता. त्याला वाटले की वेद हे अर्थज्ञानास कठीण आहेत. त्यांच्यावर भाष्य झाले तरच ते सुगम होतील. ही कल्पना त्याच्या मनात बळावली व त्याने माधवाचार्यांना भाष्यरचनेची प्रेरणा दिली. 'सर्वज्ञ सही माधव' अशी माधवाचार्यांविषयी विदुक्ती आहे. पण ते केवळ विद्यापारंगत होते असे नाही, तर त्यांचे आचरणही शुद्ध, निर्मल, आणि श्रुती-स्मृतींना अनुसरून होते. आयुष्याच्या अखेरीस त्यांनी संन्यास घेऊन विद्यारण्य हे नाव धारण केले. हे दार्शनिक विद्वान होते. त्यांनी सर्वदर्शन संग्रह नावाचा एक ग्रंथ लिहिला असून तो दार्शनिक वाङ्मयाच्या इतिहासात महत्त्वाचा ठरला आहे.

श्री. माधवाचार्य यांच्या सर्वदर्शन संग्रहावरही पू. श्रीदत्तमहाराजांनी मौलिक टीका लिहिली आहे.

प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे चरित्रलेखन श्रीमहाराजांनी रसाळ भाषेत केवळ एक महिन्यात लिहिले. त्याची एक आवृत्ती संपून दुसरी आवृत्ती छापली गेली आहे.

श्री वासुदेवानंह सरस्वती ग्रंथ प्रकाशन

१९५१ साली प.पू.श्री गुळवणी महाराजांकडे श्रीवासुदेवानंद सरस्वती यांचा जन्मशताब्दी उत्सव साजरा करण्याची बोलणी सुरू झाली. त्यावेळी स्वामींचे सर्व वाङ्मय ग्रंथरुपाने प्रकाशित करण्याचा विचार झाला. प. प. स्वामी महाराजांची वाङ्मयसंपदा शक्तिसंपन्न आहे ती पुर्नमुद्रित व्हावी, असे श्री गुळवणी महाराजांना वाटत होते. त्यासाठी संस्कृत जाणकार तज्ञ पाहिजे होता.

प. प. दीक्षीत स्वामीमहाराजांकडे प. प. स्वामी महाराजांची ही वाङ्मयसंपदा  श्रीदत्तमहाराजांनी पाहिली होती. त्यावेळी त्यांनाही वाटत होते की, स्वामी महाराजांचे हे सर्व वाङ्मय प्रकाशित झाले पाहिजे आपण तर अकिंचन. हे कसे जमणार?

प. पू. श्रीगुळवणी महाराजांनी विचारताच  श्रीदत्तमहाराजांना आनंद झाला. त्यांनी तात्काळ संमती दिली. जीवनाचे धागे एकमेकात गुंफलेले असतात. प. पू. श्री गुळवणी महाराज श्रीदत्तमहाराजांना म्हणाले, 'आपण केलेत तर होणार आहे. '

श्रीदत्तमहाराजांनी कार्यवाह पदाची सूत्रे स्विकारली.

पुढीलप्रमाणे प्रकाशन मंडळ स्थापन झाले.

श्रीवासुदेव ग्रंथ प्रकाशन मंडळ

प. पू. श्री. वामन दत्तात्रय गुळवणी महाराज (अध्यक्ष),

ब्रह्मश्री दत्तात्रेयशास्त्री कवीश्वर (कार्यवाह)

मंडळाचे सदस्य

साहित्याचार्य श्री. बाळशास्त्री हरदास,

श्री. शंकर कृष्णाजी देशमुख (आजेगावकर वकील),

श्री. भुजंग बळवंत भालेराव (पुणे),

श्री. विश्वनाथ जोशी वकील, हिंगोली.

श्री. विष्णू अनंत पंची, हैद्राबाद.

श्री. लक्ष्मणराव वरुडकर, वकील,

श्री. नानासाहेब नाईक, उमरेड.

श्री. बापुसाहेब कुबडे, सोलापूर.

श्री. दिगंबर एरंडे, एम. ए. बी. टी., पुणे

माणगावहून, वाडीहून मूळच्या हस्तलिखित पोथ्या आणल्या, टीपा, अर्थ, भाषांतर इ. आवश्यक ते संपादन केले. संस्कृत भाषा म्हणून मुद्रिते काळजीपूर्वक तपासली. या सर्व कार्यात पू. श्रीदत्तमहाराज जातीने सर्व नियोजन करीत होते. बरीच कामे स्वतःच करीत.

त्याशिवाय प. पू. श्री गुळवणी महाराजांकडे कितीतरी आध्यात्मिक पुस्तके प्रास्ताविकासाठी, अभिप्रायासाठी, आशीर्वादासाठी येत असत. श्री गुळवणी महाराज हे सारे लेखनाचे काम दत्तमहाराजांकडे सोपवीत. त्यांनी वाचून दाखविले की सही करीत. शब्दाचाही बदल करीत नसत. कोणाच्या सत्कारानिमित्त बोलणे, आशीर्वादपर बोलणे सारे काही ते  श्रीदत्तमहाराजांवर सोपवीत.

क्रमशः

****************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-११ *

विवाह व गृहस्थाश्रम

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जन्मस्थान वाडी. मौजीबंधन व विवाह वाडीलाच झाला. दत्तपीठाचे अधिकारी दत्तांच्या राजधानीत जन्म घेतात, विद्यार्जन करतात, गृहस्थाश्रम स्वीकारतात. जीवनातील महत्त्वाची कामगिरी ठरलेली, भागवताची सुरवात वाडीमध्येच सुरु झाली, हा विशेष योग आहे. अशा दत्तसांप्रदायी नरसोबावाडीतून दत्तनाम घेऊन दत्तयोगी गुळवणी महाराजांचे दरबारी पू. श्रीमहाराज आले हा विलक्षण योगायोग.

१९३० साली वाडीलाच महाराजांचा विवाह झाला व गृहस्थाश्रमाची सुरूवात झाली. त्यावेळी महाराजांचे वय वीस वर्षाचे होते.

वैराग्याशी जडले नाते। पाठक दुहितेचे। शुभमंगल झाले कवीश्वरांचे ॥

सौ. लक्ष्मीबाई कवीश्वर या पूर्वाश्रमीच्या सुंदरताई भगवंतराव पाठक होत. अंबऋषीकरिता भगवंत ज्या ठिकाणी अवतार घेऊन राहिले तेच बार्शीगाव सुंदरताईंचे माहेर. त्यांचे सातवीपर्यंत शिक्षण झाले होते.

लग्नसोहळा

श्री. भगवंतराव पाठकांनी लग्नाची तयारी मोठ्या हौशीने- उमेदीने केली. सर्व सामानसुमान घेऊन ही मंडळी वाडीला आली. वडील सुंदरला घेऊन प्रथम देवांपाशी गेले. प्रार्थना केली, 'गुरूराया, कृपाहस्त आपुला ठेवा, अन्य मागणे नाही देवा.'

वाडीकरांचे अंगणात माघ वद्य चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर विवाह झाला. चि. कु. सुंदर आता चि. सौ. लक्ष्मीबाई झाल्या. कवीश्वर घराण्यात गणपतीचीही उपासना होती. त्यामुळे लग्न माघी चतुर्थीलाच झाले.

१९३० सालापासून श्रीदत्तमहाराजांच्या वैवाहिक जीवनास सुरवात झाली तीही वाडीतच. सौ. लक्ष्मीबाईंचा वाडीसेवेचा शुभारंभ प्रदक्षिणांनी झाला. आजे-सासूबाई, सासुबाईप्रमाणेच त्याही श्रीपादुकांभोवती प्रदक्षिणा घालू लागल्या. श्रीदत्तमहाराजांनी त्यांना सांगितले की रोज झोपण्यापूर्वी दत्तमहात्म्याचा एक तरी अध्याय वाचीत जा आणि श्रीवासुदेवानंद सरस्वतींच्याही ओवरीत रोज संध्याकाळी थोडावेळ दिगंबराची धून सांगत जा. त्याप्रमाणे त्या वाचू लागल्या.

आपल्या या सुरुवातीच्या पाच वर्षांच्या वाडीतील सांसारिक जीवनाचे वर्णन त्या 'फार आनंदाचा काळ' असे करत.

सौ. लक्ष्मीबाई बालपणीच्या आठवणी काढीत म्हणाल्या. एकदा १९३३ साली श्रीधुंडीराजमहाराज व सौ. आईसाहेबांबरोबर आम्ही उभयता माहुरला गेलो होतो. आमचेबरोबर प. पू. श्रीगुळवणीमहाराज पण होते. माहुरला एक आठवडाभर श्री. विष्णुदासबुवांच्या मठात होतो. बडनेरा, कारंजा, मूर्तिजापूर, वाशिम इत्यादी झाले. कारंजा येथे पूजाअर्चा सर्व यथासांग झाले.

येथपासून श्रीधुंडिराज महाराजांप्रमाणेच त्या श्रीगुळवणी महाराजांच्या सतत सहवासात आलेल्या होत्या. त्यांच्या मूर्तिमंत वात्सल्याचा झरा कवीश्वर घराण्याला सतत लाभलेला आहे. कुठलेही कार्य घ्या, त्यामध्ये श्रीगुळवणीमहाराज नाहीत किंवा त्यांचा सल्ला घेतलेला नाही, असे काही झालेले नाही. सौ. लक्ष्मीबाईंना ते सूनबाईच म्हणत असत.

## पुण्यात बिऱ्हाड

१९३७ साली पू. श्री. दत्तमहाराज, सौ. लक्ष्मीबाई, दत्तमहाराजांची आजी सावित्रीबाई, असे सर्वजण पुण्यात आले. यावेळी श्रीमहाराजांकडे शिकायला काही विद्यार्थी गुरुकुल पध्दतीने रहात असत. त्यामुळे त्यांना जेवू घालण्यात लक्ष्मीबाईंना फार मोठा आनंद वाटे. ह्या गोष्टीचा लक्ष्मीबाईंना कधी कंटाळा आला नाही. हे विद्यार्थीही मोठ्या नम्रतेने वागत. श्रीमहाराजांचेविषयी त्यांना मोठा आदरभाव वाटे. सारी कामे मोठ्या आनंदाने करीत असत.

श्रीमहाराजांचा पहिला मुलगा चार वर्षांचा होऊन देवाघरी गेला. सर्वांनाच विशेषतः मामंजी-सासूबाईंना दुःख झाले. पुढे सुमनचा जन्म झाला. तिच्या पाठीवर अशोक झाला.

माहूर म्हणजे श्रीदत्ताचे जन्मस्थान व रेणुकादेवीचे म्हणजे श्रीमहाराजांच्या कूलदेवतेचे देवस्थान. १९४४ सालची गोष्ट. श्रीमहाराज, सौ. लक्ष्मीबाई, सौ. सासूबाई व मामंजी असे सर्वजण प. पू. श्रीगुळवणीमहाराजांसह पुन्हा माहूरला आले. यावेळेस मुक्काम विष्णुदासबुवांच्या आश्रमात होता. प. पू. श्रीगुळवणीमहाराज अगदी आपलेपणाने साऱ्या गोष्टीत भाग घेत असत. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचा खरोखरीच मोठा आधार श्रीदत्तमहाराजांना प्रथमपासून मिळाला होता.

क्रमशः -

****************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-१२ *

धारवाडहून १९३७ साली परत आल्यावर प. पू. श्रीदत्तमहाराजांनी पुण्यात बिऱ्हाड केले. श्री. शंकराचार्य शिरोडकर स्वामीमहाराज यांच्या सांगण्यावरून मुंजोबाच्या बोळातील मठात मुलांना शिकविण्यासाठी अध्यापक म्हणून जाऊ लागले. पगार फक्त तीस रुपये होता. घरुन धान्य यावयाचे,स्वस्ताई होती, राहणी अगदी साधी होती, त्यामुळे सारे काही व्यवस्थित भागत असे. पू. श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव पहिल्यापासूनच समाधानी असे. पुढे श्री. शंकराचार्यांचे ओळखीने वर्तक वाड्यात जागा मिळाली. लौकीक जीवनात दिसून येणारी अनासक्त वृत्ती गृहस्थाश्रम स्वीकारल्यानंतरही विना दैन्येन्य जीवनम् एवढीच मनोवृत्ती ठेवलेली दिसून येते. अन्न, वस्त्र, निवारा याच जीवनाच्या किमान गरजा त्यांनी ठेवल्या होत्या.

पू. श्रीदत्तमहाराजांनी तीन महिने औरवाडला राहून गायत्री अनुष्ठान केले. त्यावेळी सौ. लक्ष्मीबाई सोवळ्यात सैंपाक करून सोवळ्यातच नदीच्या पात्रातून श्रीमहाराजांना जेवण घेऊन जात.

श्रीमहाराज पुण्यातील वास्तव्यात पहाटे लवकर उठून स्वतःचे पाणी स्वतः तापवून घेत असत. सौ. लक्ष्मीबाईंना वा कोणालाच त्यांचा वैयक्तिक गोष्टीसाठी त्रास नसे. ७ वाजेपर्यंत आन्हिक आटपून विद्यापीठात जाणे होई. ११ वाजता परत आल्यावर उरलेले आन्हिक-पोथीवाचन होई. ते भोजनोत्तर कधी विश्रांती घेत नसत. त्यानंतर शिकवणीसाठी विद्यार्थी येत. साडेतीन वाजता ते विद्यापीठात जाऊन साडेसहा वाजता परत येत. सायंसंध्येनंतर पुन्हा वाचन. संध्याकाळी भेटू इच्छिणारे लोक येत.

प.पू.श्रीगुळवणी महाराजांकडे जाणे असे. इतर सभा-संमेलने असत. रात्री झोपावयास अकरा वाजत असतच. असा सातत्याचा कार्यक्रम असे.

या पुण्याच्या वास्तव्यात प. पू. श्रीगुळवणी महाराजांचा सहवास श्रीदत्त महाराजांना व सौ. लक्ष्मीबाईंना फार लाभला. प. पू. श्री गुळवणी महाराज सकाळी एक फेरफटका मारीत असत. श्रीगुळवणी महाराज वडिलधाऱ्यांच्या मायेने सौ. लक्ष्मीबाईंची व मुलाबाळांची सुध्दा चौकशी करीत.

### १९५७ ची फ्लूची साथ

१९५७ साली पुण्यात मोठी फ्लूची साथ आली. पू. श्रीदत्तमहाराजांचे घरी सर्वजण आजारी पडले. तेव्हा श्रीदत्तमहाराज वार्षिक सप्ताहासाठी औरवाडला गेले होते, त्यांची कन्या चि. शोभा जास्त आजारी झाली. सौ. लक्ष्मीबाईंना ताप होताच व मुलांनाही ताप होता. चि. शोभाचा ताप वाढला म्हणून प. पू

श्रीगुळवणी महाराजांना कळविले. श्रीगुळवणी महाराजांनी सौ. लक्ष्मीबाईंना या कठीण परिस्थितीत धीर दिला. समजावून सांगितले की, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार चि. शोभाला हॉस्पिटलमध्ये ठेवणे आवश्यक आहे. सौ. लक्ष्मीबाई व इतर मुले आजारी असल्याने चि. शोभाला घेऊन स्वतः श्रीगुळवणी महाराज हॉस्पिटलमध्ये गेले. गुळवणी महाराजांचे प्रेमळ धीराचे बोलणे, प्रत्यक्ष सहाय्य ह्यांनी सौ. लक्ष्मीबाईंना भरून आले व अश्रू आवरेनात. केवढा मोठा आधार, दिलासा त्यांना मिळाला होता. परंतु दुर्दैवाने चि. शोभा वाचू शकली नाही.

प.पू. श्रीगुळवणी महाराजांनी ह्यावेळेसही धीर दिला. ते म्हणाले, "सूनबाई, तुला दुःख होणे साहजिक आहे. पण आता शोक आवरला पाहिजे. थोडा विवेक करावयास हवा. बाकीच्या आजारी मुलांकडे पाहावयास हवे. तुझी स्वतःची तब्येत बरी नाही. शिवाय श्रीदत्तमहाराज येथे नाहीत. तेव्हा मन घट्ट कर. मलासुध्दा तुला कसे बोलवावे असे वाटत होते. पण तू इथेच आहेस. साहजिकच तुला आपल्या मुलीला पहावेसे वाटेल, म्हणून तुला इथे आणली. ईश्वरेच्छा समज. जगात अशी एकापेक्षा एक महान दुःखे असतात, तेव्हा दुःख आवर. श्रीदत्तमहाराज जरी येथे नसले तरी त्यांची उणीव भासू न देता मीच त्यांचे ठिकाणी राहून तिचे शेवटचे संस्कार करतो. तू शांत चित्ताने घरी जा!'

ह्या प्रसंगाची आठवण होऊन सौ. लक्ष्मीबाई सांगतात, 'किती वात्सल्ययुक्त शब्द! किती मृदु अंतःकरण! खरंच, महाराजांच्या समजूत घालण्यामुळेच मी थोडातरी विवेक करु शकले. काय सांगावे, सारे काही महाराजांनी केले. पुन्हा माझी समजूत घालण्यासाठी घरी आले.असेही काही परीक्षेचे क्षण आले व गेले. पण सदासर्वकाळ प. पू. श्रीगुरुमहाराजांचा धीराचा हात पाठीशी होता हे विसरता येत नाही.

क्रमशः -

****************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-१३ *

प.पू.श्री गुळवणी महाराजांची शिकवण

पू.श्री. दत्तमहाराज यांच्या पत्नी सौ. लक्ष्मीबाई सांगत की, "संक्रांत, दसरा, पाडवा अशा सर्व शुभदिनी आम्ही सर्वजण श्रीगुळवणी महाराजांकडे जात असू. त्यांच्या हातचा तिळगूळ, सोने घेत असू. ही प्रथा आम्ही पुण्यात आल्यापासून चालू होती. श्रीगुरुमहाराजांचे गोड भाषेत समजावून तळमळीने सांगणे, नेहमीच कानात घुमत राही. मला ते म्हणत, 'तू फक्त एक गोष्ट करीत जा. श्रीदत्तमहाराजांना कोणताही त्रास होईल असे वागू नकोस. ते वैराग्यशील, विवेकी, ज्ञानसंपन्न आहेत. चांगले वागलीस की सर्व श्रेय तुला मिळेल.' हे त्यांचे सांगणे मनाचा आपोआप बदल करीत असे. मुलांना पण ते सांगत, की तुमच्या शिक्षणाचे वगैरे जे काही असेल ते मला सांगा. त्यांना कशात गुंतवू नका. त्यानंतर जी उत्तराधिकारी पदाची धुरा त्यांना दिली आहे ती पाहिली की समजते की, ते ह्यांना इतके का जपत होते. त्यांना बारीक-सारीक

गोष्टींत गुंतवू नये,असे श्रीगुरुमहाराजांना का वाटत होते, हे  त्यांचे एवढे मोठे कार्यक्षेत्र पाहिल्यावर समजते."

श्री शंकराचार्यांकडून सोन्याचे कडे

कुडली शृंगेरीचे जगद्गुरु शंकराचार्यांनी धारवाडला अद्‌वैत ब्रह्मविद्‌या परिषद भारतातील सर्व विद्‌वत्जनांना पाचारण करुन आयोजित केली होती. त्यावेळी पू. श्री दत्तमहाराजांची विद्‌वत्ता पाहून आचार्यसुध्दा स्तिमित झाले होते. त्यांनी  पू. श्रीदत्तमहाराजांचा प्रदीपक शिष्य म्हणून गौरवपूर्वक सत्कार केला. हा सर्व वृत्तांत ऐकल्यावर कांची कामकोटीचे शंकराचार्यसुद्‌धा प्रभावित झाले. त्यांनी आपल्या शिष्यांना श्री महाराजांकडे पाठविले व त्यांनी महाराजांचे हातात सुवर्ण-कंकण घातले. मानाचे हार-वस्त्र दिले. आयुष्यभर रुपये पाचशेचे वर्षासन सुरु केले.

सौ. लक्ष्मीबाईंना स्त्रीसुलभ आनंद झाला. कन्या गेली पण कीर्तीरुपाने ती पुन्हा घरी आली असे वाटले.

पू. श्रीमहाराजांची निर्विकारता कायम होती. सुख व दुःख एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. तेव्हा आपण कशाचाच परिणाम मनावर करून घेऊ नये असे नेहमींप्रमाणे ते गंभीरतेने म्हणाले. पण गंमत अशी की,  श्रीदत्तमहाराजांनी यातले काहीही गुरु महाराजांना सांगितले नव्हते. परिषद समारंभ चांगला झाला. व्यवस्था चांगली होती एवढेच बोलणे झाले होते.प.पू. श्रीगुळवणीमहाराजांना  या गोष्टी पत्राद्‌वारे कळल्या नंतर त्याचा इतका आनंद झाला की त्यांनी पू. श्रीदत्तमहाराजांना व सौ. लक्ष्मीबाईंना जेवावयास बोलावले. स्वतः दत्तमहाराजांचा उत्कृष्ट सत्कार करुन श्रीफळ-हार अर्पण केला. सौ. लक्ष्मीबाईंची शालू देऊन ओटी भरली. हा प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी केलेला सत्कार सौ. लक्ष्मीबाईंच्या जीवनात खरोखरीच अविस्मरणीय असाच आहे. त्यांची भावना प. पू. श्रीगुळवणी महाराजांचेविषयी अशी की, "महाराज म्हणजे परमेश्वरच आहेत आणखी ईश्वराचा शोध तो कशाला ?" सर्व कौटुंबिक बाबतीत श्रीगुरुमहाराज आत्मीयतेने लक्ष देत असत.

पंढरीची वारी

सौ. लक्ष्मीबाईंची खूप दिवसांची इच्छा होती की पंढरीच्या वारीला एकदा पायी जाऊन यावे. एके दिवशी प.पू. श्रीदत्तमहाराजांनी सांगावा केला की,पायी वारी करण्यासाठी पैसे भरलेले आहेत. आता तुम्ही पंढरपूरची पायी वारी करु शकता. सकाळी आळंदीला सौ. लक्ष्मीबाई आपल्या पाचसहा मैत्रिणींबरोबर गेल्या. गर्दी खूप होती. वारीमध्ये चहाची व्यवस्था मात्र नव्हती. सौ. लक्ष्मीबाईंना चहा हवा होता पण काय करणार! कारण इतरजणी जरी म्हणत होत्या, की चहा जवळच्याच कुठच्यातरी हॉटेलमध्ये घेऊ या. हॉटेलमध्ये चहा घ्यावयास सौ. लक्ष्मीबाई तयार नव्हत्या. ह्या त्यांच्या निर्धारामुळे चहा मिळणे कठीण होते. चहा नसल्यामुळे त्यांचे डोके दुखू लागले. तरीही निर्धार कायम होता आणि आता पालखी निघणार म्हणून, 'श्री ज्ञानेश्वर माऊली तुकाराम' असा गजर झाला. एवढ्यात तेथे एक माऊली चहाचा गडवा घेऊन

आली. सौ. लक्ष्मीबाई व इतरेजणांच्या पुढ्यात ठेवून म्हणाली, 'आपल्याला चहा हवा होता ना, म्हणून आणलाय हो!' सर्वजणींनी तो चहाचा गडवा पाहिला. चहा घेऊन होतोय न होतोय, तोच ती चहा घेऊन येणारी माऊली कुठे अदृश्य झाली हे समजलेही नाही. सौ. लक्ष्मीबाईंनी ही सर्व हकिकत पू. श्रीदत्तमहाराजांना वारीहून परतल्यावर सांगितली. त्यावर श्रीमहाराजांनी सौ. लक्ष्मीबाईंना सर्वप्रथम विचारले की, 'चहा देणाऱ्या माऊलीचे आपण पाय धरलेत की नाही? आपण बाहेर हॉटेलात चहा घेणार नाही हा जो निर्धार केलात त्यासाठीच आपली काळजी ईश्वराने घेतली. तो दर्शनच देऊन गेला!' सौ. लक्ष्मीबाईंच्या आता कुठे लक्षात आले. झालेल्या गोष्टींचा अन्वयार्थ समजावयाला वेळ लागला.

क्रमशः -

*****************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-१४ *

अनाकलनीय व्यक्तिमत्त्व

श्री. अशोकराव, श्री. अनिलभाऊ व चि. अजित यांच्या बोलण्यावरून असे कळून चुकले की, प.पू.श्री. दत्तमहाराजांच्या अत्यंत अबोल व निगर्वी स्वभावामुळे त्यांची उंची कळतच नाही. अजित हा सर्वांत लहान व तरुण. नुकताच कॉलेजमधून बाहेर पडलेला. आपले वडील हे आगळे-वेगळे व्यक्तिमत्त्व आहे ह्याची जाणीव त्याला झाली .त्याने पू.दत्तमहाराजांबद्दल पुढील प्रमाणे स्वानुभव सांगितला.

"सकाळची वेळ होती. पुण्यातील एक गृहस्थ आपल्या पत्नीला घेऊन पिताजींकडे आले होते. बाई सांगत होत्या. 'काल रात्री प. पू. श्रीगुळवणीमहाराज स्वप्नात आले. त्यांनी सांगितले की आपणाला जो काही त्रास होत आहे तो वर्तक इंजिनिअरांच्या बंगल्यात श्रीदत्तमहाराज रहातात त्यांना जाऊन सांगा. ते योग्य तो इलाज करू शकतील, म्हणून आपल्याकडे आलो आहोत. मला अशा क्रिया होतात की एकदन बेचैन व्हावयास होते. आपण काही उपाय सांगावा म्हणून आपल्याकडे आलो आहोत."

पिताजी डोळे मिटून बसले होते. ते त्यांनी उघडले नाहीत किंवा एक शब्दही ते बोलले नाहीत. आलेल्या पती-पत्नींचा आवाज वाढत होता. शेवटी त्या बाईचे पती म्हणाले, "अहो यांना इतका त्रास होतो आहे हे आता तुम्ही पहाता आहात, तरी बोलत कां नाहीत? आपल्याकडे आम्हाला श्रीगुळवणी महाराजांनी स्वप्नांत दृष्टान्त देऊन पाठवले आहे!" तरीही पिताजी काहीच बोलत नव्हते.

मलासुध्दा वाटू लागले की हे काय आपले पिताजींचे? एवढी तळमळून ती माणसे बोलतायत हे काहीच कसे बोलत नाहीत? मला मनापासून त्यांचा राग आला. आपणच आपल्या वडिलांना म्हणावे की, सांगा ना त्यांना काहीतरी.

इतक्यात पिताजींनी डोळे उघडले. त्या बाई हळूहळू पूर्ण शांत झाल्या, स्वस्थ झाल्या.

हे सर्व स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्यावर हे न बोलताही केलेले कार्य पाहून मी खरोखरी थक्क झालो, हे सामर्थ्य काही अलौकिकच आहे याची प्रचिती आली.

पू. श्रीमहाराजांच्या साध्या राहाणीचा आणखी एक अनुभव त्यांच्या कन्येकडून मिळाला तो असा.

माटुंग्याच्या सौ. सुलभाताई सांगतात की, सकाळी लवकर उठून आपले आन्हिक आटपून कॉफी घेऊन आमचे वडील विद्यापीठात जात. ते कॉफी घेऊन गेले की मग आम्ही कॉफी घेत असू. एकदा असे झाले की मी व माझी भावंडे कॉफी घेण्यास बसलो. एकदम आईपाशी गिल्ला केला की, हे काय आई, कॉफीत साखर घातली नाहीस, कसली ही कॉफी?" आई म्हणाली, "अरे बापरे! म्हणजे 'हे' तसेच कॉफी पिऊन गेले. काही बोलले नाहीत. काय बाई स्वभाव हा!"

वडील दुपारी आल्यावर आई म्हणाली, "हे काय, आपण सकाळी कॉफीत साखर नाही हे बोलला नाहीत!" त्यावर श्रीमहाराज उद्गारले, "त्यात काय बोलावयाचे. घाईत रहाते एखादेवेळी!", वडिलांचे हे शब्द ऐकल्यावर आम्हाला आम्ही केलेला गिल्ला आठवला. लाज वाटली. वडिलांच्या साधेपणाने मन भरून आले. सर्व चुका सांभाळून घेणारे, अबोल व म्हणून अनाकलनीय असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे.

पू श्रीमहाराजांच्या सुनांना सुध्दा बोलते करावे लागले. त्या म्हणतात, आमचे मामंजी आम्हाला कधीच रागावत नाहीत. आमच्या मुलाबाळांचे ते कौतुक करतात, त्यांना जवळ घेतात यातच आम्ही आमचे भाग्य समजतो . नामात रहावे, संध्याकाळी देवापुढे निरांजन, उदबत्ती लावून करुणात्रिपदी म्हणावी, असे त्यांचे सांगणे असते. दोन्ही चतुर्थीचे उपवास आम्ही करतो. देवाला हळदीकुंकू वाहणे, तीर्थ घेऊन मगच जेवायला बसणे, असे साधे धार्मिक उपचार करणे, ही पध्दत त्यांनी लावून दिली आहे. नाम-जप कमीत कमी एकवीस वेळा तरी सर्व मुलेबाळे मिळून करतो. अशी त्यांची साधी शिकवण आहे.

सुना, मुली मुलगे- जावई, नातवंड व पतवंडांनी भरलेल्या संसारात श्रीमहाराजांचे वागणे करुन-सवरुन अकर्तेपणाचे आहे. पद्मपत्राप्रमाणे त्यांची राहणी आहे. अनाक्रोश असा परमार्थ चालू आहे. क्षमाशील वृत्ती अंगी मुरलेली आहे.

श्रीमहाराजांचे वागणे बघितल्यावर एकनाथमहाराजांची आठवण येते. श्रीमहाराजही संसाराचा व परमार्थाचा गाडा सारखाच चालवत आहेत, ते एकनाथांसारखे शांतिसागर आहेत म्हणूनच!

संसारापासून लांब न पळता, तो न सोडता वा त्याची घडी न विस्कळता चाललेला हा परमार्थाचा पसारा पाहिला की वाटते कुटुंबाची, समाजाची घडी नीट बसावी असे वाटत असेल तर त्यादृष्टीने या व्यक्तिविकासाचा विचार करावयास हवा.

क्रमशः -

*****************************************

साधी राहणी

अनासक्त जीवन हे  पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाचे वैशिष्ट्य आहे. अनासक्त जीवन ओळखायला आपण सामान्य माणसे त्यांच्या बहिरंगाकडेच पाहतो. पण ते पाहतानासुध्दा जे वेगळेपण आपल्यासारख्या सामान्यांना कळते ते त्यांच्या साध्या राहणीतून. धोतर, अंगावर उपरणे, पायात काही नाही, हा कित्येक वर्षे पाहत असलेला त्यांचा पेहराव होता. थंडी वगैरे असली तर अंगावर फार तर शाल घेत. स्वेटर, मफलर कधी वापरली नाही. कुठेही प्रवासाला जा, एखादी पडशी बरोबर असली की त्यात सगळे असते. बॅग दिली तरीही वापरणार नाहीत. उपरण्याचे गाठोडे स्वतःच हातात घेणार. तेही कुणाला घेऊ देणार नाहीत. कारण त्यात नित्य वाचनाची पोथी व थोरल्या महाराजांचा फोटो असे. काही कपडा अंगात घालायचा असला तर प्रवासात रात्री घालण्यासाठी फक्त एक कुडता. हे सर्व साधेपण पाहिले, त्याबरोबरच त्यांची विद्वत्ता पाहिली, की मन थक्क होऊन जाते!

साध्या राहणीबरोबरच स्वावलंबन हा गुण अंगी बाणलेला होता. आपले पाणी आपण तापविणे, आपले कपडे आपण धुणे, आपले सामान आपण उचलणे या सवयी,अंगी पूर्ण बाणवून घेतल्या होत्या. जीवनाच्या गरजा,अन्न, वस्त्र व निवारा त्याही त्यांनी किमान ठेवल्याचा प्रत्यय येतो. कधी चांगले कपडे घालावे असे वाटलेच नसेल का, असा विचार मनात येतो, तोच त्यांच्या सहज बोलण्यातून ऐकलेल्या गोष्टीचे स्मरण होते व प्रश्नाचे उत्तर आपोआप मिळते.

पू.श्रीदत्तमहाराज म्हणायचे, पुण्यात आलो तर आमचे कोण होते? पण परमेश्वरीकृपेने जागेपासून सगळे होत गेले. प. पू. श्रीगुळवणी महाराजांचा आधार मिळाला. स्वतःकडे कर्तृत्त्वाचा अहंकार घेतला की परमेश्वर लक्ष घालीत नाही, हे तर पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाचे प्रमुख सूत्र आहे.

परमेश्वराशी अंतरंगाने जोडलेले सत्पुरुष व्यावहारिक जीवनात असे साधेपणाने वागतात. हे अंतरंग ओळखायला ज्ञानवंत मनुष्य हवा. संत भेटणे कठीण. भेटले तर ते ओळखणे कठीण. पू.श्रीदत्तमहाराजांचे अंतरंग ओळखणे असेच फार कठीण होते. निंदा व स्तुती समान मानणे हे फार अवघड व्रत आहे. पण श्रीमहाराजांच्या बाबतीत हे गुण त्यांच्या जीवनात ठळकपणे प्रत्ययास येतात.

१९४५ साली टिळक महाराष्ट्र विद्यापीठात पू. श्रीमहाराजांना शास्त्री म्हणून नोकरी लागली. पगार एकशे साठ रु. मिळत होता. न्याय व मीमांसाशास्त्र हे विषय ते शिकवित असत. त्यावेळी घडलेला प्रसंग पू. श्रीमहाराजांच्या अनासक्त वृत्तीची साक्ष देतो.

एकदा देऊळगावराजाला गेल्यावर  श्रीमहाराजांना ताप येऊ लागला. विद्यापीठात जाता येईना म्हणून तात्पुरती दोनतीन दिवसांची रजा मागितली. तो ताप विषमज्वराचा निघाला. त्यामुळे त्यांनी

वैद्यकीय दाखला पाठवून जास्त दिवस रजा मागितली. ती रजा बिनपगारी झाली. वैद्यकीय रजा असूनही मंजूर केली गेली नाही. पगारही त्यामुळे दिला नाही.

पू. दत्तमहाराज काही बोलले नाहीत, की कुणालाही दोष दिला नाही. ही गोष्ट विद्यार्थ्यांना समजल्यावर त्यांनी पाचशे रुपये जमविले. साऱ्या विद्यार्थ्यांनी आपली इच्छा प्रकट केल्यावर दत्तमहाराजांनी विरस होऊ नये म्हणून फक्त २५० रुपये घेतले. त्याहून अधिक घेण्याचा मला अधिकारच नाही. ते पैसे तुम्ही ठेवून द्या. एक शिक्षकनिधी तयार करा. त्यातून गरजू शिक्षकाला जसे लागेल तेव्हा त्याच्या अडचणीसाठी पैसे देता येतील अशी व्यवस्था करा, असे सांगितले!

पुण्यात आल्यावर प.पू. श्री.गुळवणी महाराजांकडे जाणे येणे हे जास्त वाढले. श्री गुरुमहाराजांचे लक्षही त्यांचेकडे वाडीपासूनच होते. १९०७ पासून गुरुद्वादशीला गुरुमहाराज वाडीला जात. श्रीदत्तमहाराजांच्या आईला गुरूमहाराज बहीण मानीत असत, भाऊबीज घालीत असत. दिवाळीच्या वेळी त्या श्रीगुरू महाराजांना तेल लावीत व स्नानाला ऊन पाणी देत. दिवाळीच्या दिवशी ब्रह्मचारी व संन्याशानेसुध्दा गार पाण्याने स्नान करु नये असे सांगत असत. असे घरोब्याचे संबंध प्रथमपासूनचे कवीश्वर घराण्याचे व गुरू महाराजांचे होते. पुण्याला वास्तव्य झाल्यावर ते अधिकाअधिक घनिष्ट झाले. श्रीगुरुमहाराजांची सहस्त्रदर्शन शांती, रौद्री शांती व रौप्यतुला हे सारे उत्सव पू. श्रीदत्तमहाराजांचे संकल्प होते. श्रीदत्तमहाराजांचा गौरव झाला की, श्रीगुरुमहाराजांना फार आनंद होई, जणू आपलाच गौरव झाल्यासारखे त्यांना वाटे. श्रीगुरुमहाराज घरगुती, कौटुंबिक सत्कार करीत व आशीर्वाद देत असत.

क्रमशः -

****************************************

## ⁎ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-१६ ⁎

श्रीवासुदेव निवास

प. पू. श्रीगुळवणी महाराजांचा आश्रम असावा, अशी पू. श्रीदत्तमहाराजांची फार इच्छा होती. पण श्रीगुरुमहाराजच या गोष्टीला तयार नव्हते. त्यांना वाटे, 'नको हा व्याप!' श्रीदत्तमहाराजांनी त्यांना समजावून सांगितले की, 'आपल्याकडे येणाऱ्या मंडळींची गर्दी फार वाढली आहे. चाळीत सोवळे ओवळेही टिकत नाही. तेव्हा स्वतंत्र वास्तू असणे आवश्यक आहे! '

तो अचानक घटना घडली. वाईटातून चांगले निघाले. स्वामी महाराजांच्या पुण्यतिथीच्या वेळी पानशेत धरण फुटले. सगळीकडे पाणीच पाणी झाले. नदीला पूर आला आहे असेच वाटले. धरण फुटल्याची कल्पना प्रथम आली नाही. श्रीगुरुमहाराजांकडे उत्सवाची गडबड सुरु झाली होती. श्रीगुरुचरित्र आदि वाचन चालले होते. तेवढ्यात पाणी आले असा आरडाओरडा झाला. म्हणता म्हणता गोवईकरांचे चाळीत पाणी

येऊन गळ्यापर्यंत आले. श्रीगुळवणी महाराजांना हात धरून लोकांनी बाहेर काढले. श्रीजगन्नाथगुरुजींच्या सिध्दमाता मंदिरात श्रीगुरुमहाराजांना आणले. देव,पोथी- चष्मा काही आणता आले नाही, याचे महाराजांना फार वाईट वाटले. देव मिळेपर्यंत श्रीगुरुमहाराजांनी उपोषण केले. दुसऱ्या दिवशी तर पुण्यतिथी होती.

पुराचे पाणी ओसरल्यावर रात्री जाऊन लोकांनी अक्षरशः मातीतून देव शोधून काढले. देव म्हणजे घरातील प्रसाद पादुका, तुळजाभवानी, पोथी,चष्मा, सारे काही सापडले. श्रीगुरूमहाराजांना अतिशय आनंद झाला. पुण्यतिथी महाराजांनी आनंदाने साजरी केली.

त्या दिवशी मात्र श्रीगुरुमहाराजांना वाटू लागले, आपले भाग्य थोर म्हणून देव मिळाले. देवांची व्यवस्था नीटनेटकी करावयास हवी. गोवईकरांची चाळ ही संपूर्ण पडली होती. शिवाय पू. श्रीदत्तमहाराजांचे म्हणणे होतेच की, शास्त्रवचनाप्रमाणे गुरुंचे नावे आश्रम बांधणे मोठे पुण्यकर्म आहे, तेव्हा आता देवासाठी तरी काही सोय करणे आवश्यक आहे.

श्रीगुरुमहाराज नेहमी म्हणत असत की, श्रीदत्तमहाराजांचा संकल्प नेहमीच खरा होतो. ‘सत्य संकल्पाचा दाता भगवान, ' असे ते म्हणत असत.

पू. श्रीदत्तमहाराजांनी संकल्प केला. आश्रम झाला. अनेक साधकांची, मुमुक्षूंची सोय झाली. लोकांची रीघ लागली. पाणपोईच जणू घातली. तृषार्तांनी यावे व आपली तहान भागवून जावे. आश्रमात भजने, कथाकीर्तने, यज्ञयाग, भागवत सप्ताह, नामजप अशी अनेक कार्ये घडू लागली. आश्रम भक्तमंडळींनी सदा भरून जात असे. साधनाकरिता अनेक मंडळी आश्रमात पहाटेपासून येत.

श्रीदत्तमहाराजांचे वडील व श्रीगुरु महाराज यांच्या वयात अवघ्या सहा महिन्यांचा फरक होता. त्यामुळे सहस्त्रचंद्रर्शन शांती, रौद्री शांती हे सारे उत्सव आधी श्रीधुंडिराज महाराजांचे झाले आहेत नंतर सहा महिन्यांनी गुरूमहाराजांचे झाले आहेत.

या महोत्सवांचे मुख्य सूत्रधार पू. श्रीदत्तमहाराजच होते व सर्व धार्मिक कार्याची जबाबदारी त्यांच्याकडे असे. भारतातून मोठेमोठे अधिकारी विद्वान गुरुजन बोलाविले जात असत. त्यांचे आदरातिथ्य, सन्मान करणे हे काम पू.श्रीदत्तमहाराजांचे होते. असे महान धार्मिक कार्यक्रम श्रीगुरुमहाराजांचे, श्रीदत्तमहाराजांनी पुढाकार घेऊन केले. ते सर्व कार्यक्रम पाहून साधकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. खूप आनंद साधक मंडळींनी लुटला होता.

'वासुदेव निवास' हे साधकांचे आधारस्थान झाले आहे. संसारापासून थोडे बाजूला जाऊन दोन दिवस ईश्वरचिंतनात घालवायचे म्हटले तर निवांत जागा आहे. हा साधकांना मोलाचा, प्रेमाचा आसरा झाला.

क्रमशः -

*************************************

श्रीवासुदेव निवासातील भागवतसोहळा

प. पू. श्रीगुळवणी महाराजांची फार दिवसांची इच्छा होती की, भागवत सप्ताह करावा. पण गोवईकरांच्या दोन खोल्यांच्या जागेत हे शक्य नव्हते. श्रीवासुदेव निवास झाल्यावर महाराजांची ही इच्छा पुरी होण्याचा योग आला. महाराज येणाऱ्या जाणाऱ्या साधकांना, भक्तांना सांगू लागले, की यंदा भाद्रपदात भागवत सप्ताह करावयाचा आहे, अगदी लग्नासारखा सोहळा करावयाचा आहे, सर्वांनी यायचे बरे का! प. पू. श्रीवामनरावजी गुळवणी महाराजांची उत्सवाची पद्धत फार आखीव रेखीव नीटनेटकी असे. तयारीला सुरूवात झाली.

श्रीगुरुमहाराज फार प्रसन्न होते. पण त्याच वेळी पुण्यात जातीय दंगल उसळली. कर्फ्यू जारी झाली. दुकाने, मंडई बंद झाली. श्रीगुरुमहाराज थोडेच व्यथित होणार ? 'सत्य संकल्पाचा दाता भगवान' असे म्हणून ते शांत होते. मुंबईच्या काही लोकांना प्रेरणा झाली. ते भाजीपाला, केळीची पाने, भरपूर फुले, तुळशी हे सर्व साहित्य बरोबर घेऊन आले. श्रीगुरूमहाराजांना मोठा आनंद झाला.

तो आदला दिवस. श्रीगुरूमहाराज सभामंडपात शिरल्यावर उजवीकडील खिडकीच्या बाजूला येऊन स्थानापन्न होत. श्रीदत्तमहाराज आले. श्रीगुरुमहाराजांना नमस्कार करू लागले. श्रीगुरूमहाराज म्हणाले, “आज आपण व्यास आहात. आम्हीच आपणाला नमस्कार करणार"

उदबत्त्यांचा घमघमाट, निरांजनांच्या अनंत ज्योती, सगळीकडे घातलेले सुगंधी फुलांचे हार, विजेची माफक पण नेत्ररम्य रोषणाई. सारे कसे प्रसन्न वातावरण !

देव्हाऱ्यातील आई भवानीदेवी मोठी प्रसन्न झाली. हसू लागली होती. श्रीदत्तमहाराजांच्या मस्तकी कोणाच्या न कळत तिने मंत्राक्षता टाकल्या.प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती व प.प.श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांच्या प्रतिमेत मंद स्मित विलसू लागले. अनेक देवता गुप्तपणे आपापल्या जागी येऊन स्थानापन्न झाल्या. श्रीगुरुमहाराजांनी  औक्षण करा असे सांगितल्यावर, सौ. गोदूताई, दुर्गाताई, माई क्षीरसागर इ. सर्वांनी चांदीच्या निरांजनांनी श्रीदत्तमहाराजांना ओवाळले.

समारंभाचा असा थाट झाल्यावर श्रीदत्तमहाराजांच्या मुखातून ज्ञानगंगा वाहू लागली. श्रोत्यांच्या जनमानसापर्यंत पोचू लागली. श्रीज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे-

ऐक रसाळपणाचिया लोभा। की श्रवणींची होती जिभा |

बोले इंद्रिया लागे कळंभा एकमेका ||१६||

सहजे शब्दू तरी विषोश्रवणाचा । परी रसना म्हणे हा रस आमुचा |

घ्राणांसि भावो जाये परिमळाचा हा तोचि होईल ||१७||

ज्ञानेश्वरी ६वा अध्याय.

साऱ्या ज्ञानेंद्रियांनी लोक श्रवण करीत होते. या उत्सवाचे वैशिष्ट्य असे की, काही प्रसंग भावनिर्मितीसाठी मोठ्या प्रेमाने, अगत्याने केले होते. गोवर्धन पर्वताची पूजा हा प्रसंगसुद्धा मोठ्या भावभक्तीने केला गेला. लाह्यांचा मोठा पर्वतासारखा उंचवटा करून त्याच्या अवतीभोवती सुरेख सजावट केली होती. श्रीगुरूमहाराजांनी स्वतः त्यावेळी फुलांची आरास केली होती. सुंदर कुंड्या मोठ्या सौंदर्यपूर्ण दृष्टीने लावल्या होत्या. फळेफुले आकर्षकपणे लाह्यांच्या भोवती मांडली गेली. त्यावर गोपाळकृष्णाची मूर्ती सालंकृत करून ठेवली होती. गोवर्धनाची पूजा पुण्याहवाचन बसवून एका दांपत्याने केली. तुलसीविवाह असाच झाला. मंगलाष्टके म्हणायला चार ख़ास पुरोहित होते. त्यानंतर आशीर्वादाचे मंत्र म्हणायला सहा वेगळे ब्राह्मण होते.  लग्न लागल्यावर बँड काही वेळ निनादत होता. अत्तर, गुलाबाची फुले, बत्तासे असे सारे काही होते.

श्रीव्यासपूजेचा शेवट गुरूजींच्या मंत्रोपचाराने व पूजेने साजरा झाला. प्रसाद झाला. फळे, हार, उदबत्त्या, निरांजने या सर्वांची उत्तम व्यवस्था. प. पू. श्रीगुरूमहाराजांचा नीटनेटकेपणा प्रत्येक गोष्टींत दिसून येई. श्रीगुरूमहाराजांनी शांत स्थिर प्रसन्न मनाने सारे श्रवण केले. दिगंबराची धुन आळवीत सारेजण भागवताच्या मिरवणुकीत सामील झाले. गीता पठण होऊन शेवटी हा सोहळा संपूर्ण झाला.

पू.श्रीदत्तमहाराजांचे वाचन, निरूपण म्हणजे गंगेच्या ओघाप्रमाणे श्रवणसंपुटावर येणारा एक स्त्रोतच होता. श्रोते, वक्ते प्रसन्न झाले. पहिला सप्ताह दत्त अमरेश्वर मंदिरात प. पू. श्रीदीक्षितस्वामींसमोर झाला. श्रीवासुदेव निवास स्थापन झाल्यावर योगीराज गुळवणी महाराजांचे सान्निध्यात हा भागवतसप्ताह झाला. श्रीगुरूमहाराज प्रसन्न झाले. दरवर्षी तितक्याच उत्कटतेने भागवत सप्ताह श्रीवासुदेव निवासात सुरू झाला. श्रीदीक्षितस्वामी महाराजांनी सुरू केलेली ही गंगा वासुदेव निवासामध्ये वहात राहिली.

क्रमशः -

*********************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-१८ *

श्रीभागवत सप्ताहाचे अमोघ सामर्थ्य

प पू व्यासांनी आपल्या समाधि अवस्थेत श्रीकृष्णचरित्राचे चिंतन केले. ते आपल्या बुद्धीने जाणून घेतले. मग ते चरित्र लिहिले असे हे भक्तिपूर्ण भागवत म्हणजे ईश्वरभक्तीने भारलेला ग्रंथ असे पू. श्रीदत्तमहाराजांचे मत होते.

पहिला सप्ताह अमरेश्वर येथे श्रीदीक्षितस्वामींच्या समोर १९२६ साली वयाच्या १६ व्या वर्षी श्रीमहाराजांनी केला. प. पू. श्रीदीक्षितस्वामींच्या सांगण्याप्रमाणे तो दरवर्षी भाद्रपद महिन्यात अमरेश्वर येथे जाऊन चाळीस वर्षे सातत्याने केला. १९५० सालापासून बाहेरचेही भागवत सप्ताह सुरू झाले. बाहेरगावचा असा पहिला सप्ताह खर्डी येथे झाला. प. पू. श्रीदीक्षितस्वामींच्या समोर जसा पहिला सप्ताह झाला. त्याचे वर्णन ऐकूनही काना, मनाला तृप्तता आली, तसाच एक सुंदर भागवत सप्ताह महोत्सव पाहण्याची प्रथम संधी अनेकांना श्रीवासुदेवनिवासात मिळाली.

पूजनीय श्रीदीक्षितस्वामींचे आशीर्वाद असे सुफलित झाले. त्यावेळी असलेल्या श्रीदत्तात्रेयशास्त्र्यांचे रूपांतर पूजनीय श्रीवामनरावजींनी दत्तमहाराजांत केले.

जैसा पंचमालापु सुगंधु । की परिमळू आणि सुस्वादु

प. पू. श्रीगुरुमहाराजांचा व पू. श्रीदत्तमहाराजांचा साधारणपणे साठ वर्षांचा सतत सहवास घडला,याला श्रीज्ञानेश्वर महाराजांनी म्हटल्याप्रमाणे- गोड पंचमाला सुगंधाची जोड आणि सुगंधाला उत्तम चव ह्याप्रमाणे गुरुदेव व श्रीदत्तमहाराजांचा सहवास परस्पर कल्याणकारी झालाच, पण सामान्यजनांना तो सतत मिळत राहिला.

पू. श्रीदत्तमहाराजांविषयी असलेली आपुलकी श्रीगुरुमहाराजांच्या साध्या वागण्यातूनही दिसून येई. श्रीदत्तमहाराज जेवावयास येणार असले तर श्रीगुरुमहाराज आधी जेवत नसत. श्रीदत्तमहाराज पायात काही घालत नाहीत याचेही श्रीगुरुमहाराजांना फार वाईट वाटे. उन्हाचे जाऊ नका असे मायेने म्हणत असत. रिक्षा आणून देण्यासाठी सांगत. श्रीगुरुमहाराज इतरांना सांगत की, श्रीदत्तमहाराज फार भिडस्त आहेत. ते कोणाला काही सांगणार नाहीत, तेव्हा आपणच त्यांची काळजी घेतली पाहिजे.

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती यांच्या जन्मशताब्दि उत्सवानिमित्त त्यांचे ग्रंथ पुनर्मुद्रित करण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या कामगिरीपासून तो श्रीवासुदेव निवास स्थापन होईपर्यंत अनेक महत्त्वाची कामे पू. श्रीदत्तमहाराजांनी केलेली आहेत. श्रीवासुदेव निवासचा संकल्पच मुळी श्रीदत्तमहाराजांनी लिहिला आहे. पं. श्रीआत्मारामशास्त्री जेऱ्यांसारखी मंडळी व इतरही थोर अधिकारी व्यक्ती श्रीदत्तमहाराजांना श्रीगुरुमहाराजांचे मानसपुत्रच संबोधित असत.

गृहस्थाश्रम अनासक्त वृत्तीने, जबाबदाऱ्या न चुकविता चालला होता. श्रीगुरुसेवाही अशी अखंड चालूच होती. अध्यापन व ज्ञानार्जन अव्याहतपणे चालूच होते. संसारात अनुकूल-प्रतिकूल घडत होते. त्यांच्या विद्वतेचा नांवलौकिक महाराष्ट्रातच नव्हे, तर संबध देशभर सर्वत्र होत होता. वडील, मातोश्री व श्रीगुरुमहाराज यांना धन्यता वाटत होती. समाधान वाटत होते. पू. श्रीदत्तमहाराज जसे गुरुभक्त तसेच मातृपितृभक्त होते. आपल्या ईश्वरी प्रसादाने झालेल्या या पुत्राचे हे सारे कार्य पाहून मातोश्री तृप्त झाल्या.

मातृवियोग

या मातृवियोगाबद्दल बोलताना पू श्री दत्तमहाराज भारावत असत. त्यांच्या मातोश्री त्यावेळी विदर्भ मराठवाड्याकडे होत्या. शेगावचे जसे श्रीगजानन महाराज तसेच तेथे श्रीसखाराम महाराज म्हणून फार मोठे संत होऊन गेले. त्यांचा पुण्यतिथी उत्सव मोठ्या थाटामाटाने होतो. खूप अन्नदान होते. त्या उत्सवाला आईसाहेब गेल्या होत्या. तेथून त्या जालन्याला परत गेल्या व आजारी झाल्या. त्यातच त्यांचे देहावसान झाले. श्रीदत्तमहाराजांना पुण्याला तार आली. तार आल्याबरोबर ते महाराजांना सांगण्यासाठी गेले. श्रीगुरूमहाराज लगेच म्हणाले. "बरे झाले. त्यांच्या इच्छेप्रमाणे झाले. अलिकडे त्या कोणाही सतपुरुषाकडे, 'मला आधी जाऊ दे', हा आशीर्वाद मागत असत. तो फळाला आला व अहेवपणी जाण्याची त्यांची इच्छा पुरी झाली!'

पू. श्रीदत्तमहाराजांच्या पिताजींना मातोश्री नेहमीच म्हणत असत की, 'मला अग्नी तुम्ही द्या'. श्रीधुंडिराज महाराज म्हणत, 'ते काम दत्तात्रेय बघतील.' त्या भाग्यवान माउलीची तीही इच्छा पूर्ण झाली. त्या गेल्या त्यावेळी  पू. श्रीदत्तमहाराजही जवळ नव्हते, त्यांचे भाऊही नव्हते, शेवटी योग असा आला की श्रीदत्तमहाराजांच्या पिताजींना अग्नीसंस्कार करावे लागले. मातोश्रींच्या मनात जी जी इच्छा होती ती पुरी झाली.

क्रमशः -

****************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-१९ *

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभ

प. पू. श्रीगुळवणी महाराजांनी मोठ्या हौसेने, अगत्याने, आपुलकीने श्रीदत्तमहाराजांचा पष्ठ्यब्दी समारोह करण्याचे ठरविले. एक सुंदर कार्यक्रम आश्रमात घडवून आणला.पू. श्रीदत्तमहाराजांनी आजपर्यंत अनेक समारंभाचे नियोजन केले होते. हे काम यावेळी स्वतः गुरूमहाराजांनी केले. दुपारी सत्कार समारंभासाठी एस. पी. कॉलेजचा हॉल घेतला होता. सभास्थान खऱ्या अर्थाने सुशोभित दिसत होते. एका बाजूला योगीराज श्रीगुळवणी महाराज, तर दुसऱ्या बाजूला तितकेच अधिकारी असे श्रीदत्तमहाराजांचे पिताजी,  श्रीधुंडिराजशास्त्री होते. श्रोतृवर्गाच्या डोळ्यांचे अक्षरशः पारणे फिटले. अनेकांची पू. श्रीदत्तमहाराजांच्या गौरवार्थ भाषणे झाली. विशेषतः श्रीगुरुमहाराज कधीही समारंभात बोलत नसत. पण या समारंभात माईक हातात घेऊन ते स्वतः चार शब्द बोलले. श्रीगुरूमहाराजांनी आशीर्वाद तर दिलाच, पण यापुढील आश्रमाची संपूर्ण जबाबदारी आपणांवर आहे, आपणच ती धुरा हातात घ्यावयाची आहे, शेवटपर्यंत

सांभाळायची आहे, अशा तऱ्हेचे आर्शीवादाचे शब्द त्यावेळी श्रीगुरुमहाराजांच्या मुखातून बाहेर पडत होते. ती देववाणीच होती. श्रीगुरूमहाराजांचे चार शब्द खरेच, कानामनाची तृप्ती करून गेले!

शक्तीपात दीक्षा

गीतेच्या अठराव्या अध्यायात शेवटी श्रीकृष्णांनी सर्व उपदेश अर्जुनाला करून झाल्यावर अर्जुनाला आलिंगन दिले. अर्जुनाची समाधी लागली. 'नारायणे विश्व कोंदले' ही अनुभूती आली.

आत्मस्वरूपाचा बोध जो प्रत्यक्ष केला होता त्याचा अनुभव आला व तो आत्मस्वरूप काय हे जाणू लागला. प्रत्यक्ष श्रीकृष्णांनी केलेल्या स्पर्शामुळे त्याला अनुभव आला. हा स्पर्श शक्तीपातच आहे, असे अध्यात्म ज्ञानी लोकांचे म्हणणे आहे. श्रीज्ञानेश्वरांनी शक्तिपात रहस्याची उकल अशी बहारदार केली आहे.

श्रीसमर्थ रामदास स्वामींचा दासनवमी उत्सव गडावर चालू होता. प. पू. श्रीधरस्वामींकडून निरोप घेऊन माणूस पुण्याला आला. आपणाला श्रीदत्तमहाराजांना घेऊन सज्जनगडावर येण्यास सांगितले आहे, असे गुरुदेवांकडे येऊन सांगू लागला.

पू. श्रीदत्तमहाराज त्यावेळी आजारी होते. त्यांना फार ताप येत होता. अशक्तपणा होता. प. पू. श्री श्रीधरस्वामींकडून मुद्दाम बोलावणे आले आहे. तेव्हा तुम्ही जरूर जा, असा सल्ला श्रीगुरुमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांना दिला. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांचे वडील पुण्यातच होते तेही म्हणाले, "संताचे बोलावणे आहे तेव्हा जरूर जा तुम्हास बरे वाटेल."

ताप व अशक्तपणा असतानाही आलेल्या मनुष्याबरोबर श्रीदत्तमहाराज निघाले. प्रकृति ठीक नाही तर डोली करून या, असा प. पू. श्री श्रीधरस्वामींचा निरोप आला. डोलीतून येणे स्वभावाच्या विरुद्ध होते. अखेरीस तसेच वर गेले. दुसऱ्याच दिवसापासून ताप उतरून हुशारी वाटू लागली. श्रीगुरुमहाराजांचे व वडिलांचे शब्द खरे ठरले.

तिथे एकारात्री मध्यरात्रीनंतर श्रीदत्तमहाराजांना दृष्टांत झाला. श्रीगुरू महाराज स्वप्नी आले. पहाटेची वेळ होती. 'बसा' म्हणाले आणि भ्रूमध्यावर स्पर्श केला. श्रीदत्तमहाराजांना जोरदार क्रिया होऊ लागल्या. श्रीदत्तमहाराज सांगतात की,पातंजली योगसूत्रात सांगितलेल्या प्राणायामाच्या आठ प्रकारांपैकी उन्जाई प्राणायामाचा अनुभव आला. रेचक पूरक जोरदार होऊन कुंभक होऊ लागला. अत्यंत सुखद अनुभव आला. फार बरे वाटले पण तरीही मनात कुठेतरी विचाराची पाल चुकचुकली. हे सर्व मिळाले आहे, आता पुन्हा कशाला? लगेच आठवले. 'ही देण्याघेण्याची गोष्ट नसून ईश्वरी इच्छा आहे' हा अनुभव गडावरूनच महाराजांना पत्राद्वारे कळविला. श्रीगुरूमहाराजांचे उलट टपाली उत्तर आले, “स्वामी महाराजांची आपणांवर कृपा झाली आहे!”

'अनादिष्टस्य शास्त्रस्य स्वतएव प्रबोधनम्' श्रीदत्तमहाराज यापुढचा जो स्वानुभव सांगतात तो फार मोलाचा आहे. या कुंभकाचा त्यांना फार उपयोग झाला. प्रवासातील दगदग, छातीत दुखणे यापासून कुंभकाने खूपच आराम पडतो. छातीतील दुखणे थांबते. औषध घ्यावे लागत नाही.

श्रीगुरुमहाराज संकल्पदीक्षा देत असत तशीच ही आहे. समर्थांच्या सज्जनगडावर श्रीधरस्वामींच्या सहवासात ही शक्तीपात दीक्षा श्रीदत्तमहाराजांना मिळावी, असा परमेश्वराच्या मनातील अज्ञात हेतू होता. तो आता सफल होऊन सर्वांना ज्ञात झाला.

क्रमशः -

*******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-२० *

प. पू. श्रीवामनरावजी गुळवणी महाराज स्वतः प्रवचने करीत नसत. पण त्यांनी हा सारा वारसा श्रीदत्तमहाराजांकडे सोपविला होता. निवृत्तिनाथ बोलत नसत, पण त्यांनी श्रीज्ञानेश्वरांकडून श्रीज्ञानेश्वरी लिहून घेतली. या उदाहरणाप्रमाणेच पूजनीय श्रीदत्तमहाराज भागवत व श्रीगुरुचरित्र सांगून लोकांना ज्ञानदान करीत असत. शाब्दे परेच निष्णात असा समन्वय पू. श्रीदत्तमहाराजांमध्ये झाला होता. श्रवणाबद्दल श्रीगुरूमहाराज म्हणत असत की, "श्रवण साधनचतुष्टयसंपन्न, विवेक, वैराग्य, अनासक्त अंतःकरण असलेल्या व्यक्तीकडून करावे, अन्यथा करू नये. त्यापेक्षा तो वेळ साधनेत घालवावा. अनुभवाकडे वळावयाचे असेल तर तो स्वतःच अभ्यास करून मिळवावा लागतो."

श्रीगुरूमहाराज सकाळी रोजचे आन्हिक झाल्यावर श्रीदत्तमहाराजांकडून उपनिषदांचे श्रवण करीत असत. भागवत सप्ताहात मोठ्या प्रेमाने श्रवणास बसत. श्रीदत्तमहाराजांना सकल वेदशास्त्राचे यथार्थ ज्ञान होते. शिवाय विवेक-वैराग्ययुक्त अंतःकरण होते. म्हणूनच त्यांच्याकडून श्रवण करावे असे श्रीगुरूमहाराज म्हणत असत.

कोणाकडून काही अपेक्षा न ठेवणे हे पू. श्रीदत्तमहाराजांचे स्वभाव वैशिष्ट्य होते. त्यांची एक महाराजांनीच सांगितलेली आठवण पुढीप्रमाणे...

श्रीगुरूमहाराज श्रीदत्तमहाराजांना आश्रमात पुष्कळ वेळा जेवावयास आमंत्रण करीत असत. श्रीदत्तमहाराज म्हणत, "ज्या संस्थेचे आम्ही विश्वस्त आहोत त्या संस्थेत आम्ही जेवणे बरे नव्हे!" प. पू. श्रीगुरूमहाराज लगेच प्रतिउत्तर देत की, 'आम्हीही एक प्रधान विश्वस्त या संस्थेचे आहोत. मग आम्ही येथे जेवणे बरोबर नाही किंवा आमचे नांव तरी विश्वस्त म्हणून पुसून टाकावे.' पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले, "यावर आम्ही निरुत्तर झालो. आपतः लक्षात आले की येथे जेवण घेणे हा श्रींचा प्रसाद आहे."

एकदा घरची सर्व मंडळी बाहेरगावी गेली होती. श्रीदत्तमहाराज एकटेच होते. व्यवस्थापक श्री. नाना कुळकर्णी यांना श्रीदत्तमहाराजांनी विचारले की, "नाना, अशी अशी अडचण आहे, तर चार दिवस आश्रमात प्रसादास येऊ का?" केवळ उपचार नव्हे पण नियमांचा भंग होऊ नये अशी इच्छा असे.

पू. श्रीदत्तमहाराजांना कुणी बक्षीसपत्राने जमीन देऊ पाहत, पैसे देत, पण ते कोणतेही पैसे स्वतः घेत नसत. वासुदेव निवासाला देऊ टाकत किंवा देऊळगावराजाला मिळाले तर तेथील पिताजींच्या विश्वस्त निधीला देऊन टाकत. अपरिग्रह हा गुण विशेष करून प्रत्ययास येतो. गुरुत्वाची पदवी बहाल होते ती अशा शुचित्वानेच. अंतर्बाह्य शुचित्व असल्यामुळे त्यांची आणखी एक अकर्तेपणाची तीव्र भावना मनामध्ये होती.

परी मने वाचो देहे । जैसा जो व्यापारु आहे ॥ तो मी करीत आहे । ऐसे न म्हणे करणे वा न करणे हे आघवे तोची जाणे ॥ विश्व चळतसे जेणे परमात्मेनी ॥

ज्ञानेश्वरीतील या ओव्यांचा उल्लेख करून हे सारे कार्य भगवंताच्या इच्छेने चालते असे ते म्हणत. " मीपणाच्या भोवऱ्यात अडकून फिरणाऱ्या मनाला अॅटमबॉम्बप्रमाणे तो एक दणका आहे. जगातील साऱ्या घटना त्याच्या इच्छेने घडत असतात. आपण फक्त निमित्तमात्र असतो. आपल्या जीवनात चांगले किंवा वाईट प्रसंग येतील ते सगळे भगवंताच्या इच्छेनेच येतात ही श्रद्धा साधकाने ठेवली पाहिजे," असे त्यांचे सांगणे असे. 'आपल्या स्वतःच्या मनातील आग्रह वजा केला तर भगवंताच्या इच्छेशी असलेला तिचा विरोध आपोआप गळून पडतो. आपले मन विश्वमनाशी संपूर्ण सहकार्य करायला शिकते आणि आपले समाधान कायम टिकते.'

पू. श्रीदत्तमहाराज जसे, पुण्यातील श्रीवासुदेव निवासाचे प्रधान विश्वस्त होते, तसेच देऊळगावराजा येथील त्यांचे पिताजींच्या संस्थानचेही ते प्रमुख विश्वस्त होते. देऊळगावराजा येथेही त्यांना वारंवार जावे लागत.

१९७२ साली प. पू. श्रीधुंडिराज महाराजांनी पू. श्रीदत्तमहाराजांना मंत्रोपदेश देण्याचा अधिकार दिला. पू. श्रीदत्तमहाराज अशारीतीने वंशपरंपरेप्रमाणेही गुरूपदाचे अधिकारी झाले होते.

क्रमशः -

******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-२१ *

श्रीगुरुमहाराजांचे अखेरचे पर्व

पू. श्रीदत्तमहाराजांच्या नव्या पर्वाचा आरंभ होण्यापूर्वी प.पू. श्री गुळवणी महाराजांच्या अखेरच्या पर्वातील काही घटना मनाला आणखी काही सूचक सांगून जातात. आतापर्यंत ज्या ज्या व्यक्तीजीवांचा उल्लेख या चरित्रात

झाला त्या सर्वांचे श्रद्धास्थान नरसोबाची वाडी हे होते. खुद्द श्रीदत्तमहाराजांचे जन्मस्थान नरसोबाची वाडी होते. श्रीदत्तकृपेच्या सावलीतच ते वाढले होते.

श्री गुरुमहाराजांच्या मातोश्रींना प्रसाद पादुका भेट मिळाल्या त्याही नरसोबाच्या वाडीलाच. श्रीगुरूमहाराजांच्या जीवनाचे अखेरचे पर्व संपण्यापूर्वी त्यांच्या हातून जी एक फार मोठी सेवा घडली ती म्हणजे वाडीच्या मंदिराचा जीर्णोद्धार. संत एकनाथ महाराजांनी घाट बांधल्यानंतर या मंदिराची दुरुस्ती अशी झाली नव्हती,

एक दिवस वाडी देवस्थानची व्यवस्थापक पुजारी मंडळी गुरुमहाराजांकडे आली आणि मंदिराच्या जीर्णोद्धाराबद्दल आपण लक्ष घाला असे सांगू लागली. श्रीगुरुमहाराज अलिकडे निरवानिरवीची भाषा बोलू लागले होते. त्यातच हे काम करावे अशी पुजाऱ्यांनी इच्छा व्यक्त केल्यावर श्री गुरूमहाराजांना फार आनंद झाला. पुजाऱ्यांची इच्छा म्हणजे देवाची इच्छा दिसते. तेव्हा त्याच्याच इच्छेने हे काम पूर्ण होईल, असे ते म्हणाले. काम करायचे ठरल्यावर अनंत हस्ताने मदत होऊ लागली. वासुदेव निवासचे एक विश्वस्त श्री. वि. मो. वैद्य इंजिनियर यांनी वाडीला राहूनच काम करण्याचे कबूल केले. स्वतःचे जेवण हाताने करून ते वाडीत राहिले होते.

१९०७ ते १९७३ पर्यंत सतत श्रीगुरूमहाराज वाडीला गेले. पाच तपांची ही अखंड सेवा अखेरच्या पर्वात झालेले हे जीर्णोद्धाराचे काम हे सारे पित्याने पुत्रासाठी ठेवलेले धनच आहे. निष्काम मनाने घडलेली ही सेवा तुमच्या आमच्यासारख्या सामान्य जीवांना उपयोगी पडावी. ती सांभाळण्याइतकी ताकद, पावित्र्य असलेल्या श्रीदत्तमहाराजांचे हाती दिली, असे या घटनेवरून मनाला ठामपणे जाणवते.

भक्तांना सावली

वाडीत प्रदक्षिणा- सेवेला फार महत्त्व आहे. ती सेवा सहजपणे करता यावी, ऊन लागू नये, पाय पोळू नयेत, म्हणून प्रदक्षिणेच्या वाटेवर गोलाकार मंडप घातला. मंडपाच्या छतावर संपूर्ण श्रीगुरुचरित्र चित्रित केले. त्यामुळे मंदिर दुरून फारच सुंदर दिसु लागले होते. मंदिरामागील ओवऱ्यांही दुरूस्त झाल्या. श्रीगुरूमहाराजांच्या मातोश्रींना त्या ठिकाणी वाडीत असताना दत्तप्रभूंनी दर्शन देऊन प्रसाद-पादुका दिल्या ते पवित्र स्थान दुरुस्त झाले. ही सर्व कथा लेखाद्वारे फलकावर लिहिल्यामुळे वाचणाराचे मन पुलकित होते. माहिती असणाऱ्या भक्तांच्या डोळ्यातून अश्रू ओघळतात. घाटावरील सर्व मंदिरे शोभून दिसू लागली होती. हे सर्व काम सुमारे चार लाखांचे झाले. हे कार्य पुरे झाल्यावर श्रीगुरुमहाराजांनी पन्नास हजारांचा एक ट्रस्ट करून दरवर्षी दुरुस्ती व्हावी अशी सोय केली.

वाडी गावाला धन्यता वाटली. पुजाऱ्यांनी श्री गुरुमहाराजांचा सत्कार करून त्यांना एक प्रसाद उपरणे व शाल भेट दिली. त्यापेक्षा महत्त्वाचे पादुकांवर पाणी घालायची परवानगी दिली.त्यापूर्वी पादुकांवर पाणी घालायला बंदी झाली होती. त्याचे श्रीगुरुमहाराजांच्या मनाला फार दुःख वाटे. या सत्काराबरोबरच आपण आता पाणी घालायला सुरवात करावी अशी परवानगी पुजाऱ्यांनी श्रीगुरूमहाराजांना दिली. श्रीगुरूमहाराजांच्या अंतःकरणाला फार आनंद झाला. त्यांचे डोळे अश्रूंनी भरून आले. त्यांनी चटकन एक साष्टांग नमस्कार घातला. मूकपणे म्हणाले

"देवा आपली सेवा पुरी झाली. आता जीवनातून मुक्त करा." हे वर्णन शब्दांनी लिहिता येण्यासारखे नाही. देहाने असे हे श्रीगुरुमहाराजांचे वाडीचे अखेरचेच दर्शन ठरले. त्याचवेळी मनोमन शुभाशीर्वाद मागितले.

या अखेरच्या पर्वात श्रीगुरूमहाराज मुक्तहस्ताने दीक्षा प्रदान करीत होते. थांबा म्हणतच नसत. इच्छा झालेल्याला तृप्त करीत. लग्न, उद्घाटन, भागवत सप्ताह साऱ्या समारंभाना जात होते. मुंबईलाही येत होते. त्यांच्या रूपाने मूर्तिमंत वात्सल्य वावरत आहे असाच सर्वांना भास होत होता.

क्रमशः –

*******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-२२ *

श्री. गुरुमहाराजांचे अखेरचे पर्व

श्रीदत्तमहाराजांनी नोकरीकरता आता कुठेही जाऊ नये असे श्रीगुरूमहाराजांना फार वाटत होते. ठाण्याला तत्त्वज्ञान विद्यापीठ आहे. त्यांचे संचालक श्री. पांडुरंगशास्त्री आठवले होते. अध्यापनासाठी श्रीदत्तमहाराजांना त्यांनी आपल्या विद्यापीठात बोलावले होते. श्रीगुरूमहाराजांनी आता आश्रम सोडून कुठेही जाऊ नका असे सांगितले. तसे स्पष्टपणे जाऊन शास्त्रीजींना सांगून या, असेही त्यांनी आवर्जून बजावले. यावरूनही श्रीगुरूमहाराजांचा संपूर्ण जीवभाव श्रीदत्तमहाराजांच्या भोवती एकवटला होता याची कल्पना येते.

तत्त्वज्ञान विद्यापीठातच वे. शा. सं. आत्मारामशास्त्री जेरे हे अध्यापनाचे काम करीत असत. श्रीदत्तमहाराज व पं. आत्मारामशास्त्री एकमेकांवर सख्ख्या भावाप्रमाणे प्रेम करीत असत. श्रीगुरूमहाराजांचा लोभ श्रीआत्मारामशास्त्रींवर पण होता. पं. आत्मारामशास्त्रींचे एकदा श्रीगुरूमहाराजांना ठाण्याहून पत्र आले, की मी आता निवृत्त होऊन वासुदेव निवासात आपल्या सहवासात राहण्यासाठी येणार आहे. पं. आत्मारामशास्त्रींचे येणे श्रीगुरूमहाराजांना फार समाधानाचे होईल, याकरता श्रीदत्तमहाराजांना फार आनंद झाला. योगायोग वेगळा होता. पं. आत्मारामशास्त्री आजारी झाले आणि शांतपणे त्यांनी इहलोकाची यात्रा संपवली. त्याचे गुरूमहाराजांना फार वाईट वाटले. त्यांचा-आमचा सहवासाचा योग नव्हता असे जाणाऱ्या- येणाऱ्यां जवळ ते म्हणत असत.

श्रीगुरूमहाराजांची प्रकृती बिघडत होती. डॉक्टरी उपाय चालूच होते. श्रीगुरूमहाराज तसे प्रसन्नच होते. आल्या -गेल्याची चौकशी करीत होते. पण जास्तीत जास्त श्रीगुरूचरित्रातल्या गोष्टी बोलत होते. आल्या-गेल्याला श्रीगुरूचरित्र सांगत होते. आम्हाला मिळालेले वाढीव आयुष्य आता संपले आहे असे म्हणत. वाडीवर श्रद्धा ठेवा आणि आश्रमाला विसरू नका, असे सर्वांना सांगत होते.

अनुष्ठानासाठी श्रीदत्तमहाराज रोज येत होते. महाराजांना भेटून जात होते. एक दिवस श्रीदत्तमहाराजांना जवळ बोलावून श्रीगुरूमहाराज म्हणाले, "हे बघा मी काय सांगतो ते नीटपणे लक्षात घ्या. शैलाच्या लग्नाची स्थळे

आता तुम्हाला शोधायचीत. नागपूरला  काही स्थळं पाहण्यात आहेत असेही मी ऐकलंय. तर तुम्ही आता नागपूराला जा आणि वरसंशोधन करा!"

श्रीदत्तमहाराज नम्रपणे म्हणाले, "आपल्या प्रकृतीला इतके बरे नसताना मला जाणे प्रशस्त वाटत नाही. त्या कामाची काही इतकी घाई नाही. आपल्या कृपेने सर्व ठीक होईल, तेव्हा आता माझ्या जाण्याची घाई नको" . त्यावर श्रीगुरूमहाराज म्हणाले, "मला बरे वाटेल, काळजी करू नका. वरसंशोधनाचे कामही तितकेच महत्त्वाचे आहे. निश्चिंत मनाने आपण जा आणि येण्याची घाई करू नका !"

श्रीगुरूमहाराजांची प्रकृती ठीक दिसत नव्हती आणि श्रीगुरुमहाराजांना अशा परिस्थितीत सोडून जायचे श्रीदत्तमहाराजांच्या फार जीवावर आले होते. म्हणून पुन्हा एकदा प्रयत्न करावा असे वाटून ते म्हणाले, "आपण म्हणता, पण मला काही आत्ता आपल्याला सोडून जायचा धीर होत नाही!" श्रीगुरुमहाराज म्हणाले, "सारी चिंता देवाला असते. माझी तब्येत तशी बरी आहे. पत्र वगैरे मात्र पाठवा."

इतके निक्षून सांगितल्यावर श्रीगुरूमहाराजांचा शब्द पाळायचा म्हणूनच केवळ अस्वस्थ मनाने होकार दिला. श्रीगुरूमहाराजांचा निरोप घेताना श्रीदत्तमहाराजांचा चेहरा अत्यंत दु:खी कष्टी झाला. खोलीतून पाय बाहेर निघत नव्हता. शेवटी श्रीगुरुमहाराज पुन्हा एकदा म्हणाले, 'रात्रीची गाडी आहे ना, जेवण करून निघाले पाहिजे!' असे म्हणून श्रीदत्तमहाराजांच्या हातात प्रसाद देऊन, 'या' असे एकदा हसून म्हणाले. अशा रीतीने श्रीदत्तमहाराज ८ जानेवारी १९७४ रोजी केवळ आज्ञापालन म्हणून नागपूरला गेले.

श्रीदत्तमहाराज खोलीच्या बाहेर पडल्यानंतर श्रीगुरूमहाराजांनी एक मोठा नि:श्वास सोडला आणि ते एकदम गप्प झाले. श्रीगुरूमहाराजांना कळून चुकले की श्रीदत्तमहाराज आता काही आपल्याला पुन्हा भेटणार नाहीत..

क्रमशः –

*******************************************

## ⁕ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-२३ ⁕

श्री गुरूमहाराजांचे अखेरचे पर्व

९ जानेवारीपासून प.पु.श्री गुळवणी महाराजांची प्रकृती अधिकाधिक बिघडत गेली. डॉक्टरी उपाय चालू होते. पण गुण पडत नव्हता. श्रीगुरुमहाराज उत्तरायण लागण्याची वाट पहात होते. त्यांना आता एकांतच हवाहवासा वाटत होता. साधना चालूच होती, तरी व्यवहार चुकत नव्हता. संक्रांत आली. श्रीगुरूमहाराजांनी जगन्नाथगुरूजींना तिळगुळ व दक्षिणा दिली. सूर्याने मकर वृत्तात प्रवेश केल्याचे बघितले आणि दि. १५ जानेवारी १९७४ रोजी, म्हणजे पौष वद्य ८ च्या दुपारी एक वाजण्याच्या सुमारास हा इहलोक सोडला.

'आकाशवाणी' वरून ही बातमी प्रसारित झाली आणि गावोगावांहून भक्तजनांची पुण्यनगरीकडे रीघ लागली. जो तो श्री गुरूमहाराजांसाठी शोकविव्हल झाला होता. सगुण दर्शनाची मनाला लागलेली ओढ कोणताही विचार पटवून घेत नव्हती.

प. पू. श्रीदत्तमहाराज येथे नव्हते, ते त्यावेळी नागपूरला होते. त्यांना फोनवरून हे दुःखद वृत्त कळविण्यात आले. ते ऐकून श्रीदत्तमहाराज परमावधीचे व्याकुळ झाले आणि 'आता जाऊन तरी काय उपयोग? श्री गुरूमहाराजांच्या देहाचे तरी दर्शन होईल की नाही कोणास ठाऊक! त्यापेक्षा जाऊच नये' , असे दुःखोदगार काढून पवनीला मोठ्या महाराजांचे स्थान होते. तेथे मनःशांतीसाठी जाऊन राहावे असे त्यांनी ठरविले. तेवढ्यात आपल्याला यायलाच पाहिजे. असा परत फोन आला. श्रीदत्तमहाराजांना यावेच लागले.

ते आश्रमात प्रवेश करण्यापूर्वीच शोकावेगाने इतके व्याकुळ झाले होते की तिथेच ते म्हणाले, 'काय हा आमचा योग! मातोश्रींच्या वेळेस आम्ही नव्हतो, मुलीच्या वेळेसही आम्ही नव्हतो आणि आज श्रीगुरुमहाराजांनी आम्हाला येथून दूर पाठविले. यामागे नियतीची इच्छा काय असावी कळत नाही!'

दूरत्वाचा केवळ भास। गुरूनी केले जवळ तयास॥

श्रीदत्तमहाराजांना आपला वियोग सहन होणार नाही असे जाणूनच श्रीगुरूमहाराजांनी त्यांना दूर पाठवले असले तरी त्यांना आपले उत्तराधिकारी नेमून श्रीगुरुमहाराजांनी आपले चैतन्य श्रीदत्तमहाराजांच्यात विलीन केले होते.

ये हृदयीचे ते हृदयी घातले । व्दैत न मोडिता केले। आपणा ऐसे अर्जुना॥

श्रीगुरुमहाराजांनी हा अंतरीचा हेतू आपल्या इच्छापत्रात लिहून ठेवला होता. बाळपणापासून पाहिलेल्या व पुत्रवत मानलेल्या श्रीदत्तमहाराजांना याचा सुगावा लागू न देता अशा तऱ्हेने आपल्या शक्तीपात दीक्षेचे उत्तरदायित्व दिले. हा ओघ अखंडपणे वाहता ठेवला. श्रीदत्तमहाराजांचा आधीच भिडस्त स्वभाव तो पूर्ण अबोल झाला, अंतर्मुख झाला. दत्तपीठाचे मानकरी होऊनही त्यांचे अमानित्य कायम राहिले

## संधिकाळ

श्रीगुरुमहाराज वैकुंठवासी झाल्यानंतरचा हा काळ असा संधिकाळ होता. श्रीदत्तमहाराज आश्रमात रहात नसत. आश्रमात श्रीगुरुमहाराज सतत होते. केव्हाही गेले तरी श्रीगुरूमहाराज आश्रमात भेटायचेच. आता तसे होणार नव्हते, ती उणीव प्रथम प्रथम फारच भासे.

श्रीगुरूमहाराजां जवळ कायम चाळीस पंचेचाळीस वर्षे राहिलेले कुटुंब म्हणजे भालेराव मंडळी. श्री. नाना भालेराव तर विश्वस्तच होते. श्रीगुरुमहाराजांच्या देवांची आखीव रेखीव पूजा नानांनी चाळीस वर्षे तरी केली. श्रीनानांचे व्यक्तिमत्व तेजस्वी व शांत! ती. सौ गोदूताई भालेरावांनी श्रीगुरूमहाराजांना कितीतरी वर्षे जेवू घातले.

ही मोठी पुण्याईच! श्रीगुरुमहाराजांना काय लागते, कसे लागते हे सर्व या माऊलीलाच माहिती. हे वयोवृद्ध जोडपे श्रीगुरूमहाराज गेल्यावर आपल्या मुलाकडे रहाण्यासाठी गेले.

श्रीगुरूमहाराजांचे देहावसान झाल्यानंतरच्या संधिकाळात अशा घटना घडल्या की काही माणसे आम्हाला दुरावली असे श्रीदत्तमहाराज म्हणत असत.

श्री केशवराव जोशी हे सुद्धा नोकरी सोडून श्रीगुरुमहाराजांपाशी सेवा करण्यासाठी राहिले होते. श्रीगुरुमहाराजांचे पत्रलेखनाचे काम त्यांची देखभाल करण्याचे काम ते करीत असत.

असा थोडासा काळ सोडला तर वासुदेव निवासांची घडी परत बसू लागली. श्री गुरुमहाराजांच्या अस्तित्वाची प्रचीती येऊ लागली.

क्रमशः –

*************************************

## ⁎ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-२४ ⁎

शक्तीपात दीक्षेचे अधिकारी

प.पू. श्रीगुळवणी महाराजांचे मनात दीक्षा गुरुत्वाचा अधिकार पू. श्रीदत्तमहाराजांनाच द्यावा असा मनोमनी निश्चय होता. आतापर्यंत त्यांच्या कौटुंबिक जीवनात महाराजांनी दाखविलेली आपुलकी आपण सौ. लक्ष्मीबाईंच्या तोंडूनही ऐकली. प्रत्यक्ष श्रीदत्तमहाराजांनी गुरुमहाराजांची सारी कार्ये अत्यंत आपुलकीने, पुत्रवत् प्रेमाने केली. श्री गुरुदेवांनी फार पूर्वी सोलापूरच्या वैद्यमास्तरांना लिहिलेल्या पत्राचे उत्तरात आपला मनोदय स्पष्टपणे व्यक्त केला होता. श्रीगुरूदेव त्यांना लिहितात, 'श्रीदत्तमहाराजांखेरीज इतकी योग्य साधन चतुष्टयसंपन्न विवेकवैराग्ययुक्त व्यक्ती दीक्षेचा अधिकार देण्यास दुसरी कोणती नाही!"

श्रीसमर्थसुद्धा अप्रत्यक्षपणे शक्तीचा उल्लेख शारदा या नावाने करत. ब्रह्मस्वरूपाला सृजन होण्याची इच्छा झाल्याबरोबर या स्फुरणामध्ये अनंत शक्ती निर्माण झाल्या. सूर्य व सूर्याची प्रभा त्याप्रमाणे ही शक्ती परमेश्वराबरोबरच असते त्या शक्तीचा एक उपयोग भौतिक ज्ञान व दुसरा उपयोग आत्मा कोण हे जाणण्याचे ज्ञान.

प. पू. श्रीदत्तमहाराज हे शारदेचे सतत उपासक होते. सतत ते श्रीगुरूसहवासात असत. नाम व ज्ञान दोन्हीचा समन्वय त्यांचे ठिकाणी होते. ही शारदेची शक्ती श्रीदत्तमहाराज भागवत व इतर प्रवचनांच्या माध्यमातूनही श्रोत्यांपर्यंत नेत असतात.

संकल्प दीक्षा देण्यास प्रारंभ

आश्रमात श्रीगुरुमहाराजांचा अस्थिकलश होता तोपर्यंत दीक्षा देण्याचा अधिकार मिळूनही श्रीदत्तमहाराज दीक्षा देत नव्हते. १५ जानेवारीला श्रीगुरुमहाराज समाधिस्थ झाले. त्यानंतर श्रीगुरुमहाराजांचा अस्थिकलश जूनपर्यंत आश्रमात विसावला होता. जून महिन्यात हा कलश घेऊन श्रीदत्तमहाराज प्रयागला निघाले. २९ जून रोजी प्रयागला अस्थिविसर्जन झाले.

त्याच दिवशी श्री. व सौ. खांडेकर यांना श्रीदत्तमहाराजांनी संकल्प-दीक्षा दिली. हे सारे मोठे विलक्षण वाटते. यातील गूढ सामान्य मनाला उलगडत नाही. श्रीदत्तमहाराजांचा श्रीगुरुमहाराजांच्या बद्दलचा विनम्र भाव यातून दिसून येतो. जोपर्यंत अस्थिकलश आहे तोपर्यंत दीक्षा द्यायची नाही हा निश्चय कळून येतो. अस्थिविसर्जन झाल्यावर लगेच एका दांपत्याला दीक्षा घ्यायची इच्छा व्हावी आणि प्रयाग क्षेत्रातच त्याची सुरुवात व्हावी यावरुन या अव्यक्त घडणाऱ्या गोष्टींची सूत्रे श्रीगुरुमहाराजांनी घडवून आणली असे दिसते.

१९७४ साली प. पू. गुळवणीमहाराज समाधिस्थ झाले. त्यांनी आपला संकल्प दीक्षेचा अधिकार प. पू. श्रीदत्तमहाराजांना दिला. १९७६ साली श्रीधुंडिराज महाराजांची सौरीशांती झाली. १९७८ साली श्रीधुंडिराज महाराज वैकुंठवासी झाले. एक गोष्ट लक्षात येते. दोन्ही दीक्षा विधीचे अधिकार प. पू. श्रीदत्तमहाराजांना मिळाल्यावर ते पाहण्याचे भाग्य श्रीधुंडिराजमहाराजांना लाभले, हा देखील एक अपूर्व योग वाटतो. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे हे ब्रम्हसाम्राज्याचे वैभव पाहून त्यांना तृप्त मनाने आशीर्वाद देऊन श्रीधुंडिराज महाराजांनी देह ठेवला.

प. पू. श्रीधुंडिराज महाराजांची समाधी देऊळगावराजाला आहे. देऊळगावराजा येथे बालाजीचे देऊळ आहे. तेथेही श्रीदत्तमहाराज वर्षातून एक सप्ताह करत.

प. पू. श्रीदत्तमहाराजांना पूर्वीपासूनच अग्निहोत्राबद्दल फार आस्था होती. त्यामुळे श्री. राजाराम कुळकर्णी यांनी अग्निहोत्र घ्यायची इच्छा व्यक्त करताच श्रीदत्तमहाराजांना अतिशय आनंद होऊन ते त्यांना सर्वतोपरी सहाय्य करण्यास पुढे आले. अशा तऱ्हेने श्रीदत्तमहाराजांच्या जीवनातील वामन निवासाइतकेच अग्निहोत्र स्थापना हे एक फार मोठे कार्य होते.

क्रमशः –

*******************************************

## ⁎ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-२५ ⁎

प.पू. श्रीदत्तमहाराज अमृत महोत्सव सोहळा

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा अमृत महोत्सव दि. २५ मे ते ३१ मे १९८१ असा सात दिवस मोठ्या वैभवाने संपन्न झाला. महोत्सवास भारताच्या सर्व भागातून भक्त साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वारकरी संप्रदायाचे ह. भ. प. श्रीधुंडामहाराज देगळूरकर यांनी अमृत महोत्सव समितीचे अध्यक्षस्थान स्वीकारले. उपाध्यक्षपदी गुरुभक्त केसरी श्री बापूसाहेब कुबडे व प्रा. डॉ. दि. ब. केरुर यांची नियुक्ती झाली.

कार्याध्यक्ष श्री. गोविंदशेठ साबळे, कार्यवाह म्हणून वे.शा.सं. श्री ज. ल. पुजारी व श्री.प. वा. मनोळकर, सहकार्यवाह म्हणून श्री. वसंतराव गाडगीळ, कोषाध्यक्ष श्री दत्तोपंत शिंगणे अशी निवड करण्यात आली. सर्वच भक्तमंडळी कामाला लागली.

वे. मू. सप्रेगुरुजींच्या मार्गदर्शनाखाली यज्ञमंडपाची मांडामांड सुरु झाली. शास्त्रोक्त यज्ञकुंड, वेदी स्थंडिल व अन्य यागकुंडे तयार झाली.चोवीस तारीख उजाडली आणि कार्यक्रमात रंग भरू लागला.

प. पू. श्रीदत्तमहाराज सपत्नीक पुण्याहवाचन व प्रायश्चित्त विधीस बसले. हा विधी पूर्ण होतो आहे, तोच प. पू. नानामहाराजांचे आगमन झाले. त्यामुळे आनंदात अधिकच भर पडली. जणू काही दुधात साखर.

"पू. श्रीदत्तमहाराजांना दीर्घायुरारोग्य लाभो व त्यांच्या हातून अशीच ईशसेवा घडो" अशी श्रीचरणांजवळ त्यांनी प्रार्थना केली.

सोमवार, दि. २५ ला सकाळीच प. पू. श्रीदत्तमहाराजांनी सपत्निक पुण्याहवाचन व देवताभिवादन केले.

मंगळवार, दि. २६ रोजी श्रीगणपत्यथर्वशीर्ष दशखंडात्मक सहस्रमोदकांचे हवन झाले. याचे यजमानपद श्री. महागावकर यांनी सपत्निक भूषविले होते.

बुधवार, दि. २७ रोजी देवतांची स्थापना होऊन पुण्याहवाचन झाले नवचंडी (दुर्गासप्तशती) यागास सुरुवात झाली.

गुरुवार, दि. २८ उजाडला तोच मुळी एका वेगळ्या यागाची नांदी करीत. हिरवा चाफा, सोनचाफा व फणस यांच्या शीतल सुगंधित व दाट अशा छायेत विशिष्ट प्रकारची तीन यज्ञकुंडे तयार केली होती. हा याग सहसा पाहण्यास मिळत नाही कारण 'अग्निहोत्र' स्वीकारलेल्यांनीच हा याग करायचा असतो.

याच दिवशी, तिथेच असलेल्या दुसऱ्या स्थंडिलावर सौरयाग संपन्न होत होता. या सर्व धार्मिक कार्यक्रमातील मुख्य कार्यक्रम म्हणजे पू. श्रीदत्तमहाराजांची 'भीमरथी शांती'. ही शांती, सत्तरी पूर्ण झाल्यानंतरच करायची असते. ही शांती शुक्रवार, दि. २९ रोजी झाली.

शनिवार दि. ३० चा लघुरुद्र स्वाहाकार, श्रीभगवंतराव पटवर्धन यांनी यजमानपद भूषवून संपन्न केला.

रविवार दि. ३१ चा ऋकस्वाहाकाराचा पूर्णाहुतीचा सातवा दिवस, साडेनऊ वाजता स्वाहाकार संपताच प्रायश्चित्त व बलिदान झाले

यज्ञमंडप अनेक यागांनी मंडित होत असताना आश्रम अनेक जपानुष्ठानांनी नुसता गजबजून जात होता. पं.गणेश्वरशास्त्री द्रविड हे (वाराणसी) शुक्ल यजुर्वेदीय शाखेतील शतपथ ब्राह्मणांचे पारायण करीत होते.

परमेश्वराच्या योजनेचे आणखी एक कौतुक वाटते ते हे की सर्व कार्यक्रमात वाराणसीचे श्री. प. प. श्रीगजाननस्वामी महाराज मोठ्या आस्थेने सहभागी होत असत. असा हा संहिता स्वाहाकार रविवार, दि. ३१ पर्यंत

रोज सकाळी आठ ते बारा पर्यंत चालत असे. रविवार दि. ३१ मे, अमृतमहोत्सवाचा सांगता दिन. गेले सात दिवस संपन्न होत असलेला उत्सव आज सिद्धीस गेला.

पूजनीय श्री दत्त महाराजांच्या प्रकट सत्कार सभेमध्ये, सर्वप्रथम कांची कामकोटी आणि शृंगेरी येथील आचार्य पीठांच्या वतीने त्यांच्या खास प्रतिनिधींनी पू.श्रीदत्तमहाराजांना महावस्त्र, रुद्राक्षमाला आणि मंत्राक्षता जगद्गुरूंच्या आशीर्वादासह सादर केल्या. यानंतर पू. श्रीदत्तमहाराजांना सर्वांच्या वतीने 'मानपत्र' समर्पण करण्यात आले.

पू. श्रीदत्तमहाराज यांनी आपले आशीर्वादपर भाषण केले व म्हणाले,

'सेवा म्हणजे अखंड स्मृती' असे श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे भाष्य आहे. स्मृती ही कृतिसाध्य नसते, ती ज्ञानसाध्य असते, आणि हे ईशकृपेने होते. भगवत्स्मृतिरूप सेवा अखंड घडावी अशी इच्छा व्यक्त केली.

धर्मे प्रीतिं सन्मतीम् देवभक्तिं, सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम् । भावासक्तिं चाखिलानंदमूर्ते। घोरात्कष्टात् उद्धरास्मान्नमस्ते' ।।

या प्रार्थनेने श्रीदत्तमहाराजांनी आपले आशीर्वादपर भाषण संपविले. याप्रमाणे अमृतमहोत्सव सोहळ्याची सांगता झाली.

क्रमशः –

******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-२६ *

श्रीवामन निवास

प. पू. श्रीदत्तमहाराजांना आता प.पू.श्रीगुळवणी महाराजांच्या जन्मशताब्दीचा ध्यास लागला होता. त्यांच्या मनात संकल्प तयार होऊ लागले. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराजांच्या जन्मशताब्दी सोहळ्याच्या निमित्ताने स्वामीमहाराजांचे समग्र वाङमय, प्रसिध्द करण्याचे अतिशय कठिण कार्य श्रीदत्तमहाराजांच्या हातूनच झाले होते. सत्कर्माची अशी वाहती गंगा म्हणजेच श्रीमहाराजांचे जीवन ! त्यानंतर श्रीगुरुमहाराजांच्या जीवनातील सर्व नेत्रदीपक आणि मंगल सोहळ्यांचे सूत्रधार श्रीदत्तमहाराजच होते.

'श्री वासुदेव निवास' चा संकल्प श्रीमहाराजांचा आहे हे आपणांस माहीत आहेच. आपल्या गुरुंच्या नावे आश्रम बांधणे हे शास्त्रात मोठे पुण्यकर्म सांगितले आहे, असे त्यावेळी श्रीदत्तमहाराजांनी श्रीगुरुमहाराजांना पटवून दिले होते. श्रीगुरुमहाराजांनी संमती देताना स्पष्ट सांगितले होते की, 'येथे स्वामी महाराजांची व लोकनाथतीर्थ स्वामी महाराजांची स्मृती फक्त कायम राहावी.आपल्या श्रीगुरुमहाराजांपेक्षा आपले मोठेपण कुठेही दिसता कामा नये अशी, श्रीदीक्षितस्वामी महाराजांप्रमाणेच श्रीगुरुमहाराजांनीही आपली इच्छा व्यक्त केली होती. देहावसान

झाल्यावर वैकुंठ स्मशान भूमीत आपले अंत्यसंस्कार करावेत. अस्थीही वासुदेव निवासात ठेवू नयेत', अशी त्यांची सक्त ताकीद होती. त्याप्रमाणेच सर्व घडले होते.

पू. श्रीमहाराजांना आता श्रीगुरुमहाराजांचे स्मृतिमंदिर असावे असे वाटू लागले आणि वामन निवासची कल्पना डोक्यात घोळू लागली. पू. श्रीमहाराजांनी वामननिवासाचा संकल्प लिहिला आणि नरसोबा वाडीला जाऊन दत्तप्रभूंना तो वाचून दाखवून आशीर्वाद देण्याची प्रार्थना केली. श्रीमहाराजांचा हाही संकल्प यशस्वी झाला.

पू. श्रीमहाराजांच्या म्हणण्याचा थोडक्यात आशय असा, 'संसाराकरता जेव्हा आपण कष्ट करतो, अनावश्यक ते व्याप वाढवतो त्यावेळी हे व्याप वाढवून कसे होईल याचा आपण विचारही करत नाही. आपण प्रयत्नवाद पुढे आणतो. परमार्थाकरिता असा निराशावादी दृष्टिकोन कशासाठी? परमेश्वर सर्व व्यवस्था करील, त्याच्या मनात असेल तसे घडेल. शिवाय वासुदेव निवासात वैदिक परंपरेनुसार उत्सवादि सर्व होतच असते, पण अन्यसेवा उपलब्ध करता येत नाहीत. ग्रंथालय, आयुर्वेद संशोधन, रुग्णचिकित्सा-सेवा, औषधालय, कथा-कीर्तने, निवासाची सोय इ. सेवा उपलब्ध होणे जरूरीचे आहे आणि त्यासाठीच वामननिवास उभा राहिला पाहिजे.'

या साऱ्या कल्पना ऐकल्यावर वामननिवासामागचा उदात्त हेतू आपल्याला समजतो. श्रीगुरुमहाराजांप्रमाणेच पू. श्रीदत्तमहाराजांचाही श्रीगुरुमहाराजांच्या चिरंतन स्मृतीप्रीत्यर्थ वामननिवास उभा करण्याचा संकल्प साकार झालेला दिसतो.

बांधकामाला सुरवात करायची म्हटली की पैशाचा प्रश्न आलाच. तो कसा सोडवला असे आपल्याला वाटणे साहजिकच आहे. त्या दृष्टीने पू. श्रीदत्त महाराजांनी स्वतःच पहिले पाऊल उचलले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात श्रीभागवत सप्ताह, श्रीगुरुचरित्र सप्ताहाच्या निमित्ताने त्यांचे अखंड दौरे सुरु झाले. त्यांचे वय लक्षात घेता रेल्वे, एसटीचा प्रवास त्यांना फार त्रासदायक ठरत असे. प्रत्येक खेडोपाडी जेवणखाण, झोप, विश्रांती इ. वेळच्या वेळी होईलच असे होत नसे. शिवाय परंपरागत प्रचंड शिष्य समुदायाची दर्शनासाठी लागलेली रीघ संपतच नसे. कितीतरी वेळा थोडीदेखील उसंत त्यांना मिळत नसे. शिवाय बदलती हवा, पाणी आहेच. पण त्यांनी श्रीवामननिवासापुढे आपल्या प्रकृतीचीही तमा बाळगली नाही. दौऱ्यात जमा झालेला सर्व निधी श्रीवामननिवासाच्या गंगाजळीत जमा होऊ लागला. त्यांच्या शिष्याने जरी दक्षिणा दिली तरी ते वामननिवासाची पावती फाडू लागले. हे पाहून काही शिष्य एक वामननिवासासाठी व एक त्यांच्यासाठी वैयक्तिक म्हणून दोन दक्षिणा देऊ लागले. पू. श्रीमहाराजांनी त्या दोन्ही रकमा वामननिवास निधीतच जमा केल्या.

पू. श्रीमहाराजांच्या दौऱ्यांचा दुसरा मोठा फायदा म्हणजे ज्ञानगंगा खेडोपाडी वाहू लागली. महाराजांच्या मुखातून निघालेले प्रवृत्ती व निवृत्तीपर दोन्ही तऱ्हेचे ज्ञान सामान्य जनमानसात रुजू होऊ लागले. आपल्याला कल्पनाही येणार नाही एवढ्या प्रचंड प्रमाणात महाराजांचा शिष्यसमुदाय दिवसेंदिवस खेडोपाडी विशेषतः विदर्भ-मराठवाड्यात वेगाने वाढलेला दिसतोय. महाराजांचे आजोबा-वक्रतुंड महाराजांपासून चालत आलेले गुरुपद महाराज अत्यंत कुशलतेने सांभाळत होते. तीन पिढ्यांची शिष्य परंपरा त्या भागात आहे.

क्रमशः –

****************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-२७ *

गुरुमहाराजांच्या जन्म शताब्दी सोहळ्यास उभा राहिला श्री वामन निवास

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या पूर्ण अव्यक्त असलेल्या जीवनचरित्राचे थोडेसे धागेदोरे दिसल्यावर हे काही आगळे वेगळे जीवन आहे असे वाटू लागते.

श्री वामन निवासासाठी एवढे कठोर परिश्रम घेऊनही त्याचा गाजावाजा नाही, तक्रार नाही, अभिनिवेश नाही. सारे कसे शांतपणे सुरु होते. कोणी म्हटले, आता या वयात कशाला इतक्या दूरवर जाता? तर ते म्हणत, 'आम्हीच स्वस्थ बसून कसे चालेल?', अशी ही गुरुसेवा अखंड चालू होती.

श्री वामन निवासाच्या उभारणीच्या कार्यात सर्वश्री भाऊसाहेब वाकडे, श्री मोरेश्वर घैसास आणि श्री शशिकांत नागले यांचा वाटा मोठा आहे. आश्रमाचा व्याप सांभाळून भाऊसाहेब वामननिवासाच्या कामाकडे जातीने लक्ष देत असत. वे.मोरेश्वर घैसासांच्या सततच्या धावपळीमुळे बांधकामासाठी लागणारे सिमेंट, स्टील यासारखे महत्त्वाचे साहित्य त्वरित व अतिशय वाजवी दराने व भरपूर प्रमाणात मिळाल्याने कामाला वेग आला.

आपल्या गुरुमहाराजांनी जे कार्य हाती घेतले आहे, ते सिध्दीस नेणे आपले आद्य कर्तव्य आहे अशा प्रखर गुरुनिष्ठेने प्रेरित होऊन श्री शशिकांत नागले यांनी आपल्या प्रापंचिक, व्यावसायिक इ. कोणत्याही गोष्टी आड न येऊ देता या कार्यात आपली सेवा रुजू केली. त्यांच्या बहुमोल व्यावसायिक मार्गदर्शनामुळे बांधकामाबाबत किंवा खर्चाबाबत कुठेही फसगत न होता उत्कृष्ट बांधकाम झाले. या काळात सतत पुण्याला खेपा मारुन बांधकामावर स्वतः लक्ष ठेऊन त्यांनी प्रगतीचा वेग कायम ठेवला.

श्री वामन निवासाच्या बांधकामाच्या निमित्ताने पू.श्रीदत्तमहाराजांचा दुर्दम्य आशावाद, अविचल वृत्ती व नितांत श्रध्दा यासारख्या गोष्टी दृष्टोत्पत्तीस आल्या. मधूनच काम पैशाअभावी बंद पडते की काय अशी स्थिती निर्माण होई. पण महाराज शांतच असत. ते म्हणत, 'महाराज पाहून घेतील काय ते!' आणि खरोखरच, अचानक आणि अनपेक्षितरीत्या मोठ्या रकमेचे चेक येत. पुन्हा सर्वांना उत्साह येई आणि पुन्हा जोमाने काम सुरु होई.

१९८६ सालचा जानेवारी उजाडला, 'पू.श्रीदत्तमहाराजांचा संकल्प खरा ठरतो, तो लवकर पूर्ण होतो' हे प.पू. श्री गुळवणी महाराजांचे शब्द पुन्हा एकदा खरे ठरले! अखेर वामन निवास उभा राहिला तिथेच शताब्दी महोत्सव साजरा झाला. वामन निवासाच्या रुपाने श्रीदत्तमहाराजांची गुरुसेवा उभी राहिली.

पू. श्रीदत्तमहाराजच ठामपणे उभे राहिल्यावर वामननिवासाच्या मदतीसाठी हजारो हात पुढे आले. मनात अकर्तेपणाची भावना ठेऊन कार्य चालू होते. श्रीमहाराज म्हणत असत, 'आम्ही स्वतः काही करावयाचे म्हटले तर वेगळेच घडते. पण श्रीगुरुमहाराजांवर सर्व सोपवून मोकळे झालो तर मात्र सारे योग्यच घडते.'

महाराजांच्या या बोलण्याचा थोड़ा खोलवर विचार केला, तर त्यांच्या थोर मनाची चाहूल लागते.

ईश्वरार्पण बुध्दीने कर्म कर असे गीता सांगते. त्याचा गर्भितार्थ हाच की जोपर्यंत मी करतो ही भावना आहे तोपर्यंत ते कर्म ब्रह्मकर्म होत नाही. कर्तेपणाची भावना नाहीशी होणे ही कर्मयोगातील अंतिम पायरी आहे, असे श्रीदत्तमहाराजांचे अकर्तेपण आपल्याला पाहावयास मिळते. यावरुनच ज्ञानी माणसाची आंतरस्थिती म्हणतात ती नेमकी कशी काय असते ,याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न होतो.

पू. श्रीदत्तमहाराजांचे चरित्र समजणे फार कठीण आहे. कारण स्वतःसंबंधी प्रथमपासून ते कमी बोलतात. त्यांच्या अंतरंगाची स्थिती जाणायला अंतर्निष्ठच माणूस हवा.

कांचीकामकोटीच्या श्रीमत् शंकराचार्यांनी त्यांच्याविषयी पुढील उद्‌गार काढले

'श्री दत्तात्रेयशास्त्री कवीश्वरांचा हा सन्मान केवळ त्यांच्या विद्‌वत्तेचा नाही. आम्ही विद्‌वानांचा सत्कार नेहमीच करतो. परंतु कवीश्वर शास्त्रींच्या असामान्य विनयवृत्तीचा सन्मान आम्ही करीत आहोत.'

असे उद्‌गार फक्त आचार्यांचेच आहेत असे नव्हे, तर शिष्यांचाही अनुभव तोच आहे.

क्रमशः –

*******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-२८ *

रत्नागिरीला स्वागत

रत्नागिरीला पू. श्रीदत्तमहाराजांचा मुक्काम चार दिवस होता. मार्गशीर्ष महिना. "मासानाम् मार्गशीर्षोहम" असे या महिन्याबद्दल प्रत्यक्ष भगवंतांनी म्हटलेले आहे. पू. श्रीमहाराजांचे कुठेही जाणे येणे हे एक न कळणारे असे ईश्वरीकार्य असे, हे प्रामुख्याने जाणवले. त्यांच्या प्रकृतीची योग्य ती काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे. पण त्याचा अतिरेक होऊ देता उपयोगी नाही. खरे संरक्षण त्यांना संपूर्णपणे ईश्वराचे असते हे आपण लक्षात ठेवून संयमाने वागले पाहिजे. अनेक लोक अडचणी घेऊन येतात. त्यांना ते मार्ग दाखवित. लोकांना दिलासा मिळत. सर्व समाधानाने परत जात. त्यांचे कार्य हे असे ईश्वरी होते.

रत्नागिरीत गेल्यादिवशीच एक घटना घडली. दुपारीच एक भगिनी घरी आल्या. त्यांच्या चेहऱ्यावरुन त्या अतिशय अस्वस्थ दिसत होत्या. त्या सांगू लागल्या की आमच्या शेजारी एक दुर्घटना घडली आहे. त्या घराचे मालक कामाला परगावी गेले असताना अचानक हृदय विकाराचा झटका येऊन गेलेत. गृहस्थ वयाने तरुण होते. त्यांच्या मागे पत्नी व लहान मुले होती. अचानक बसलेल्या धक्क्यामुळे पत्नी वेड्यापिशा झाल्यात. ही सर्व मंडळी महाराजांना ओळखत. पू. श्रीदत्तमहाराज आल्याचे त्यांना कळले होते. महाराज त्यांना भेटावयास गेले तर त्यांना दुःखात सुख होईल, धीर येईल. "श्री महाराज आताच प्रवासाहून आले आहेत, झोपले आहेत उद्या दुपारी आपण चौकशीसाठी या म्हणजे त्यांना विचारुन काय ते सांगता येईल" असे त्यांचे बरोबर असलेल्या साधकांनी त्यांना सांगितले. आलेल्या भगिनी जाताना पुन्हा पुन्हा म्हणत होत्या की महाराजांना घेऊन येण्याचे जमवा.

"जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले."

सायंकाळी पू. श्रीमहाराजांजवळ हा विषय होऊन सर्व हकिगत त्यांना सांगण्यात आली. उद्या निरोप काय देऊ असे विचारताच क्षणाचाही विलंब न लावता महाराज म्हणाले, " जायलाच पाहिजे न जाऊन कसे चालेल?" श्रीदत्तमहाराज पुढे म्हणाले,

"मैत्री करुणामुदितो पेक्षाणां सुख दुःख पुण्यापुण्य विषयाणां भावनातश्चित प्रसादनम्"

(योगसूत्र १/३३)

"उद्या पाच वाजता येतो. असे कळवून टाका म्हणजे त्यांना खेप घालावी लागणार नाही" असे महाराज म्हणाले.

'मनाचा मवाळू स्नेहाळू कृपाळू' अशी संतांच्या मनाची अवस्था असल्यामुळे त्यांचा अपेक्षारहित वात्सल्यभाव असतो.

दुसरे दिवशी बरोबर पाच वाजता श्रीमहाराज त्या घरापाशी पोचले. दुःखाची गाढ छाया घरावर पसरलेली होती. आबालवृध्दांच्या नेत्रातून अश्रुधारा वहात होत्या. शोक अनावर झाला होता. पू. श्रीमहाराजांचे आगमन झाल्यावर दुःखाचा आवेग ओसंडून बाहेर पडला. पाच मिनिटे कोणी काहीच बोलले नाही. पू. श्रीमहाराजांनी असा दुःखावेग वाहून दिल्यावर अगदी शांत मनाने बाहेर बसलेल्या सर्व मंडळीचे सांत्वन केले. ज्या भगिनींवर हा प्रसंग ओढवला होता त्यांना महाराजांनी धीर दिला. "काही काळ गेल्याशिवाय दुःख कमी होत नाही. लक्ष न लागले तरी नामस्मरण करीत असावे. देव सर्वांचा सांभाळ करीत असतो. आपल्या मनाला धीर यावा अशी आम्ही देवापाशी प्रार्थना करू." या वाक्याने बाईंचा शोकावेग खूप आवरला. त्या क्षणभर शांत झाल्या. महाराज काय सांगताहेत ते ऐकू लागल्या. शेवटी त्या म्हणाल्या "आपण आलात यात सारे आले. मनाला धीर आला. प्रत्यक्ष देवच घरी येऊन बोलताहेत असे मी समजते. आपण पाठीशी आहात तेव्हा मला धीर धरायला हवा. मन सावरायला हवे. ते धैर्य आपण मला द्या." सर्वांचे सांत्वन करुन महाराज उठले. इतर नातेवाईकांना म्हणाले, "त्या अतिशय दुःखात आहेत ते सोसताना त्यांना जितका आधार देता येईल तो आता दिला पाहिजे. त्यांना निराधार वाटू न देणे हेच नातेवाईकांचे काम असते. आम्ही येतो सर्वांनी जपून रहावे. ईश्वराचे स्मरण ठेवून वागावे."

"ऐशी कळवळ्याची जाती करी लाभावीण प्रिती" असे या प्रसंगात दिसून येते. असे संतांचे अबोल कार्य असते. ते आपल्याला कळत नाही. संतांच्या या कामाची नोंद कुठेही नसते. त्यांची समाजसेवा म्हणजेच ईश्वरसेवा अखंड चालू असते. त्याचा गाजावाजा नसतो. प्रसिध्दी तर नकोच असते. त्यांच्या प्रवासात कितीतरी संकटग्रस्त लोकांना मदतीचा हात मिळतो. कुणाला प्रोत्साहन मिळते. आरोग्य सुधारते. अनेकविध गोष्टी संताच्या हातून घडत असतात.

क्रमशः –

*******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-२९ *

माणगावकडे प्रयाण

सह्याद्रीच्या कुशीत असलेले सावंतवाडी हे संस्थान आहे. सावंतवाडी संस्थानमधील माणगाव हे, श्री देवी यक्षिणीच्या कृपाप्रसादाने आणि प.प. श्रीवासुदेवानंदांच्या अवताराने सुखाने नांदणारे  गाव आहे. पू. श्रीस्वामीमहाराज ही भारताला महाराष्ट्राने दिलेली एक फार मोठी देणगी आहे.

देवी यक्षिणी, चौसष्ट योगिनींपैकी एक मुख्य योगिनी असून ती नरसिंहस्वामी महाराजांच्या अवतार समाप्तीनंतर, त्यांच्या आज्ञेने माणगावी येऊन राहिली. स्वामी महाराजांचा अवतार या ठिकाणी होण्यापूर्वी, नरसिंहसरस्वती स्वामीमहाराजांनी यक्षिणी देवीला सांगितले की, तू थोडे दिवस अमरेश्वर येथे राहून नंतर माणगावी जा, अशी पौराणिक कथा आहे. माणगावी जाण्याची फार ओढ प.पू श्रीदत्तमहाराजांना लागली होती.

पू. श्रीदत्तमहाराज मंदिरात, श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांपुढे हात जोडून उभे होते. त्यांच्या नेत्रातून अश्रुधारा वहात होत्या. ते त्यांची भावावस्था कधी समजू देत नाहीत. आज मात्र अनावर झाले असावे.

संत सहवासात भक्तीचा जिव्हाळा कळतो. निरपेक्ष प्रेमाचा अनुभव येतो.कुणाचे मन न दुखावता वागण्याची हातोटी कळते. परदुःखाची कणव संतांना किती आहे हे समजते. व्यवहार करताना भगवंताचा आधार कसा धरतात, हा गृहपाठ मिळतो. संत सहवास मिळत असेल तेवढा घ्यावा. पण त्यातून शिकून घ्यावे. डोळसपणा ठेवावा म्हणजे जीवनात आनंद मिळेल. स्वामीमहाराजांनीच सांगितले आहे.

सदा संतांपाशी जावे त्यांचेजवळी बैसावे। जरी ते उपदेश न देती तरी ऐकाव्या त्या गोष्टी ॥ तेची उपदेश होती त्याने कष्ट नष्ट होती। वासु म्हणे संत संगे करिती पसंत।।

श्रीदत्तजयंतीनिमित्त सात दिवसांच्या सोहळ्याच्या प्रथम दिवशी पू.श्रीमहाराजांचे माणगांवी आगमन झाले. त्यामुळे या सप्ताहातील कार्यक्रमातील पहिले प्रवचनाचे पुष्प महाराजांच्या हस्ते गुंफले गेले. या योगायोगामध्ये ईश्वरीकृपेचा संकेत होता. हे दत्तमंदिर प.प. श्रीवासुदेवानंदांनी स्वतः हाताने काम करून बांधलेले आहे. पुढे त्याचा विस्तार झाला आहे. याठिकाणी स्वामीमहाराजांच्या पूजेतील अगदी छोट्या सोन्याच्या पादुका आहेत. त्या कोणाला पूजा करायला किंवा हात लावायलाही देत नाहीत.

त्या पुजाऱ्यांनाच बुध्दी झाली. ते पू. श्रीमहाराजांना म्हणाले, "आपण पहाटे पाच वाजता या पादुकांची पूजा करावी. प.प. श्रीस्वामी महाराजांच्या हातची अशी एकच वस्तू येथे आहे."

श्रीमहाराजांना या सेवेचा परमानंद झाला. पूजेची सर्व तयारी यथासांग केली. पहाटे पाच वाजता  पू. श्रीमहाराज सर्व आटपून सोवळे नेसून देवळात हजर झाले. गाभाऱ्याच्या बाहेर थोडी जागा आहे. त्या जागेपुढे लाकडी

कठडा आणि पुढे सभामंडप आहे. गाभाऱ्याच्या बाहेरील थोड्याशा जागेत फक्त महाराजांचा प्रवेश झाला. सोवळ्यातून त्या अंगुष्टामात्र सुवर्ण पादुका पूजाऱ्यांनी बाहेर आणल्या आणि पू.श्रीमहाराजांच्या हातावर ठेवल्या.

पू. श्रीमहाराजांच्या हाती त्या पादुका आल्यावर श्रीमहाराजांची भावसमाधी लागली. डोळ्यातील अश्रुंनी पादुकांना स्नान घडायला नको, म्हणून श्री महाराजांनी त्या पादुका मस्तकी लावल्या. स्वामीमहाराजांच्या समग्र साहित्याचे पुनर्मुद्रण झाले. पुण्याला श्री वासुदेव निवास उभा राहिला. यापेक्षाही या छोटया सुवर्ण पादुका हाती आल्यावर प. प. श्रीस्वामीमहाराजांच्या अंतरात प्रवेश केल्याचे सौख्य त्या पादुका स्पर्शाने झाले असणार!

प.प.स्वामीमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांच्या जन्मानंतर दहा दिवसाच्या आतच श्रीमहाराजांचे घरी येऊन "वक्रतुंड महाराज आपण आलात" असे भविष्य वर्तविले. त्या स्वामी महाराजांच्या सुवर्ण पादुका हाती आल्यानंतर स्वामीमहाराज भेटल्याचा आनंद मनात दाटून आला असावा. पूजा खूप शास्त्रोक्त झाली. आरती प्रसाद झाला. तृप्तीचे समाधान सर्वांच्याच चेहे-यावर पसरले होते. पू श्रीवक्रतुंडमहाराज म्हणजे श्रीमहाराजांचे आजोबा. तेही मोठे अधिकारी पुरुष होते.

क्रमशः –

******************************************

## ⁎ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-३० ⁎

नमस्कार श्री सद्गुरु वामनांना (मु. कुडुत्री)

माणगावचे दर्शना नंतर प.पू. श्रीदत्तमहाराजांनी राधानगरी वरून कुडुत्रीला जावे, असे ठरविले.

महाराष्ट्रात शक्तिपात विद्येची गंगा वाहून आणणारे योगीराज श्रीगुळवणी महाराज हे कुठे एका कोपऱ्यातील खेडेगावात जन्मास आले! ज्यांच्या जन्माने गावाला मोठे केले, तीर्थयात्रेचे ठिकाण बनविले. श्रीगुरुमहाराजांनी आपले खरे रुप किती झाकून ठेवले होते. कित्येक वर्षे लोकांना हे ऐश्वर्य माहीतच नव्हते, कल्याण मासिकात लेख आला तेव्हा लोकांना श्रीगुरुमहाराजांची योग्यता, थोरवी कळली.

कुडुत्री मध्ये आल्यानंतर गाडीतून  पू. श्रीदत्तमहाराज उतरले. घरात पाऊल टाकण्यापूर्वी नमस्कार केला. बाहेर पडवीला एक गाय बांधली होती. जवळच वासरु उभे होते. ओट्यावर एक शेतकरीणबाई धान्य पाखडीत होत्या. फळकट बाजूला पडत होते. दाणे सुपात रहात होते. मनात सहजच येऊन गेले. ब्रह्मरुपतेचे उत्तम बीज येथे अंकुरले.

आम्हाला पाहिल्यावर बाई गडबडीने उठल्या. पू. श्रीदत्तमहाराजांनी पाय धुण्यापूर्वी ते पाणी डोळ्याला लावले. येथेही महाराज खूपच गंभीर व अंतर्मुख वाटत होते.

एक अगदी लहानशी खोली. उजेडही बेताचाच. समोर एका कोनाड्यात आश्रमात 'कमलपुष्पात महाराज' असा जो फोटो होता तो ठेवलेला होता. झेंडूचा हार घातलेला होता. समई तेवत होती. पुढे एक नारळ होता. त्या कोनाड्याला तारेची चौकट बसविली होती.

पू. श्रीमहाराजांनी साष्टांग नमस्कार घालून ते खोलीत बसले. पुन्हा पुन्हा फोटोकडे बघत होते... एकच वाक्य मुखातून बाहेर आले "एवढे थोर योग-सामर्थ्य असलेले आपण या ठिकाणी जन्मून भारताला धन्य केलेत"

"गुरुवरा ओवाळू आरती", ही आरती ढापरेकाका व श्री मनोहर पाध्ये यांनी म्हटली. लौकिकार्थाने खेडेगावातील लहान घर पण माझ्या भावनिक विश्वात आपण एखादा राजवाडा पहातो आहे असे वाटत होते. स्वयंपाकघर, छोटेसे माजघर, मागे पडवी, अंगण सारे होते. हे घर ह्या बाईंनी विकत घेतले होते, याचे मात्र मनाला वाईट वाटत होते. ही स्मृती आपणाकडे रहावयास हवी होती असे वाटत होते.

इतक्यात गावातील जुन्या जाणत्या वृध्द भगिनी तेथे आल्या. प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या आठवणी सांगू लागल्या. "प. पू. श्रीगुरुमहाराजांना येथे सर्व दादा म्हणत असत. दादांची आई उमाबाई फार मायाळू होत्या. दादा फार मोठे झाले. पुण्यात आश्रम बांधला पण आम्हाला विसरले नाहीत. नेहमी म्हणायचे 'या साऱ्याजणी पुण्याला'. पण आमचे जमलेच नाही बघा. त्यांचे मोठेपण इथे त्यांनी कधी दाखवले नाही. साऱ्या माहेरवाशिणी कुठे आहेत, कशा आहेत अशी चौकशी करायचे. सर्वांसाठी कापड, लुगडी काही ना काही भेटी घेऊन यायचे ते, कधीही विसरले नाहीत. त्यांना कोणी महाराज म्हणतात. पण दादा इथे आले की म्हणायचे, 'इथे मी महाराज वगैरे नाही बर कां. तुमचा दादाच आहे मी'. बाकी दादा फार साधे होते."

पडवीला एक उखळ पुरलेले होते. मनांत आले श्रीगुरुमहाराजांना दूध पोहे खूप आवडत असत. या उखळात पोहे कांडून श्रीगुरुमहाराजांच्या आईने किती वेळा तरी खाऊ घातले असतील,

बाई म्हणत होत्या. "बाबा येथे आल्यापासून गुरुवारी येथे बरेच लोक येतात. नवसही बोलतात. नारळ फोडतात."

प. पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले, "येथे रोज समई लावून ठेवत चला."

पू. श्रीमहाराजांनी आत जाऊन निरोप घेतला. त्यावेळी ते डोळे मिटून शांत बसले होते. काय बरे बोलले असतील श्रीगुरुमहाराजांशी, या विचाराने माझे मलाच हसू आले. जेथे द्वैतभाव संपला आहे. अशी ती भेट होती. सिध्दभेट होती.

तिथल्या लोकांचा भाव व मनाला थोडी आलेली भावनोत्कटता याबद्दल बोलताना पू. श्रीदत्तमहाराज म्हणाले, " परमेश्वराला भक्तीने आपला करता येतो. तुकाराम महाराज म्हणतात-

मन वाचातीत तुझे हे स्वरूप । म्हणोनिया माप भक्ती केले ।।

भक्तिचिया मापे मोजतो अनंता | इतरांनी तत्त्वता न मोजावे ।।

योगयाग तप देहाचिया योगे । ज्ञानाचिया यागे न सापडसी ।।

तुका म्हणे आम्ही भोळ्या भावे देवा । घ्यावी जी केशवा करतो ऐसी ।।

भावभक्तीची ओंजळ अशा रीतीने श्रीगुरुमहाराजांच्या चरणी अर्पण केली.

क्रमशः

*******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-३१ *

कोल्हापूरच्या अंबाबाईचे दर्शन

प. पू. श्रीदत्तमहाराज कुडुत्री येथून पुण्याला येताना कोल्हापूरला आले. प्रथम अंबाबाईचे दर्शन घेतले. तिची ओटी भरली. प्रसाद घेतला. शक्तिमातेकडे शक्तिपीठाचे अधिकारी आले होते. पाच मिनिटे स्वस्थ बसून दर्शन घेण्याची पू. श्रीदत्तमहाराजांची पध्दती होती. पू. श्रीदत्तमहाराजांची नात सौ.सुमनताईंची कन्या कोल्हापूरात असते. तिच्या घरी जाऊन तिला भेटले.

पुण्यास येताना रात्री गाडीमध्ये पू.श्रीमहाराज थोडे बोलण्याच्या ओघात होते. सर्वजण म्हणाले, "आपल्यामुळे आम्हाला कुडुत्रीचे दर्शन घेता आले." पू. श्रीमहाराज लगेच म्हणाले, "कोणत्याही कर्माचे कर्तेपण मनापासून भगवंताकडे सोपविले तर ईश्वरी सत्ता आपल्या जीवनात कल्पनेच्या बाहेर गोष्टी घडवून आणते, असा संतांचा प्रत्यक्ष अनुभव असतो. मीपणाची जाण, अस्मिता आणि कर्तेपणावर भरवंसा हा मानवी मनाचा मूलधर्म असतो. तो संत आपल्या वाङ्मयातून घालवितात. आपण आपलं समग्र जीवन हीच साधना मानावयाची असते."

गाडी पुण्यात आली. घरच्या रस्त्याला लागण्यापूर्वीच पू. श्रीमहाराज एकदम म्हणाले "गाडी आश्रमाकडे न्या. श्रीगुळवणी महाराजांच्या दर्शनाशिवाय घरी जाणार नाही. आज आम्ही आश्रमातच राहू."

श्रीगुरुमहाराज आश्रमात आहेतच. ते गेलेले नाहीत ही त्यांची अगदी दृढ भावना आहे. श्रीगुरुमहाराजांचे प्रथम दर्शन म्हणून ते आश्रमातच राहिले. गुरुभक्तीचा हा उच्चांक होता. उत्तराधिकारी होऊनही त्या खोलीत ते बसत नव्हते. गुरुमहाराजांपुढे ते कधीच बसले नाहीत. अखेरपर्यंत त्यांची तीच भावना राहिल्यामुळे त्यांच्या नम्र मनोवृत्तीत कधीच बदल झाला नाही. रात्री श्रीमहाराज आश्रमात राहिले.

दिल्ली दौरा

पू. श्रीदत्तमहाराजांचे भारताच्या राजधानीत साधारणतः तीन वेळा निरनिराळ्या कारणांनी आगमन झाले.

१९७० मधे राष्ट्रीय पंडित हा सन्मान राष्ट्रपतींच्या हस्ते स्वीकारण्यासाठी, १९८० मध्ये श्रीदत्तविनायक मंदिराच्या स्थापनेसाठी, १९८२ साली भागवत सप्ताहासाठी.

दिल्ली भारताची राजधानी. तेथे यथार्थत्वाने भारतदर्शन होते. सर्वच राज्यांतील कित्येक मंडळी दिल्ली येथे वास्तव्य करून आहेत. मराठी समाजही मोठ्या प्रमाणावर सुप्रतिष्ठित आहे. प्रायः सर्वच भाषिक समाजांची सांस्कृतिक केंद्रे तेथे असून दिल्लीचे समाज जीवन समृध्द झाले आहे. श्रीगणेश आणि श्रीदत्तात्रेय ही मराठीजनांची विशेष प्रिय दैवते. दिल्ली येथे मंदिर उभारून या दैवतांची प्रतिष्ठापना करावी असा दिल्ली मराठी मंडळींचा संकल्प होता. ईश्वरकृपेने हा सत्संकल्प पूर्णतः सिद्धीस गेला. दिल्ली येथील जनकपुरी भागात श्रीदत्त विनायक मंदिर निर्माण झाले असून श्रीगणेश आणि श्रीदत्तात्रेय सर्व भक्तजनांना अभय देत विराजमान आहेत.

जून. १९८२ मध्ये पू.श्री दत्तमहाराज भागवत सप्ताहासाठी दिल्लीला आले. शुक्रवार दि. २५-६-१९८२ ला श्री भागवत सप्ताहास प्रारंभ झाला. गुरुवार दि. १-७-१९८२ ला आषाढी एकादशीस सप्ताहाची समाप्ती झाली. शुक्रवार दि. २-७-१९८२ ला महाप्रसाद झाला.

पू. श्रीमहाराजांची विद्वता, न्याय व वेदांत शास्त्राचे सखोल अध्ययन, श्रीज्ञानेश्वरी, दासबोध आणि गाथा या प्राकृत ग्रंथांचा गाढा अभ्यास, सधर्माचरण व भागवताचा असामान्य व्यासंग यामुळे पहिले राष्ट्रपती डॉ. बाबू राजेंद्रप्रसाद यांनी पू. श्रीमहाराजांना 'विद्यावाचस्पति' ही मानाची पदवी देऊन गौरविले.

राष्ट्रपती श्री. गिरी यांनीही 'राष्ट्रीय' पंडित म्हणून बहुमान केला व मानधन सुरु केले.

श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या ग्रंथांचे सम्यक जाणकार म्हणून पू. श्रीमहाराजांचा चारही पीठांच्या श्रीशंकराचार्यांनी महावस्त्र व सन्मानपत्र देऊन गौरव केला. कांचीकामकोटी पीठाधीश्वरांनी विशेष गौरव करून सुवर्ण कंकण प्रदान केले.

पुण्यामधील श्रीदेवदेवेश्वर संस्थान पर्वती, या सुप्रतिष्ठित संस्थेने श्रीमहाराजांचा 'श्रीमंत नानासाहेब पेशवे धार्मिक व आध्यात्मिक पुरस्कार' देऊन बहुमान केला.

महाराष्ट्र शासनाने 'आदर्श अध्यापक' म्हणून सन्मान केला. पुण्यामधील अनेक मान्यवर संस्थांनी महाराजांचा गौरव केलेला आहे. हे सारे गौरव म्हणजे पू. श्रीमहाराजांच्या भगवत् अंशाचा प्रत्ययच होय.

सन् १९५४ मध्ये हैद्राबाद येथील भाग्यनगरमध्ये प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराजांचा जन्मशताब्दी महोत्सव प. पू. श्रीगुळवणी महाराजांनी मोठ्या प्रमाणात साजरा केला. त्यावेळी श्रीस्वामीमहाराजांचे समग्र वाङ्मय बारा खंडात प्रकाशित करून श्रीस्वामीचरणी समर्पित केले. या वाङ्मयाचे संशोधन, संपादन, मुद्रित शोधन आणि प्रत्यक्ष प्रकाशन ही सारी कामे श्रीमहाराजांनी ८-९ वर्षे अतीव निरलसपणे व अत्यंत साक्षेपाने केली. विद्यापीठातील प्रज्ञावंत अधिष्ठात्याला शोभेल असे हे काम होते.

क्रमशः –

******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-३२ *

*सहस्त्रचंद्रदर्शन शांती सोहळा *

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवन शांत समाधानी व प्रसन्न होते. त्यांची स्थिरता त्यांच्या सहवासात येणाऱ्या सर्वांनाच जाणवत असे. आनंद चक्रवर्तीं साम्राज्यावर ते खरोखरीच अधिष्ठित झाले होते. आपल्या भारतीय आध्यात्मिक तत्वज्ञानाप्रमाणे आत्मज्ञान झाल्यानंतरही माणसाने कार्यरत रहावे असे सांगितले आहे.

'फेडित पाप ताप। पोषित तिरीचे पादप' अशा तऱ्हेने त्यांची जीवनगंगा वहात होती. जीवनाचे ध्येय गाठले असले तरी लोकांकरिता ते जगत होते. पू. श्रीमहाराजांचे चरित्र श्रीज्ञानदेवांच्या शब्दांत सांगावे तर, चातुर्य शहाणे करणारे, ज्ञानाला गोडी देणारे, कर्माला माधुरी आणणारे व भक्तीला भरती येणारे झाले होते.

ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभावीण प्रिती, लोकांवर अपेक्षारहित प्रेम करुन त्यांच्या हिताचा मार्ग आपल्यापरीने पू. श्रीमहाराज सांगत असे. कर्तेपणाचा सर्व भार ते ईश्वरावर टाकत. करुन अकर्तेपण घेत असे. अशा तऱ्हेने पू. श्रीदत्तमहाराजांचे जीवन 'उरलो उपकारापुरता' असे झाले होते.

अशा निष्काम कर्मयोगी भक्ताचे कौतुक करण्याची भगवंताला खूप इच्छा असते. सामान्यपणे जीवन जगणाऱ्या संत महात्म्यांचे महत्त्व लोकांना कळावे, हा त्या कौतुकामागे हेतू असतो. त्याची प्रेरणा ईश्वर कोणाच्या तरी मनात करत असतो.

पू. श्रीमहाराजांनी ऐंशीव्या वर्षांत पदार्पण केले. भगवंतानी वासुदेव निवास विश्वस्तांच्या मनांत प्रेरणा निर्माण केली. या पुनित जीवनाचा सहस्रचंद्रदर्शनशांती महोत्सव करावा असे एकमताने ठरले. यासाठी एक गौरव समिती स्थापन झाली. त्याला योग्य असे अधिकारी शास्त्रसंपन्न पंचांगकर्ते श्रीधुंडिराजशास्त्री दाते लाभले. सहस्त्रचंद्रदर्शन शांतीच्या सोहळ्यास आरंभ झाला.

दि. ११ मे १९९० ते १८ मे १९९० असे महोत्सवाचे दिवस होते. त्यावेळी ही कार्यक्रमपत्रिका मराठीप्रमाणे राष्ट्रभाषेत काढण्याचे ठरले त्याला हिंदी साज देण्याचे काम श्री. मधुकर पित्रे, अलाहाबाद यांनी केले.

या सोहळ्यामध्ये पुढील मान्यवरांनी दि ११ ते १८ चे दरम्यान प्रवचने केली.

करवीर पीठाधीश्वर श्रीशंकराचार्य प. प. श्रीविद्याशंकर भारती स्वामीमहाराज,

पं. धुंडिराजशास्त्री दाते, पंचांगकर्ते सोलापूर.

ह. भ. प. श्री किसनमहाराजजी

साखरे (आळंदी)

डॉ. ज. वा. जोशी तत्वज्ञान विद्यापीठ, अंमळनेर.

श्री. शिवाजीराव भोसले कुलगुरु, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. श्री.भालचंद्रशास्त्रीजी मुळे, त्र्यंबकेश्वर.

प्रा. श्री.सु. ग. शेवडे, चेंबूर.

डॉ. सौ. उमा देशपांडे, बडोदा,.

श्री. वामन निवासात हे संपूर्ण कार्य पार पडले. वामन निवासाबाहेरील मंडपात भजन, प्रवचन, कीर्तन असे कार्यक्रम सतत आठवडाभर चालू होते. यज्ञकुंडे वामननिवासाच्या परिसरांत घातली होती. अनेक मान्यवर ऋत्विज गावोगावाहून आले होते. दिगंबरांची धुन चालू होती. त्या नामघोषाने सारा वामन निवास दुमदुमत होता.

याशिवाय पुण्याहवाचन, यज्ञयाग, अन्नदान, कुमारिका पूजन तसेच पद्‌मश्री पं. जितेंद्र अभिषेकी आणि छोट्या गंधर्वांचे गायन पार पडले.

वामन निवासांत व्यासपीठावर पांरपारिक असा मोठा देव्हारा ठेवला होता. हा देव्हारा म्हणजे जणू पू. श्रीमहाराजांचे मनोमंदीर होते. प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांनी त्यांना पुत्रवत् मानले. 'ये हृदयीचे ते हृदयी घातले। द्वैत न मोडिता केले आपणासारखे तात्काळा' अशा श्रीगुरुमहाराजांची 'पदकमले' या देव्हाऱ्यात दत्तात्रेयांसह विराजमान झाली होती.

पू. श्रीदत्तमहाराजांच्या हृदयांत या पादुकांचे मानसपूजन अखंड चालू असे. पुण्याहवाचनाच्या दिवशी देव्हाऱ्यातील या पादुका पू. श्रीमहाराजांचा सर्व सोहळा बघण्यासाठी व आशिर्वाद देण्यासाठी प्रत्यक्ष रुपाने स्थानापन्न झाल्या.

शुक्रवार दि. १८ मे १९९०

हा मुख्य कार्यक्रमाचा शेवटचा दिवस. या दिवशी सकाळी सहस्त्रचंद्रदर्शन विधीचा सोहळा संपन्न झाला. ज्याच्यासाठी वर्षभर धडपड चालली होती तो हा कार्यक्रम वासुदेव निवासाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा अपूर्व होता. प्रत्येक महिन्याच्या शुक्ल व्दितीयेस दिसणाऱ्या चंद्रकोरीला चंद्रदर्शन असे म्हणतात. हा चंद्र उत्तरोत्तर वृद्धींगत होणारा असतो, तसेच दीर्घायुष्य देणारा असतो. "चंद्रमा मनसो जाताः।" चंद्र परमेश्वराच्या मनापासून निर्माण झाल्याने मनाचा कारक ग्रह चंद्र आहे. शास्त्राने ऐंशी वर्षे पूर्ण झाल्यावर हा विधी सांगितला आहे. या निमित्ताने शताभिषेक केला जातो. शंभर छिद्रे असलेले रौप्यपात्र तयार करवून घेतले होते. त्यात वेदाभिमंत्रित जल घालून शतधारांनी महाराजांच्या मस्तकावर जलाभिषेक केला ते रौप्यपात्र दान दिले. ज्या ईशशक्तीच्या प्रेरणेने इतका मोठा भव्य कार्यक्रम संपन्न झाला, ती शक्ति अनंत हस्ताने हे मंगलकार्य पार पाडत होती.

सहस्त्रचंद्रदर्शन शांतीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे रौप्यतुला. मंत्रघोष चालू होता. पूजाविधी झाल्यावर तराजूला प्रदक्षिणा करुन पू. श्रीदत्तमहाराज दत्तात्रेयांचा फोटो हातात घेऊन तराजूत आसनस्थ झाले. दुसऱ्या पारड्यांत रौप्य टाकले जाऊ लागले. दोन्ही पारडी समान झाली. आईसाहेबांनी त्यांत तुळशीपत्र टाकून नमस्कार केला. मंडपातून एकच गजर झाला. "श्री गुरुदेव दत्त" मंत्रमुग्ध झालेला जनसमुदाय हेलावला. हजारो मुखांनी केलेला अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त हा मंत्रोच्चार कितीतरी दूरवर निनादला.

क्रमशः –

*****************************************

## ⁎ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-३३ ⁎

सहस्त्रचंद्रदर्शन शांती सोहळा

ज्या क्षणाची सर्वजण आतुरतेने वाट पहात होते तो क्षण म्हणजे 'सत्कार समारंभ', जवळ येऊन ठेपला. करवीर पीठाचे शंकराचार्य यांच्या उपस्थितीत हा समारंभ साजरा होत होता. मांडव संपूर्ण भरून गेला होता.

संस्थान कुरवपूर, नृसिंहवाडी, औदुंबर, गाणगापूर, कांचीकामकोटीचे जगतगुरु शंकराचार्य, शृंगेरीपीठाचे शंकराचार्य, श्रीधर स्वामी संस्थान, वरदहळीकी या पवित्र धामांकडून आलेल्या आशीर्वादपर मंगलाक्षता पंडित श्रीनिवासशास्त्री यांनी पू श्रीदत्तमहाराजांच्या मस्तकावर वाहिल्या. सर्वांना समाधान वाटले. समारंभाचे अध्यक्ष, करवीर पीठाचे जगत्गुरू शंकाराचार्य विद्याशंकर भारतीमहाराज यांचा पुष्पहार, शाल, गौरवचिन्ह व श्रीफळ देऊन सत्कार केला. प्रमुख अतिथी अविच्छिन्न परंपरा कुडली शृंगेरी मठाचे श्रीमत् शंकराचार्य योगाभिनव नरसिंहभारती स्वामीमहाराज यांचा असाच सत्कार समितीचे उपाध्याय माननीय किशोरजी व्यास यांनी केला.

श्रीमत् जगतगुरु कांची कामकोटी पीठाचे परमार्थ जगतगुरू चंद्रशेखर सरस्वती स्वामीमहाराज यांच्याकडून महाराजांचा सत्कार करण्यासाठी कामाक्षीची प्रतिमा असलेली सुवर्णसाखळी व शाल आली होती. कुडली शृंगेरी मठाकडून शालजोडी आली आणि महाराजांसाठी पुणेरी पद्धतीची खास पगडी तयार करून घेण्यात आली आणि गुलाबपुष्पांचा हार अर्पण करण्यात आला. १००१ रु. ची थैली, श्रीफळ व इतर फळांचे ताट अशा सर्व गोष्टी त्यावेळी महाराजांना देण्यात आल्या.

काशीक्षेत्राहून आलेल्या मानपत्राचे वाचन पं. गणेशशास्त्र्यांनी केले. देऊळगावराजा येथून प.पू. श्रीधुंडिराज महाराज कवीश्वर समाधी मंदिर व श्रीदत्तमंदिर उपासना धाम विश्वस्त मंडळींकडून आलेले मानपत्र वाचून दाखविले. पिताजींच्या गावाहून आलेल्या मानपत्राचा जिव्हाळा काही वेगळा होता.

महर्षि वेदव्यास प्रतिष्ठान अहमदनगर यांच्यातर्फे रोख पैसे, कृष्णार्जुनाची चांदीची मूर्ती असलेला रथ व मानपत्र,श्री ओंकारनाथजी मालपाणी यांनी महाराजांना अर्पण केले.

वेगवेगळ्या संस्थांकडून पू. श्रीदत्तमहाराजांचा गौरव झाला. भेटींचा अक्षरशः वर्षाव झाला. प्रत्येक भेटीतून भक्तांचे हृदयच प्रकट होत होते. लौकिक व्यवहारातील भेटी वेगळ्या असतात. परंतु या सर्व भेटीत अहंकाराचा दर्प नव्हता, तर भक्तीची शालीनता होती. देवाच्या चरणी काहीतरी पोचावे ही सद्भावना होती. म्हणून तो सोहळा बघण्यातही आनंद भरून राहिला होता.

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे आशीर्वाद

पू. श्रीदत्तमहाराजांना प्रथमपासूनच व मनापासून त्यांची स्तुती केलेली आवडत नसे. प. पू. श्रीगुरुमहाराजही स्वतःची केलेली स्तुती कटाक्षाने टाळीत असत. 'सर्व कर्तृत्व ईश्वराचे' असे दोघांच्याही जीवनाचे प्रमुख सूत्र होते. प्रत्येक गोष्टीमुळे अकर्तेपणे पहाण्याचे वळण त्यांच्या इंद्रियाना पडलेले होते.

'पडिले वळण इंद्रिया सकळा। भाव तो निराळा नाही दुजा' या तुकारामांच्या स्वानुभवाप्रमाणे पू. श्रीगुरुमहाराजांचे व्यतीत झालेले जीवन डोळ्यांनी पाहिलेले होते. कोणी जर त्यांना म्हणाले की आपल्या कृपेमुळे, आशीर्वादामुळे चांगली गोष्ट घडून आली. त्यांचे लगेच उत्तर असे. 'ईश्वराची कृपा आहे. आपले पूर्वसुकृत चांगले आहे.'

अकर्तृत्वभाव दोघांचाही एकच असल्यामुळे देह दोन पण शिकवण एक हा अभिन्नतेचा प्रत्यय येऊन गुरूशिष्यांच्या , एकात्मतेची साक्ष सतत पटत असते.

आपल्या आशीर्वादाच्या भाषणात ते म्हणाले, "सहस्त्रचंद्रदर्शन हे शास्त्रीय आणि हितकारक कर्म आहे. म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शिवाय अशी सत्कर्मे ज्या ठिकाणी होतात त्या ठिकाणी सामुदायिक ईश्वरशक्ती विशेष रुपाने अविष्कृत होते. बाह्य विषय विसरून जाणे हे अंतिम समाधान आहे. अशी मंडळी आत्यंतिक श्रद्धेने हे कर्म करीत आहेत हे पहायला मिळाले. या सर्व कार्यकर्त्यांत ईश्वरशक्ती जागृत झाल्यामुळे हे कार्य घडलेले आहे. ती जागृत करणे हे गुरुमहाराजांच्या पीठाचे विशेष कार्य होते. ही शक्ती गेले ७-८ दिवस जागृत होऊन कार्य करीत आहे. तिच्याशिवाय इतके संघटनात्मक कार्य झाले नसते.

पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानी नायकावी।

हा आमुका ऐसी नोहावी । सेचि लोका ॥

असे ज्ञानराजांनी म्हटले आहे. तेव्हां गुरुमहाराजांनी हे सर्व करून घेतले असे मानले तरी खरी कृपा म्हणजे आपल्या सर्वांच्या हृदयात जागृत झालेल्या ईशशक्तीची योग्यता यावी," अशी त्या शक्तींच्या चरणी प्रार्थना करून त्यांनी आपले आशीर्वादाचे भाषण संपवले.

याप्रमाणे सहस्त्रचंद्र दर्शन शांती सोहळा संपन्न झाला.

क्रमशः –

*******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-३४ *

संत कुळीची परंपरा

प. पू. श्रीदत्तमहाराजांची परंपरा संतकुळीची आहे. ही परंपरा सात पिढ्यांची आहे. तसाच प.पू.श्रीवक्रतुंड महाराजांपासून (आजोबा) त्यांचा लोकसंग्रह अमाप आहे. लोकांची सत्प्रवृत्ती वाढविणे आणि त्यांना सन्मार्गाला लावणे यासाठी संतमहात्म्यांचा जन्म असतो. त्यांच्या कार्याची मोजदाद नसते. संत त्याचा उच्चारही करत नाहीत. 'आपुले जे विहीत, ते ईश्वराचे मनोगत' या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे यांचे कार्य अखंड चाललेले असते. या प्रसिद्धीच्या युगात त्यांच्या कार्याची जाण फार थोड्यांना असते. ही संतमंडळी प्रसिद्धीपासून दूर असतात. 'मी करतो' ही भावना पुसून गेलेली असते. सारे कर्तृत्व ईश्वराचे अशी त्यांची खात्री असते. अशा तऱ्हेने संतमंडळी काम करीत असतात. ही संतमंडळी आपल्याप्रमाणे शिष्यालाही तयार करतात. श्रीसमर्थांनी 'आत्माराम' ग्रंथात म्हटल्याप्रमाणे 'स्वामी परीसाचा स्पर्श होता। शिष्य परिसचि झाला तत्वता । गुरुशिष्याची ऐक्यता । झाली स्वानुभवे ॥'

नामयोगी संत श्रीज्ञानदेव दत्तात्रय काजळकरमहाराज

पू. श्रीदत्तमहाराजांचे पिताजी प. पू. श्रीधुंडिराजमहाराज यांचा सुद्धा असा ज्ञानयज्ञ चालू होता. त्यावेळी अनेक शिष्यपरिवारात श्री. ज्ञानदेव दत्तात्रय काजळकर हे एक शिष्य लाभले. 'आपणासारिखे करिती तात्काळ' असे त्यांचे सामर्थ्य होते. प. पू. श्रीधुंडीराजमहाराजांनी त्यांच्यावर परिपूर्ण कृपा केली. त्यांना परिसत्त्व दिले. लौकिकदृष्ट्या ते पोलिस खात्यात नोकरीला होते. जालन्याजवळील अंबड तालुक्यात काजळगावी स्थायिक झाले होते. तेथे त्यांचे घर आहे. त्यांचे मूळ आडनाव कुलकर्णी. ते शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे, काजळ गावी राहिल्याने 'काजळकर' या नावाने प्रसिद्धीला आले.

माझी मज झाली अनावर वाचा | छंद या नामाचा घेतलासे॥

अशी काजळकरांची अवस्था झाली होती. त्यांनी रामनामाचा १३ कोटी जप पूर्ण केला, कितीतरी कोटी रामनाम लिहिले. रामनामाने पावन झालेल्या त्यांच्या वह्या आजही त्यांच्या कन्या ती. सौ. ताईमहाराज यांनी जतन केल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांतील लोकांना भक्तीमार्गाला लावणे हा त्यांच्या कार्याचा विशेष होय. हजारो लोकांना 'ते जीवनाचा फार मोठा आधार आहेत' असे वाटत असे.

हरिनाम वेली विस्तार पावली । फळे फुले भार वोल्हावली ॥

या तुकारामांच्या अभंगाप्रमाणे प. पू. श्रीकाजळकर महाराजांनी विदर्भ मराठवाड्यात खेडोपाडी जाऊन समभावाने हरिनामाचा प्रचार केला. त्यांच्या शिष्यवर्गात मुस्लीम बांधवही होते. वैदिक धर्माप्रमाणे इतरही धर्माचे त्यांना ज्ञान होते. त्यांचा विशेष गुण असा जसे ते भक्तांना उपासना देत. तसे भक्तांचे संकट निवारण्यासाठी स्वतः सुद्धा उपासना करीत. श्रीगुरुचरित्राची अनेक पारायणे व दुर्गासप्तशतीचे पाठ त्यांनी केले. प. पू. श्रीधुंडिराजमहाराज आणि प.पू.श्रीकाजळकर महाराज हे हरिहरांसारखे एकरूप होते.

जालन्याला त्यांच्या कन्या सौ. ताईमहाराज यांनी दत्ताश्रम बांधून त्यांचे नाव अमर केले आहे. श्रीकाजळकर महाराजांचा वास दत्ताश्रमांत आहे. १९७३ साली चैत्र शुद्ध बीजेला ते चैतन्यरुप झाले. लौकिकदृष्ट्या

ते आपल्यात नसले तरी अनेकांना सतत दर्शन देत आहेत. परिचितांना दर्शन देतात त्यात नवल नाही. पण ज्यांनी त्यांना प्रत्यक्ष पाहिले नाही, अशा तरुण मंडळीना सुद्धा ते दर्शन देऊन मार्गदर्शन करीत असतात. व त्यांच्या भक्तांना ते संकटातून तारत असतात.

जे अखंड रामनामाने रामरुप झाले, आत्मारामाला ज्यांनी जाणले, त्या रामभक्त काजळकरांच्या पोटी रामनवमीच्या दिवशी ईश्वरकृपापात्र अशा कन्यारत्नाचा जन्म झाला. त्याच अबोल, सतत रामस्मरणात गुंतलेल्या प्रपंचात परमार्थाचा आधार घेतलेल्या ताईमहाराज आहेत.

भावबळे विष्णूदास नाही नाश पावत।

योग भाग्ये घरा येती सर्व शक्ती चालत।

पित्याचे ते काय धन पुत्रा कोण वंचील।

तुका म्हणे कडे असो तेणे बने निर्भर।।

पू. सौ. ताईमहाराजांनी हा परमेश्वरभक्तीचा वडिलोपार्जित वारसा, पूर्णपणे मिळवला व हा लाभ त्यांनी सर्व बालवृद्धांना मोठ्या आनंदाने पुढे दिला.

क्रमशः

*******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-३५ *

रौद्रीशांती सोहळा

देऊळगावराजा ही प.पू. श्रीदत्तमहाराजांच्या वाडवडीलांची कर्मभूमी! येथे त्यांचे घर आहे. आजोबांपासून मराठवाड्यात भक्तसमूह खूप मोठा आहे. बालाजीचे देवस्थान तेथे आहे. त्याची पुराणसेवा कवीश्वर घराण्याकडे परंपरेने आहे. त्या देवळाचे विश्वस्त श्रीमहाराजच होते. श्रीमहाराजांना त्या गावी जायचे म्हणून आनंद व समाधान वाटत होते. हे त्यांच्या चेहऱ्यावरुन दिसत होते. एप्रिल महिन्याचे दिवस. उकाडा तीव्र होता. पण शीतोष्ण सहन करण्याची शक्ति त्यांच्यात असल्याने त्यांनी कशाचीच काळजी केली नाही. रौद्रीशांती सोहळ्याच्या तारखा निश्चित करण्यासाठी देऊळगावराजाची मंडळी पुण्याला श्रीमहाराजांना भेटली. पू.सौ. ताईमहाराजांच्या विचाराने कार्यक्रम नक्की झाला.

परमपूज्य श्रीगुळवणीमहाराजांची रौद्रीशांती पुण्याच्या एम.ई.एस. कॉलेजच्या प्रांगणात झाली. सहस्त्रचंद्रदर्शनशांती प्रमाणे या सोहळ्याचे कार्यवाह परमपूज्य श्रीदत्तमहाराज होते. त्यावेळी श्रीगुरुमहाराज म्हणाले होते की, 'दत्तमहाराजांचे असे सगळे सोहळे आमच्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर साजरे होतील'. संतांची वाणी कधीच खोटी ठरत नाही.

देऊळगावराजा येथे सर्व यज्ञ यथासांग पार पडत होते. अन्नदान होत होते. रौप्यनाण्याची तुलाही झाली. पंचक्रोशीतून हजारो लोक दर्शनाला येत होते. माणसांची रीघ लागली होती. श्रीमहाराज हे सर्व कसे पार पाडत होते ह्याचे आश्चर्य वाटत होते. मंत्रदीक्षा घ्यायला कुटुंबच्या कुटुंब यायची. श्रीमहाराज त्यांना कृतार्थ करीत होते. उकाडा एवढा प्रचंड प्रमाणात होता, पण महाराजांना पंखा लागला नाही की, 'उकाडा फार' म्हणून तोंडातून शब्द काढला नाही.

ह्या सर्व प्रेमळ भक्तमंडळीच्या अगत्याने, सोहळ्यांनी परमपूज्य दत्तमहाराजांचे मनही भारावले. आपल्या आशीर्वादपर भाषणात ते म्हणाले, "वडीलांची, सद्गुरुंची ही पुण्याई आहे. आमच्या मातोश्रींना सत्पुरुषांच्या गाठीभेटी घेण्याची, वंदन करण्याची स्वाभाविक ओढ होती. त्यामुळे आम्हालाही लहानपणापासून सत्पुरुषांचा सहवास घडला, ही आईची पुण्याई आहे." हे बोलत असताना त्यांचा कंठ एवढा भरुन आला की त्यांना पुढे बोलवेना. “आमच्या पिताजींची रौद्रीशांती ह्या ठिकाणी झाली. आज येथे भक्तमंडळीनी सर्व तऱ्हेचे यज्ञयाग, रौद्रीशांतीचा समारंभ घडवून आणला. ह्या सर्व यज्ञाचे फळ सर्वांच्या हितासाठी व्हावे अशी प्रार्थना देवाजवळ आहे. स्वर्गस्थ मातापितरांना संतोष वाटला असेल असे मला वाटते.” असे विचार मांडून सर्वांचे कौतुक केले.

पू.श्रीमहाराजांच्या दौऱ्याची सुरवात जालन्यापासून झाली. नविनच स्थापन केलेल्या श्री दत्तमंदिरात पू. श्रीमहाराजांचे मोठ्या उत्साहाने स्वागत झाले. पू. सौ. ताईमहाराज धन्य झाल्या. देऊळगावराजाहून श्रीमहाराज पुनः जालन्याला आले. विश्रांती घेऊन पुढे हिंगोलीला गेले.

पू.श्रीमहाराजांची नाजूक झालेली तब्येत, प्रवासाची दगदग. त्यामुळे हा स्वागत समारंभ कसा निभावू शकेल याची सर्वांना काळजी असायची. श्रीमहाराज संस्कृत संमेलनाला उपस्थित राहीले. त्याचे उद्घाटन केले. सर्व पंडितांचा गौरव स्वतःही केला, संस्कृतमध्ये मार्गदर्शनही केले. सर्वच कार्यक्रम बहारीचा सुंदर झाला.

श्री नारायणस्वामी महाराजांच्या पुण्यतिथीचे वाडीचे निमंत्रण आले होते. परंतु मराठवाड्याच्या दौऱ्यामुळे ते शक्य होणार नव्हते. प्रवचन सेवा करायला श्रीमहाराजांना मनापासून फार आवडत. त्यांच्या नाजुक झालेल्या तब्येतीमुळे त्यांना हा त्रास कसा घ्यावा असे वाटत असताना त्यांचे जवळ विषय निघाला. संध्या. ६ चे सुमारास हिंगोली येथील तेल कारखान्याच्या हिरवळीवर अस्तंगत होणाऱ्या सूर्यदेवांना साक्षी ठेवून श्रीमहाराजांनी श्रीनारायणस्वामी महाराजांचे चरित्र जवळजवळ तासभर सांगितले. त्यांना सेवा घडली याचा परमानंद झालेला त्यांच्या शब्दातून, चेहऱ्यावरुन ओसंडत होता.

हिंगोलीत श्रीमहाराजांना ४ दिवस झाले होते. या दिवसात श्रीमहाराजांनी मुक्त हस्ताने मंत्रदीक्षा दिल्या. अनेकांच्या पाद्यपूजा ह्याच सभामंडपात स्विकारल्या.

हिंगोलीच्या कार्यक्रमातला सर्वोच्च भाग म्हणजे श्रीमहाराजांची हत्तीवरुन मिरवणूक हा होता. रौद्री शांती समारोहातील हा एक भाग असतो. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांची अशी मिरवणूक निघाली होती. पू. श्रीमहाराजांची अशीच मिरवणूक निघेल अशी सदिच्छा श्रीगुरुमहाराजांनी व्यक्त केली होती. प. पू. श्रीगुळवणी महाराजांची इच्छा फलद्रुप होण्याचा योग मराठवाड्यात झाला.

शेगांवच्या श्रीगजाननमहाराजांचा  हत्ती शेगांवहून ट्रकने हिंगोलीला आला. श्रीमहाराज स्वस्थ चित्ताने हत्तीवरच्या अंबारीत स्थानापन्न झाले होते.

गजराज निघाले. त्याच्या पुढे सुवासिनी डोक्यावर कलश घेऊन चालल्या होत्या. त्यांच्या दिमतीला बॅन्ड होता. पाठीमागेही मंडळी दिगंबराचा गजर करीत चालली होती. त्या सुखाच्या क्षणी सर्वांचे नेत्र श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी लागले होते. श्रीमहाराज स्थितप्रज्ञ वृत्तीने हा सर्व सुखसोहळा अनुभवित होते. "श्रीअवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्ताची" आरोळी गगनात निनादली. श्रीमहाराज पुन्हा एकदा शिडीवरून पायउतार झाले त्यांनी प्रेमभराने हत्तीच्या सोंडेला हात लावला. नमस्कार केला. श्री गजाननमहाराजांचा तो हत्ती होता. सोंड दुमडून महाराजांना त्यानीही प्रणीपात केला.

क्रमशः –

*******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-३६ *

बार्शीच्या भगवंताकडे

तब्येत ठिक नसल्याने बराच काळ पू. श्रीदत्त महाराजांचे बार्शीला येणेच घडले नव्हते. दुपारचा फराळ, थोडी विश्रांती घेऊन श्रीमहाराज व सर्व मंडळी बीड,वैराग मार्गे सायंकाळी बार्शीला पोचली.

रात्रौ ९ ते १० ह्या वेळात श्रीमहाराजांनी भगवंतापुढे श्री शंकरजयंती निमित्त  आद्य श्री शंकराचार्यांच्या चरित्रावर आपली प्रवचन सेवा रुजू केली. ईश्वरी इच्छेनेच सर्व घडून येते.

रविवार दिनांक १५/५/१९९४ रोजी श्रीमहाराजांनी बार्शीच्या भगवंतांची महापूजा केली. वैदिक ब्राह्मणांचा यथोचित सन्मान केला.

दुपारी भोजनानंतर वैदिक ब्राम्हणांनी मंत्रजागर केला. श्रींच्या दर्शनासाठी लोकांची रीघ लागली होती. येथेही अनेकांना मंत्रदिक्षा झाल्या.

बार्शीच्या श्री. काका कुळकर्णी यांची जागा बरीच अडचणीची परंतु मंदीराला लागून होती. कित्येक वर्षांचा श्रीमहाराजांचा त्यांच्याकडे उतरण्याचा परीपाठ होता. श्रीमहाराजांचे पिताश्रीही त्यांच्याकडेच उतरत. बार्शीच्या भगवंताबरोबरच ती. सौ.आईसाहेबांचे माहेर बार्शीचे.  प. पू. श्रीगुळवणी महाराजांचे वास्तव्य बार्शीला होते. श्रीगुरुमहाराजांचे परमभक्त श्री. दादाशास्त्री जोशी सुद्धा बार्शीचे. असा अनेकजणांचा ऋणानुबंध बार्शीशी होता. श्रीमहाराजांच्या येण्याने पुनः एकदा भगवंत संतुष्ट झाला असेल. श्रीदत्तमहाराज आणि सर्व भक्तमंडळीना कृपाशीर्वाद दिले असतील!

सोमवार दि. १६-५-९४ रोजी सकाळी बार्शीहून मराठवाड्याचा यशस्वी दौरा करून पुण्य नगरीस सर्व मंडळी पोहोचली.

प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांना रक्तातिसाराचा त्रास सुरु असताना, देवांनी जाऊ नका म्हणून सांगितले. तरी देखील वाडीकरांचे भजन चालू असताना काहीही तब्येतीला होऊ दे असे निक्षून देवांना सांगितले व श्रीस्वामीमहाराज वाडीला आले, ह्या प्रसंगाची आठवण पू. श्रीमहाराजांच्या या प्रवासातील प्रसंगावरुन आल्याशिवाय राहीली नाही. प्रवासातील दगदग, उन्हाळा, भक्तांची गर्दी, अवेळी भोजन त्या सर्व पार्श्वभूमीवर पू. श्रीमहाराजांची तब्बेत नाजूक झाली होती, यावर विश्वासच बसत नव्हता ही सर्व श्री बालाजीची कृपा आहे.

पुण्याची रौद्रीशांती

पुण्याला प्रथम माघ वद्य षष्ठी १९९४ यादिवशी आश्रमातच महाराजांचा वर्धापनदिन साजरा केला. त्यानिमित्ताने 'बोल अमृताचे' हे श्रीमहाराजांच्या प्रवचनाचे पुस्तक विश्वस्तांच्या मार्फत प्रकाशित करण्यात आले.

रौद्रीशांतीचा सर्व धार्मिक कार्यक्रम देऊळगांवराजाला ठरला असल्याने तो पुन्हा करता येत नाही, परंतु मे महिन्यात तेथील कार्यक्रम झाल्यावर वामननिवासात तीन दिवसाचा समारंभ करण्यात आला. त्यावेळी धार्मिक अनुष्ठाने करण्यात आली. तीन दिवस तुलादान झाले. एक दिवस तीळ तेल, एक दिवस रौप्य नाणी, एक दिवस पेढे असे तीन दिवस तुलादान करण्यात आले. यादिवशी पुष्कळ अन्नदान झाले. पारायण कीर्तन, प्रवचन असे कार्यक्रम झाले. पुण्यातील सोहळा व्यवस्थित नीटनेटका असाच झाला.

पू. श्रीमहाराजांना दीर्घायुरारोग्य लाभावे अशी प्रार्थना करुन व अत्यंत मनोभावे सर्व धार्मिक अनुष्ठाने व सत्कार समारंभ झाला.

ईशशक्तीच सर्व कार्य पार पाडणारी असल्यामुळे ठिकठिकाणचे कार्यक्रम गौरवाने पार पडलेच पण अनुष्ठानादी, यज्ञयागादी कार्यक्रम यथासांग पार पडले हे विशेष कृपेचे भाग्य आहे.

भाव भक्तीचा नजराणा देवगुरुनी स्वीकारला ।

गोड केला यातच प्रत्येकाच्या मनाला आनंद अतीव वाटला ।

श्री ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत सांगितलेला ऐश्वर्ययोग पू. श्रीमहाराजांच्या जीवनात प्रगट झाला. आपण अनुभवला. त्या विश्वात्मक देवाजवळ सर्वांसाठी एकच प्रार्थना आहे की, मनबुद्धीच्या पलीकडे असलेल्या ईश्वरी शक्तीची जाणीव आमच्या मनांत नित्य जपली जाऊ दे. कार्य करवून घेणारा परमेश्वरच आहे हे सर्व संतांनी सांगितलेले सूत्र धरुन जीवन व्यतीत होऊ दे.

क्रमशः –

*****************************************

प. पू. श्रीगुळवणी महाराजांचे आशीर्वाद

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा पठ्यब्दपूर्ती समारंभ, २५ मे १९६९ रोजी,त्यांच्या पू. पिताजींच्या आणि प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या आशीर्वादात संपन्न झाला. त्यावेळी प. पू. श्रीगुरुमहाराजांनी जे आपले आशीर्वादात्मक विचार व्यक्त केले ते मोलाचे तर आहेतच पण पसायदानासारखे परिपूर्ण आहेत. त्यांचे पू. श्रीदत्तमहाराजांच्या गौरव समारंभाच्या शेवटी एक तृप्तीचे, समाधानाचे, आशीषांचे अमृत बोल म्हणून सारांश रुपाने देत आहोत.

"आमचा व कवीश्वर घराण्याचा संबंध फार जुना आहे. सद्गुरु श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामींच्या समग्र वाङ्मयाचे बारा खंडात हजार पृष्ठांचे प्रकाशन केवळ श्रीदत्तमहाराजांच्या मुळे शक्य झाले. एवढे प्रचंड कार्य करूनही त्यांनी सतत स्वतःचा उल्लेख त्यादृष्टीने कोठेही केलेला नाही. आमच्यामुळे (प. पू. गुरुमहाराजांच्यामुळे) ते घडले असेच त्यांना वाटते. श्रींचा शतसावंत्सरीक उत्सव या वाङ्मय प्रकाशनाने साजरा झाला तो श्रीदत्तमहाराजांच्यामुळे. त्यांनीच आमच्या हातून हे कार्य घडविले आहे. या निमित्ताने श्रीदत्तमहाराजांचा सहवास फार जवळून आला. आमचे मनात त्यांचे विषयी आदर नी स्नेह निर्माण झाला. श्रीदत्तमहाराज औरवाडच्या पू. श्री. दीक्षितस्वामींनी स्थापन केलेल्या सद्गुरु पीठ संस्थानचे एक विश्वस्त आहेत. त्यांची तेथील जबाबदारी अगत्यपूर्वक पार पाडण्याची तळमळ व श्रद्धा पाहून आमचे अंतःकरण त्यांनी खेचून घेतले व त्याचेच पर्यवसान म्हणून श्री. वासुदेव निवासाचे, तेथील धार्मिक समारंभाचे, तेथील सत्कार्याचे संचालकत्व ओघानेच श्रीदत्तमहाराजांकडे आलेले आहे. येथे सर्व गोष्टी त्यांच्या इच्छेप्रमाणे घडून आलेल्या आहेत व पुढेही येत राहतील. त्यांचेकडे आलेली ही सेवा श्रीकृपेने पुढेही पार पडेल असा आमचा आत्मविश्वास आहे.

अशा भारतीय ख्यातीचे चतुरस्त्र विद्वान कार्यकुशल कर्णधार आम्हाला लाभले ही खरोखर ईश्वरीकृपाच होय. तेव्हा आपण सर्व त्यांच्या भक्तप्रेमी मंडळींनी हा जो उचित असा षष्ठ्यब्दपूर्ती समारंभ साजरा केला हे पाहून आम्हास समाधान होत आहे. त्यांच्या हातून अशीच देवाधर्माची, शास्त्राची, संतांची उत्तरोत्तर सेवा घडावी यासाठी त्यांना आयुरारोग्य व उत्तम ऐश्वर्य लाभो अशी आमची श्रीचरणी प्रार्थना व आमचेही आशीर्वाद आहेत. आपणाकडूनही त्यांचे अमृतमहोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन शांती, रौद्रीशांती, जन्म शताब्दी महोत्सव घडोत अशी आमची प्रभुचरणी नित्य प्रार्थना आहे."

ही अमृतवाणी प. पू. श्रीदत्तमहाराजांचे प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या अंतरंगातील स्थान दाखवून देतात. तसेच सर्व घडो. हीच प्रार्थना.

राष्ट्रपतींकडून गौरव

पहिला पुरस्कार उत्तम अध्यापक म्हणून राष्ट्रपतींच्या हस्ते १८ डिसेंबर १९६८ साली मिळाला. दुसरा संस्कृत राष्ट्रीय पंडित म्हणून २१ एप्रिल १९७० मधे मिळाला तिसरा सत्कार बालगंधर्व रंग मंदिरात वेदाचार्य घैसास गुरुजी, पू. श्रीदत्तमहाराज व पं. किंजवडेकर शास्त्री यांचा, राष्ट्रपती श्री शंकर दयाळ शर्मा यांचे हस्ते झाला.

श्रावणमास म्हणजे श्रीकृष्ण व ज्ञानदेव यांच्या जन्मोत्सवाचा शुभमास नारळी पौर्णिमेसारख्या शुभ दिवशी हा मणिकांचन योग जुळून आला.

राष्ट्रपतींनी स्वतः उठून हार पू. श्रीदत्तमहाराजांना घालणे सन्मानाचे होते व तसेच ते घडले. यात राष्ट्रपतींच्या मनाचा मोठेपणा दिसून आला.

बालगंधर्व नाट्य मंदिरात पू. श्रीदत्तमहाराजांनी संस्कृत मधून आपले विचार राष्ट्रपतीपर्यंत पोचविले होते. त्यातील आशय असा आहे." श्री सोमनाथ मंदिराची उभारणी पूर्वीचे राष्ट्रपती बाबू राजेंद्र प्रसाद यांचे हस्ते झाली. सोमनाथ ज्या रामरायाचे स्मरण सतत करतात त्या रामजन्मभूमी राम मंदिराची उभारणी सर्वांच्या सलोख्यातून वाद मिटवून आजचे राष्ट्रपती श्रीशंकर दयाळ शर्मा यांनी करावी" असा मनोदय पू. श्रीदत्तमहाराजांनी व्यक्त केला. वेदाचार्यांच्या सत्कारासाठी राष्ट्रपती आले हे इतर सर्व मंत्रीजनांना आदर्श व मार्गदर्शन आहे, असेही श्रीमहाराजांनी आदराने बोलून दाखविले. पू. श्रीमहाराजांनी व्यक्त केलेले विचार आणि दाखविलेला मनापासूनचा आदर महाराजांच्या तपःपुनीत जीवनाला साजेसाच आहे.

क्रमशः –

*******************************************

## ⁎ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग- ३८ ⁎

टिळक महाराष्ट्र संस्कृत विद्यापीठ पुणे

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे शैक्षणिक स्मारक म्हणून ६ मे १९२१ रोजी टिळक म. वि. ची स्थापना करण्यात आली. टिळक विद्यापीठात प. पू. श्रीदत्तमहाराजांनी २२/२३ वर्षे अध्यापक शास्त्री म्हणून काम केले. त्यावेळचे विद्यार्थी पुढे विद्याविभुषित झाले असून त्यांनी मोठा नांवलौकिक संपादन केला. ही सर्व मंडळी पू. श्रीमहाराजांना गुरुजी या नावाने संबोधित असत. श्रीमहाराजांची नम्रता, साधेपणा, अलौकिक बुद्धिमत्ता, याबद्दल अनेकांनी आपले विचार सांगितले आहेत. त्या विचारातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ते म्हणजे महाराजांचे शिष्याविषयीचे प्रेम. हा प्रेमभाव अध्ययनाबरोबर सर्वांना सामर्थ्य देवून गेला.

पू. श्रीमहाराजांच्या विद्यार्थिरत्न भांडारात एकापेक्षा एक सरस रत्ने आहेत. त्यातच डॉ. राजाभाऊ जोशी यांचा समावेश आहे. त्यांचा आणि महाराजांचा अनेक वर्षाचा संबंध होता. पू. श्रीमहाराजांच्या काही विशेष गुणांचे दर्शन त्यांनी आपल्या स्वानुभवातून केले आहे.

चित्तशुद्धी

पू. श्रीदत्तमहाराज चित्तशुद्धीला अतिशय महत्त्व देत. चित्तशुद्धी हा पू. श्रीमहाराजांच्या जीवनातील अविभाज्य घटक होता. पापपुण्याचा विचार श्रीमहाराज याच दृष्टीने करीत. त्यांची व्याख्याच अशी होती. चित्ताची अशुद्धी होईल ते पाप व ज्यामुळे चित्ताची शुद्धी होईल ते पुण्य.

श्री. राजाभाऊ जोशी यांनी आणखी एक उदाहरण दिले. पू. श्रीमहाराजांचा सहवास मिळावा म्हणून दरवर्षी त्यांचे ५०/५१ सालचे विद्यार्थी संमेलन करीत असत. एकदा हे सम्मेलन प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वतींचे जन्मगावी माणगावी घेतले होते. सकाळी श्री. दत्तमहात्म्याचे पारायण होई. दुपारी म्हणजे चार वाजता पू. श्रीमहाराजांचे प्रवचन होई. पू. श्रीमहाराजांचा आवडीचा विषय त्यांनी घेतला होता, तो म्हणजे भागवतातील भीष्मस्तुती. श्री. भीष्माचार्यांना भगवंताचे दर्शन झाले. त्यावेळी भीष्माचार्यांनी जे उद्गार काढले आहेत ते उद्गार. पू. श्रीमहाराजांना फार जिव्हाळ्याचे वाटतात. भीष्मांनी भगवंताला आपली बुद्धि अर्पण केली. ती बुद्धि किती शुद्ध करून अर्पण केली हे फार महत्त्वाचे आहे. त्यांच्या बुद्धीतून रजोगुण व तमोगुण दोन्ही नाहीसे झालेले होते. त्यामुळे कसलीच तृष्णा नव्हती. अत्यंत सात्विक बुद्धि झाली होती. ती त्यांनी देवाला अर्पण केली.

देवाला जे अर्पण करायचे ते शुद्ध हवे, स्वच्छ हवे, उत्तम हवे. अशी शुद्धबुद्धि होणे ही सोपी गोष्ट नाही. पू. श्रीमहाराजांना या शुद्धबुद्धिचे महत्त्व फार वाटत असे. त्याकरीता ते अतिशय सावध राहत. परमार्थात आपण कशाला महत्त्व दिले पाहिजे हे त्यांच्याकडून अनुकरण करण्यासारखे आहे. अशावृत्तीमुळे पू. श्रीमहाराजांना शत्रु नव्हते. असले तरी श्रीमहाराज त्यांना शत्रु मानीत नसत.

त्यांच्याबाबतीत आणखी एक गोष्ट अशी जाणवत असत की, काही वेळेस बोलणे अगदी जरुर असते. बोलले नाहीतर गैरसमज होण्याचा संभव असतो असे आपल्याला वाटत असले तरीही ते पूर्ण मौन स्विकारत. बोलण्यापेक्षा न बोलण्याचा प्रभाव अधिक पडत असत. आपल्याला न समजल्यामुळे ते मौन वाटत असत.

पू. श्रीमहाराजांना लाभलेली शांती ही परमशांती होती. श्री. राजाभाऊ म्हणतात की यावेळी प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांची आठवण होते.बालपणी पू. श्रीमहाराजांना पाहून स्वामीमहाराज म्हणाले होते की "प. पू. श्रीवक्रतुंड महाराज पुन्हा आलेले आहेत." प. पू. श्रीवक्रतुंड महाराजांचा पारमार्थिक अधिकार मोठा होता. ते हजर झाल्याशिवाय स्वामीमहाराज प्रवचनाला सुरवात करीत नसत. असा परमशांतीचा वारसा पू. श्रीमहाराजांना परंपरेने लाभला होता.

हेची थोर भक्ती आवडते देवा। संकल्पावी माया संसाराची ॥धृ॥

ठेविले अनंते तैसेची रहावे। चित्ती असो द्यावे समाधान ॥१॥

वाहिल्या उद्वेग दुःखची केवळ। भोगणे ते फळ संचिताचे ॥२॥

तुका म्हणे घालू तयावरी भार। वाहू हा संसार देवापायी ॥३॥

या अभंगाने श्री राजाभाऊंनी गुरुजींची अंतरस्थिती प्रगट केली आहे.

क्रमशः –

*******************************************

## ⁎ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-३९ ⁎

पं.श्री.गणेशशास्त्री द्रविड हे पंडित राजराजेश्वरशास्त्री द्रवीड यांचे चिरंजीव. न्याय वेदांत व वेद यांचे अध्ययन, काशी येथिल सांगवेद विद्यालयात अध्यापन, सर्व भारतातील विद्वत्सभांमध्ये, पंडित परिषदांमध्ये सहभाग. त्यांनी पू. श्रीदत्तमहाराजांबद्दल पुढील प्रमाणे सांगितले आहे.

दुर्लभ चतिर्विध भद्र श्रीदत्तमहाराज

नम्रत्वेनोन्नन्तः परगुणकथनै: स्वान गुणान ख्यापयन्तः

स्वार्थान् सम्पादयन्तो वितत बहुतरा रम्भैयन्त्यः परार्थे

क्षान्तौवाक्षे परुक्षा क्षरमुख मुखान् दुर्जनान् दुःखयन्तः

सन्त साश्र्वर्यचर्या जगति बहुमतः कस्य नाभ्यर्चनीयाः

सत्पुरुषांना नम्रतेनेच गर्व वाटतो. इतरांच्या गुणांचे वर्णन करताना स्वतःच्या गुणांकडे त्यांचे लक्ष नसते. इतरांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील राहणे हाच त्यांचा स्वार्थ असतो. आपल्या कठोरपणाने व वाचाळपणाने सत्कार्यात विक्षेप आणणाऱ्या दुष्टदुर्जनांना असे सत्पुरुष क्षमाशील राहूनच पश्चातापाचे तीर्थात शुद्ध करतात. पश्चाताप हेच दुःख त्यांना देतात. जगन्मान्य सत्पुरुषांचे असे हे आवरण असते.

वरील श्लोकात केलेल्या वर्णनाप्रमाणे पू श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र अनुभवात आल्याने त्यांच्याविषयी मला अत्यंत आदर आहे.

१९७६ मध्ये गाणगापूरला जात असताना पुण्यात श्री वासुदेव निवासात आमच्या वडिलांनी मुक्काम केला होता. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनाचा लाभ मिळाला. त्यावेळी त्यांची परम विनम्रता पाहून आम्ही देखील चकीत झालो. गाणगापूर यात्राप्रसंगी आमच्या वडिलांचा पं. राजराजेश्वरशास्त्रींचा सत्कार गाणगापूरला झाला होता. वडिलांना या मानपत्राची रचना पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांनी केल्याचे ऐकले होते. वडिलांबरोबर अशावेळी चर्चा होत असे. त्यावेळी श्रीदत्तमहाराजांनी कारणत्व या विषयावर चर्चा केल्याचे स्मरते. उडपीच्या सभेत हा विषय आला होता असे स्मरणपूर्वक सांगितले त्याचे आश्चर्य वाटले. विद्या विनयेन शोभते यांचे मूर्तीमंत उदाहरण श्रीकवीश्वरमहाराज आहेत, असे आमचे वडील नित्य म्हणत असत. गुरुकृपा व ईश्वरकृपा यायोगे कवीश्वरमहाराजांचे जीवन असे विनम्र झाले आहे अशी आमच्या वडिलांची दृढ धारणा होती. वडील सांगत असत की,

यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।

तस्येते कथिता ह्यर्था: प्रकाशन्ते महात्मनः ॥

असे उपनिषदात सांगितले आहे. ज्यांची देवांवर तशीच गुरुंवर दृढ भक्ती असते अशा महात्म्यांना हे उपनिषदांतील गूढार्थ कळतात. गूढार्थ प्रकाश गुरुकृपेनेच होतो. नुसता वाच्यार्थ करून त्याचा फायदा नाही.

प. पू. श्रीकृष्णाश्रम स्वामी महाराज ( श्रीगणपती शास्त्री हेब्बार) हे श्रीकवीश्वर महाराजांविषयी वर्णन करीत असताना सांगत असत की, श्रीकवीश्वर महाराजांत ' यः क्रियावान् स पण्डितः' दिसून येते. त्यांच्याच भीमरथ शांतीच्या वेळी न्याय सिद्धांत लक्षणातील एका परिष्कराचा नीट समन्वय मला करता आला नाही. त्यावेळी माझा निग्रह न करता “जानन्नपि ही मेधावी जडवल्लोक आचरेत्” , ही त्यांनी भूमिका घेतली.

दर्शन शास्त्रात येणाऱ्या 'प्रथमाह्निकम' 'द्वितीयाहिकम' इत्यादी शब्दांचा वास्तविक अर्थ श्री कवीश्वरमहाराजांनी आम्हाला आपल्या प्रश्नात्मक विवेचनात सांगितला आहे की,

दानं प्रियवाक्सहितं, ज्ञानमगर्वं क्षमान्वितं शौर्यम् ।

वित्तं त्यागसमेतं, दुर्लभमेतच्चतुर्भद्रम् ।।

कोणाला दान देताना गोड शब्दात आदरपूर्वक द्यावे. आत्मप्रौढीने तुच्छता दाखवून उपकार करीत असल्यासारखे देऊ नये. ज्ञान असावे पण ज्ञानीपणाचा गर्व नसावा. शौर्याबरोबर क्षमाशीलता ही असावी. संपत्ती मिळवावी पण त्याचा त्याग करण्याची मनाची तयारी हवी, कल्याणकारक चार गोष्टी सहज साध्य नाहीत. प्रयत्न पूर्वक त्या मिळवाव्या लागतात.

वरील श्लोकात वर्णित दुर्लभ चतुर्विध भद्र श्री कविश्वर महाराज यांचे मध्ये पाहण्यास मिळते.

श्रीकवीश्वरमहाराज हे सत्पुरुष होते अशी आमची दृढ निष्ठा आहे. गुजराथ व काशीमध्ये त्यांची तशीच प्रसिद्धी आहे.

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमद्वार्जितमेव वा ।

तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसम्भवम् ।।

या भगवद्गीता वचनाप्रमाणे श्री कवीश्वर महाराजांत ऐश्वर्य दिसत असल्याने ते ईश्वरांश सम्भूत आहेत.अशा दिव्य विभूतीचे सान्निध्य आपणास सर्वदा लाभावे. त्यासाठी भगवान श्रीकाशीविश्वेश्वर आणि जगदंबा अन्नपूर्णा, त्यांना आरोग्य आणि दीर्घायुष्य प्रदान करोत.

मार्गशीर्ष शुक्ल ७, विक्रम संवत २०५१

( पं.गणेशशास्त्री द्रवीड)

क्रमशः –

******************************************

## ⁕ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-४० ⁕

पू.श्रीदत्तमहाराजांची वाङमय संपदा

प.पू.दत्तमहाराजांचे वाङमयीन क्षेत्रातील कार्य म्हणजे महत्त्वपूर्ण ग्रंथांचे त्यांनी केलेले संपादन होय.

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज यांचे वाङमय

प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे समग्र वाङमय स्वामी महाराजांच्या जन्मशताब्दी महोत्सवाचे प्रसंगी १९५४ मध्ये, श्रीवासुदेवानंद सरस्वती ग्रंथ प्रकाशन मंडळ, पुणे यांनी बाराखंडात प्रसिद्ध केले. स्वामीमहाराजांचे बरेच वाङमय संस्कृतमध्ये आहे. ते प्रकाशित करावयाचे होते. 'चांगल्या संस्कृत पंडिताने आत्मीयतेने लक्ष घालून करण्याचे ते काम आहे,' असे प. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे मत होते.

पू. श्रीदत्त महाराजांनी संप्रदायपूर्वक संस्कृत अध्ययनाने व स्वतःच्या चिंतन मननाने प्राप्त करून घेतलेली सम्यकदृष्टि आणि सत्पुरुषांच्या कृपाप्रसादाने व स्वतःच्या उपासनेने साधलेली आध्यात्मिक प्रगती पाहून, श्री गुळवणी महाराजांनी श्रीमहाराजांवर हे काम सोपविले.

श्रीमहाराजांनी अमरापूर, माणगाव अशा गावोगावी हिंडून ठिकठिकाणाहून हस्तलिखिते गोळा केली. अव्याहत चार पाच वर्षे निरलसपणे दररोज दहा बारा तास परिश्रम करून ग्रंथ सिद्ध केले, ते बारा खंड असे-

१. शिक्षात्रयम् - कुमारशिक्षा, युवाशिक्षा, वृद्धशिक्षा.

२ स्तोत्रादिसंग्रह

३सप्तशतीगुरुचरित्रसार, दत्तलीलामृताब्धिसार, माघमाहात्म्य, स्त्री शिक्षा, वासुदेवमननसार इ. ग्रंथ मराठीत आहेत.

४ दत्तमाहात्म्य- मराठी ग्रंथ

५ श्रीगुरुचरित्रकाव्य (सटीक), श्रीदत्तचम्पू (सटीक)

६-७ श्रीदत्तपुराणम्

८-९ श्रीगुरुचरितम्- द्विसाहस्त्री

१० -११ श्रीगुरुसंहिता - समश्लोकी गुरुचरित्र

१२ पंचपाक्षिक स्तोत्र, वेदनिवेदस्तोत्र, श्रीकृष्णलहरी इ.

( सन १९५४ साली प्रकाशित झालेले वाङ्मयीन १२ खंड जसे आहेत तसे, श्रीवासुदेव निवासने पुर्नप्रकाशित केले असून माफक देणगी मूल्यामध्ये उपलब्ध आहेत.)

श्रीसरस्वती गंगाधर लिखित श्रीगुरुचरित्र हा ग्रंथ दत्तसंप्रदायाचा 'वेद' समजला जातो. तो मराठीत आहे. इतर भाषिकांनाही त्याची माहिती व्हावी या हेतूने प.प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामींनी त्याचे संस्कृत भाषांतर केले. दत्तात्रेय संप्रदायाचे तत्त्वज्ञान, उपासना यांची माहिती देणारे इतरही ग्रंथ लिहीले. या वाङमयाचे स्वरूप श्रीमहाराजांनी एके ठिकाणी थोडक्यात सांगितले आहे, 'जगत्कार्य संचालक अशा परमेश्वराचे शुद्ध व शबल स्वरूप, त्याबद्दलची प्रमाणे, इतर प्रमाणांशी अविरोध, त्यांच्या ज्ञानाची साधने, त्याचे गौण व मुख्य फल इत्यादि मनुष्य जन्मातच जाणून घेण्याचे विषय स्पष्ट करून सांगणारे हे वाङ्मय आहे. अवतारी पुरुषांच्या अशा प्रकारच्या लेखनाचे संपादन अत्यंत काळजीपूर्वक करावे लागते.

'श्रीदत्तमाहात्म्य' या ग्रंथाच्या चवथ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत श्रीमहाराज लिहीतात, " हा ग्रंथ सामान्य पुस्तकाप्रमाणे केवळ बुद्धीचा विषय नाही. हा मंत्रग्रंथ आहे. श्रीस्वामीमहाराजांनी स्वहस्ते लिहीलेल्या प्रत्येक अक्षरास विशेष महत्त्व आहे. तेव्हा शास्त्रशुद्ध पाठांचा विचार करीत असता काय प्रकारची अडचण आली असेल हे वाचकांच्या ध्यानात आले असेल. हंसक्षीरन्यायाने, ग्राह्याग्राह्य निर्णय करावा म्हटले तरी ही गोष्ट परमहंस पदास पोहोचलेल्या श्रीस्वामीमहाराजांच्या बाबतीत सामान्य माणसास न करता येण्यासारखी आहे. तरीही दोष दूर करण्याचा यथामति यत्न केला आहे. काही शंका श्री गुळवणी महाराज यांना विचारून खुलासा करून घेतला आहे."

स्वतः पूर्ण ज्ञानी व अधिकारी असूनही एवढी विनम्रता व त्याचबरोबर सावधानता असणे हे श्रीमहाराजांच्या गुरुंवरील श्रद्धेचे व स्वकर्मावरील निष्ठेचे द्योतक आहे. या अलौकिक कार्यासाठी त्यांनी इतरांचे साहाय्यही घेतले. संस्कृत ग्रंथांचे मराठी भाषांतर करण्याचे व वेगवेगळ्या ग्रंथांना प्रस्तावना लिहीण्याचे काम विविध शास्त्री पंडितांशी संपर्क साधून करून घेतले. पं आत्मारामशास्त्री जेरे (अगळनेर), पं. धुंडिराजशास्त्री माहूरकर, पं. हरिरामशास्त्री शुक्ल, (वाराणसी), पं. भालचंद्रशास्त्री उप्पिनबेट्टिगिरी (धारवाड), पं. विनायकशास्त्री टिल्लू, (इंदूर), पं. हणमंतराव भिडे (अहमदाबाद) इत्यादी प्रांतोप्रांतीच्या पंडितश्रेष्ठांनी ह्या कामी मदत केली आहे यावरून श्रीमहाराजांचे अजातशत्रुत्व व सौजन्यच लक्षात येते.

क्रमशः –

*******************************************

प. पू. श्रीदत्तमहाराजांची वाङ्मय संपदा

श्रीसायणमाधव-विरचित सर्वदर्शनसंग्रह, (मराठी अनुवाद व विवरणासह)

प्राचीन भारतातील सर्व दर्शनांची म्हणजे तत्त्वज्ञान प्रणालींची एकत्रितपणे माहिती करुन देणारा हा ग्रंथ पंधराव्या शतकात सायणमाधव यांनी रचला. यावर महामहोपाध्याय श्री वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनी दर्शनाङ्कुर नावांची संस्कृत टीका लिहून तो सन १९२४ मध्ये प्रथम प्रकाशित केला. भारतीय तत्त्वज्ञानाची चार्वाक, बौद्ध, जैन ही तीन नास्तिकदर्शने आणि सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा, वेदान्त अशी सहा प्रमुख आस्तिकदर्शने या शिवाय पाणिनिदर्शन, प्रत्यभिज्ञादर्शन, रसेश्वर दर्शन इत्यादि दर्शने या सर्वांची ओळख करून देणारा सर्वदर्शन संग्रह हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. श्री. र. प. कंगले यांनी मराठी भाषांतर व विवेचन यासह संपादित केलेला हा ग्रंथ सन १९८५ मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रकाशित केला आहे. परंतु शास्त्राच्या परिपूर्ण ज्ञानामुळे योग्य व नेमके भाषांतर निःसंदिग्ध व मूलगामी विवरण आणि अत्यंत सुगम व सुंदर शैली यामुळे पू. श्रीदत्तमहाराजांचे लेखन वैशिष्ट्यपूर्ण व वेगळे आहे. सर्व दर्शनांचे सखोल ज्ञान असल्याशिवाय हे कार्य करता येणे शक्य नाही.

श्री निम्बार्काचार्य विरचित वेदान्तपारिजातसौरभ (मराठी अनुवाद व विवरण यांसह)

हा ग्रंथ जून १९६५ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने पुणे येथे प्रसिद्ध केला आहे. महामहोपाध्याय श्रीवासुदेवशास्त्री अभ्यंकर यांनी ब्रह्मसूत्रावरील शंकराचार्यांच्या भाष्याचे मराठीत भाषांतर केले. ते सन १९११ मध्ये प्रथम प्रसिद्ध झाले. वेदान्तातील मराठीत अनुवादित केलेला भाष्यग्रंथ म्हणजे श्रीमहाराजांचा प्रस्तुत ग्रंथ होय. वेदान्तपारिजातसौरभ, म्हणजे निम्बार्काचार्यांनी ब्राह्मसूत्रावर लिहीलेले भाष्य होय. या ग्रंथाच्या सुरुवातीला श्रीमहाराजांनी लिहीलेली जवळ जवळ सव्वाशे पानांची विस्तृत भूमिका म्हणजे एक श्रेष्ठ संशोधन प्रबंधच आहे. यात 'दर्शन' 'शास्त्र' या शब्दाच्या अर्थापासून सुरुवात करुन सर्व प्रमुख दर्शनांची सविस्तर माहिती दिली आहे. त्याच बरोबर इतर विषयांचीही चर्चा केली आहे.

गुरुदेवचरित्र

भारदस्त शैलीत् पांडित्यपूर्ण विवेचन हा पू.श्रीदत्तमहाराजांच्या लेखनशैलीचा एक गुण आहे. परंतु त्यांच्या लेखनाचे वेगळेपण असे आहे की साधकांना उपयुक्त होतील अशा सूचनाही त्यांनी वेळोवेळी इथे दिल्या आहेत. श्रीनिम्बार्काचार्यांचा भक्तीमार्ग स्पष्ट करुन सांगताना श्रीमहाराजांनी प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज यांच्या जीवनातील व वाङ्मयातील उदाहरणे दिली आहेत. या ठिकाणी श्रीमहाराजांचे लेखन अगदी भावुकतेने केलेले दिसते.

श्रीमहाराजांनी लिहीलेले प.प.श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज यांचे हे समग्र व सविस्तर चरित्र श्रीवासुदेव निवास तर्फे सन १९९१ मध्ये पुणे येथे प्रसिद्ध झाले. स्वामीमहाराज ज्ञानी असून 'लोकसंग्रहमेवापि संपश्यन् कर्तुमर्हसि' या श्रीमद्भगवद्गीतेतील उपदेशानुसार वागणारे कर्मयोगीही होते.

स्वामीमहाराजांचे समग्र वाङमय संपादित केल्यानंतर हे चरित्र लिहून श्रीमहाराजांनी स्वामीमहाराजांचे अलौकिक व्यक्तिमत्त्व साधकांच्या मनावर ठसविले आहे.

गुणगाईन आवडी, बोल अमृताचे, आनंदलहरी १,२

श्रीमहाराजांचे चिंतनपर विचार व त्यांनी वेळोवेळी वेगवेगळ्या विषयांवर केलेली प्रवचने डॉ. सौ. माधुरी पणशीकर यांनी श्री. गोपाळ गोडसे व इतरांच्या सहाय्याने ग्रंथबद्ध केली आहेत. ही प्रवचने मुख्यतः गुरुचरित्रावर आहेत. श्रीमहाराज सांगतात,"हे भगवंताचेच चरित्र आहे. मत्स्य, कूर्म इत्यादि अवतार दुर्जनांना शासन करण्यासाठी झाले. दत्तात्रेय अवतार गुरुस्वरूपी अवतार आहे. यात अज्ञानी लोकांना योग्यता पाहून मार्गदर्शन करायचे आहे." गुरुचरित्रात सकाम भक्तीच्याच कथा आहेत. याचे स्पष्टीकरण श्रीमहाराज सांगतात, "मोक्षाची इच्छा असणारे जीव कमी आहेत --सगुण भक्ति हे मिष आहे. काही मागण्याच्या मिषाने देवाकडे जातो आहे ना, जाऊ दे, हळू हळू त्याची सकामबुद्धी कमी होईल." यासाठी गुरुचरित्र आहे.

'नाना सिद्विद्येचे गुण। याहिवरी कृपाळूपणा ।हे समर्थांनी सांगितलेले सद्गुरुंचे लक्षण श्रीमहाराजांच्या ठायी होते हे या ग्रंथाबद्दल प्रवचनातून ठळकपणे लक्षात येते.

क्रमशः –

*****************************************

## ⁎ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-४२ ⁎

प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाचे संपूर्ण दर्शन आपल्याला आकलन होईलच असे नाही. त्यांच्या जीवनाला अनेक पैलु होते ते विश्वव्यापी होते. आपल्याला जे दर्शन हवे आहे ते त्यांच्या विशाल व शुद्ध अंतःकरणाचे. आपण त्यांच्या जीवनांतील वेगवेगळ्या प्रसंगातून वेगवेगळ्या व्यक्तींकडून ते आकलन करुन घेण्याचा प्रयत्न केला. पण आपल्यासारखे सामान्यलोक त्यांचेकडे लौकिक व पारमार्थिक मार्गदर्शनासाठी जात त्यावेळीही प. पू. श्रीदत्तमहाराज प्रत्येक व्यक्तिची सात्विकता वाढावी, प्रत्येकाच्या आवाक्याप्रमाणे प्रभूसेवा हातून घडावी, असा प्रयत्न करीत असत.

अशा अनेकविध शिष्यांचे ते कल्याण करतात. त्यांना ईश्वर सन्निध नेतात. व्यक्ती तितक्या प्रकृती याप्रमाणे प्रत्येकाचे पूर्वसुकृत जाणून त्याला मार्गस्थ करतात. त्याचा तोल संभाळत, जीवनात उभा करतात. सामान्य माणसाला या आधाराची फार गरज असते. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या याकार्याची आपल्याला कल्पना कशी

येणार? ज्याला जे झेपेल तसेच ते सांगत असतात. याची वाच्यता नसते. कधी साध्या अभंगातूनही वात्सल्यभावाने उपदेश करीत असतात.

सुखाची आवडी घे कारे गोविंदी । चित्त हे आनंदी ठेवूनिया ||

मनाची मोहर लावा की रे कामी । मनोरथ कामी गुंतू नका ॥

अकळित काळ जव आहे दुरी । तव तू श्रीहरी चित्तवेगी ।

श्रीज्ञानेश्वरांचा हा अभंग हे त्याचे उदाहरण आहे. नामस्मरण करुन मन आनंदित करा. स्तोत्रपाठ, पारायणे, देवदर्शन अशा वेगवेगळ्या पद्धतीने ते आपले जीवन निर्भर करतात. आपल्याला भक्तांच्या अनुभवावरुन हे दर्शन होईल त्याकरिता अशा निष्ठावान साधकांना जे भावले, अनुभवले ते त्या साधकांनी आपल्या सर्वांकरता खुले केले.

बार्शीचे श्री. दादाशास्त्री जोशी

पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनाशी परंपरेने संबंध आलेले असे काही लोक होते. त्यापैकी बार्शीचे पं. दादाशास्त्री जोशी हे एक होते. पं. दादाशास्त्रींच्या वडिलांपासून हा संबंध आलेला आहे. पं. दादाशास्त्रींचे वडील पू. प्रल्हादशास्त्री उत्तम वैय्याकरणी होते. व्याकरणाचा फार मोठा व्यासंग होता. प. पू. योगीराज श्रीगुळवणीमहाराजांचा त्यांच्यावर फार लोभ होता. श्रीदादाशास्त्रींच्या मातोश्रींना प. पू. श्रीगुळवणीमहाराजांनी पहिली शक्तिपात दिक्षा दिली. हे एक शक्तिपात दीक्षेचा आरंभ, म्हणून महत्त्वाचे आहे.

पू. श्रीदत्तमहाराज व दादाशास्त्री समवयस्क. बार्शीतील घरी पू. श्रीदत्तमहाराज असतांना श्रीदादां वडिलांकडे नेहमी सकाळी व्याकरणावरील चर्चेसाठी येत असत. कायम उभे असत. पू. श्रीदत्तमहाराजांचे विनम्रभाव असे अंगी मुरलेले आहेत. सहज स्वभाव झाले आहेत.

पं. दादाशास्त्रींबरोबर अनेक ग्रंथांचे वाचन होई. सिद्धांतलेश संग्रहावर पू. श्रीदत्तमहाराज सांगत होते. त्यावेळी पू. श्रीदत्तमहाराजांच्या तोंडून सहजच उद्गार आले की ,धारवाडला शिक्षण पूर्ण झाल्यावर ग्रंथाची गाठ बांधली ती आता सोडली. इतके तयारीचे अध्ययन पू. श्रीदत्तमहाराजांचे होते. सायंकाळी भगवंत मंदिरात महाभारतावर बोलत. सकाळी पंचदशीवर लोकांसाठी सांगत असत.

पं. दादाशास्त्रीही उत्तम भागवत सप्ताह करीत. गाणगापूरला श्री. साबळेशेठजींच्या मठात पू. श्रीदत्तमहाराज व पं. दादाशास्त्री असा जोड सप्ताह झाला होता. पं. दादाशास्त्रींना पू. श्रीदत्तमहाराजांनी आर्वजून संहिता वाचनासाठी बोलावले होते. पं. दादाशास्त्रींनी ते मान्यही केले होते. भागवत सप्ताहाला सुरवात करण्यापूर्वी त्यांचा घसा एकाएकी बसला. पं. दादाशास्त्रींना फार वाईट वाटले. त्यांची निष्ठा बळकट होती. ते तसेच गाणगापूरला गेले. श्रीदत्तमहाराजांना सर्व हकीगत सांगितली. औषधे घेतली परंतु आवाज सुधारेना.

परमेश्वरावर सर्व सोपवून संहिता वाचनाला सुरवात करावी, असे श्रीमहाराजांनी सांगितले. वाचू लागले की आवाज सुधारत जाई व हरयेनमः म्हटले की पुन्हा आवाज अगदी बसून जाई. असे सात दिवस झाले. परंतु भगवंतावरील श्रद्धा इतकी मोठी होती की, या महत्त्वाच्या अडथळ्याचा त्यांनी बाऊ केला नाही. बळकट श्रद्धेने त्यातून पार पडले. हे निश्चितपणे अनुकरणीय आहे.

पं. दादाशास्त्रींचे चिरंजीव श्री. शरदराव, एम्. ए. संस्कृत घेऊन झाले. याचा फार आनंद पू. श्रीमहाराजांना झाला. त्यांना एम. ए. च्या परिक्षेला सांख्यकारिका होती. श्री. शरदरावांना ती नीट समजली नव्हती. ही अडचण पू. श्रीमहाराजांना कळविताच त्यांनी उलट टपाली कळविले की, श्रीभागवत सप्ताहासाठी आम्ही बार्शीला येत आहोत, तेव्हा सात दिवसात रोज १० कारिका याप्रमाणे सर्व कारिका होऊन जातील. एकूण कारिका ७२ आहेत. त्याप्रमाणे पू. श्रीमहाराजांनी त्या सर्व ७२ कारिका श्री. शरदरावांना समजावून दिल्या. त्या विषयात श्री. शरदरावांना उत्तम गुण मिळाले. पुढे त्यांनी पीएचडी व्हावे असे पू. श्रीदत्तमहाराजांच्या मनात खूप होते. पदवीपेक्षाही दोनतीन वर्षे त्या विषयाचा अभ्यास होईल, वाचन, मनन, होईल असे पू. श्रीमहाराजांना वाटत होते. नोकरी न करता प्रवचनाद्वारे लोकांना मार्गदर्शन करावे असेही त्यांना वाटत होते.

"पं. दादाशास्त्रींच्या कडून आपणास उत्तम मार्गदर्शन होईल. त्यांनी कोणत्याही विद्यापीठाची पदवी घेतलेली नाही, तरीही त्यांच्या ज्ञानाला तोड नाही. त्यांच्या याज्ञिकीचा अभ्यासही उत्तम आहे, हे सर्व तुम्हाला वडिलांकडून मिळणारे अमोल धन आहे.'' असे श्रीमहाराज श्री. शरदराव यांना सांगत असत.

पंडित दादाशास्त्रींच्या वडिलांपासून ते त्यांचे चिरंजीव श्री. शरदरावांपर्यंत प. पू. श्रीगुळवणीमहाराज व पू. श्रीदत्तमहाराज असा परंपरेने आलेला हा प्रवाह आहे. सतत संतसहवासाचा लाभ घेणे,चालू राहणे ही दुर्मिळ गोष्ट आहे. संतांचा सहवास हा तीर्थापेक्षाही श्रेष्ठ मानला आहे. म्हणून अशा पं श्री दादा शास्त्री यांच्या घराण्याला शतशः वंदन.

(पं श्री दादाशास्त्री जोशी यांचे सुपुत्र श्री शरदराव म्हणजे, वासुदेव निवासचे विद्यमान प्रमुख विश्वस्त, भागवताचार्य योगश्री श्री श.ज.जोशी महाराज हे होय)

क्रमशः –

*******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-४३ *

श्री दत्त अमरेश्वर

नरसोबावाडीत मनोहर पादुकांचे दर्शन हजारो भक्तमंडळी घेत असतात. कृष्णामाईच्या ऐलतीरावर हे स्थान तर पैलतीरावर श्री अमरेश्वरांचे स्थान प्राचीन आहे. या ठिकाणी श्री नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज भिक्षेला

जात असत. त्याला औरवाड म्हणतात. याचे जुने नाव अमरापूर असे आहे. या स्थानाबाबत श्रीगुरूचरित्राच्या आठव्या अध्यायात उल्लेख आहे.

या अमरापुरात विश्वेश्वरांचा कायमच वास असतो. या ठिकाणी चौसष्ठ योगिनी रहातात. काशीक्षेत्रासारखे या ठिकाणचे महत्त्व आहे. कृष्णा पंचगंगा संगमात स्नान केल्याने प्रयागामध्ये स्नान केल्याचे पुण्य प्राप्त होते.

या ठिकाणीच प.प. श्रीमद्‌वासुदेवांनद सरस्वती स्वामीमहाराज येऊन राहिले. त्यांचे शिष्य श्रीमत् दीक्षित स्वामी महाराज येऊन राहिले. प. पू. श्रीदीक्षीत स्वामीमहाराजांनी चौसष्ट योगिनींची मूर्त स्वरूपात स्थापना केली. श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांचे गुरुपीठ स्थापन केले. या अमरेश्वरात श्रीदत्तात्रेय भगवंताची क्षुधा घेवडयाच्या शेंगांनी तृप्त झाली. त्या अमरेश्वरी आपली भक्तीची भूक नाही का पुरी होणार?

श्रीगुरुनृसिंहसरस्वती स्वामीमहाराज कृष्णातिरी असलेल्या औदुंबराखाली अनुष्ठानात बसले असताना मध्यान्हकाळी चौसष्ट योगिनी श्रीगुरुंना भिक्षेस अमरेश्वरी न्यायला येत असत. त्यांच्या आमंत्रणावरून श्रीगुरु भिक्षेसाठी अमरेश्वरी जात.श्रीगुरु पुढे गाणगापूरला जायला निघाले. चौसष्ठ योगिनी भेटण्यासाठी आल्या आणि नमन करून म्हणाल्या "आपण निघालात? पुढे आमची वाट काय?" श्रीगुरु म्हणाले या ठिकाणी औदुंबर आहे त्या ठिकाणी माझा नित्यवास आहे. या औदुंबर वृक्षाखाली मी पादुका ठेवीत आहे. या पादुकांची पुजाअर्चा जे करतील त्यांना तुम्ही सहाय्य करावे. ही सेवा तुमची श्रीगुरुचरणी रुजू होईल. दर्शन घडेल त्यावेळेपासून सर्व योगिनी अमरेश्वरी राहिल्या. असे अमरेश्वराचे वेगळे महत्व आहे.

या दत्तअमरेश्वराचे व चौसष्ट योगिनींचे महात्म्य फार मोठे आहे. त्या चौसष्ट योगिनींची आठवण, स्मरण म्हणून आठ योगिनींची स्थापना अमरेश्वर मंदिरात प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराजांनी केली आहे. असे हे प्रासादिक व जुने देवस्थान ह्याचा जिर्णोद्‌धार व्हावा अशी परमपूज्य श्रीदत्तमहाराजांच्या मनात बरेच दिवस इच्छा उत्पन्न झाली.

सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ।।१।।

येथें अलंकार शोभती सकळ। भावबळे फळ इच्छेचे ते।।२।।

अंतरीचे बीज जाणे कळवळा। व्यापक सकळा ब्रह्मांडाचा।।३।।

तुका म्हणे नाही चालत तातडी। प्राप्त काळ घडी आल्यावीण।।४।।

परमपूज्य श्रीगुळवणी महाराजांनी नरसोबाची वाडी येथील सभामंडप उभारण्याचे काम केले. कोणतेही अशा तऱ्हेचे काम होण्यासाठी सत्पुरुषांचा सत्यसंकल्प असावा लागतो. अमरेश्वराच्या जीर्णोद्‌धारामागे पू. श्रीदत्तमहाराजांचा सत्यसंकल्प आहे तो पुरा झाला आहे. हे काम गुरुपरंपरेचे आहे.

श्री गुरुद्वादशीच्या उत्सवात  पू. श्रीदत्तमहाराज या अमरेश्वराच्या वास्तूत तीन रात्र राहिले. या अमरेश्वराच्या मंदिरात श्रीदीक्षितस्वामींच्या सांगण्यावरून वयाच्या १६ व्या वर्षापासून ४० वर्ष भागवत सप्ताह पू. श्रीदत्तमहाराजांनी केला. या मंदिराचा संपूर्ण कायापालट झाला. तेच मंदिर चांगले बांधल्यामुळे चौसष्ट योगिनी पुन्हा आनंदित झाल्या असतील. त्यांनी महाराजांशी हितगूज केले असेल. श्रीदीक्षित स्वामीमहाराजांना आनंद झाला असेल ह्यात शंका नाही. लोकांना या वास्तूत रहाता येईल. साधन, नामस्मरण, पठण ह्या गोष्टी करता येतील. पूर्व, पश्चिम दोन्हीकडे आरतीचे, महापूजेचे निनाद पुन्हा नव्या जोमाने उमटू लागतील ह्याचा आनंद गुरुपीठाला होणे स्वाभाविक आहे.

प. प. श्रीवासुदेवानंदपीठ ज्या प.पू.श्रीदीक्षित स्वामीमहाराजांनी स्थापन केले, त्यामध्ये आपण स्वतः तेथे राहिले. असा हा सारा पवित्र परिसर ! श्रीगुरुंचे स्थान देखणेपणे उभे राहिले हे ही पू. श्रीदत्तमहाराजांच्या जीवनातील एक अतिशय भव्य दिव्य गुरुभक्तीने भारलेले असे काम आहे.

क्रमशः –

*******************************************

## ⁎ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-४४ ⁎

🌹 तो पूर्ण आनंद गुरू समर्थ🌹

चराचरी व्यापकता जयाची। अखंडभेटी मजला तयाची।

परंपदी संगम पूर्ण झाला। विसरू कसा मी गुरुपादुकाला॥

प. प. दीक्षितस्वामी महाराजांनी अमरेश्वर येथे प. प. वासुदेवानंदपीठ या नावाचे आपल्या गुरुंचे स्थान निर्माण केले आहे तर पुण्याला पू. श्रीगुळवणीमहाराजांनी वासुदेव निवास स्थापन केला आहे. प. प. श्रीदीक्षितस्वामी महाराज व प. पू. श्रीगुळवणी महाराज, प. प. श्रीवासुदेवानंदाचे निस्सिम भक्त.

प. पू. श्रीगुरूमहाराजांच्या अंतरीची तळमळ स्वामींनी जाणली व श्रीगुरुमहाराजांचा आनंद द्विगुणित करावा अशी इच्छा केली.

अमरेश्वर येथे प.प. श्रीदीक्षितस्वामी महाराजांनी प. प. श्रीवासुदेवानंदस्वामी महाराजांच्या पादुका ठेवल्या आहेत. त्यांची पूजा रोज एक भक्त येऊन करीत होता.

एक दिवस विलक्षणच घडले. अमरेश्वरी पूजा करणाऱ्या भक्ताला, आपण पादुका घेऊन जावे, अशी इच्छा झाली. ती का व्हावी हे एक देवच जाणे! पूजा करून पादुका पिशवीत घालून तो पुजारी निघून गेला. ज्यावेळी पादुका व सेवेकरी नाहीत हे लक्षात आले, तेव्हा संस्थानचे विश्वस्तांनी ताबडतोब सर्वत्र तपास सुरू केला. प. पू. श्रीगुळवणीमहाराजांना देखील पुण्याला कळविले. हे वृत्त आश्रमात कळल्यावर पू. श्रीदत्तमहाराजांसकट सर्वांना

हुरहुर लागली. त्याच रात्री पू. श्रीदत्तमहाराजांना स्वप्न पडले की, अमरेश्वर येथील पादुका घेऊन सेवेकरी आश्रमात येऊन एका कोपऱ्यात बसला आहे.

पू. श्रीदत्तमहाराज आन्हिक आटपून सकाळी लौकरच आश्रमात आले. तो कोपऱ्यात एक मनुष्य गाठोड्यासह बसलेला दिसला.

स्वप्नाची प्रचीति आली. 'गाठोड्यात असलेल्या पादुकांचे दर्शन आम्हाला द्या,' असे पू. श्रीदत्तमहाराजांनी म्हणताक्षणीच तो मनुष्य गडबडला. 'घाबरू नका, आम्ही आपणास काही करणार नाही',असे म्हटल्यावर त्याने पादुका दाखविल्या. पू. श्रीदत्तमहाराजांनी नमस्कार केला व 'पादुकांना वर घेऊन पू. श्रीगुरुमहाराज बसले आहेत त्या खोलीत चला',असे त्याला सांगितले.

आतल्या खोलीत श्रीगुरुमहाराज बसले होते. हरवलेल्या पादुका आश्रमात नेमक्या आल्या हे कळल्यावर श्रीगुरूमहाराज अतिशय आनंदित झाले. अष्टसात्विक भाव उफाळून आले. भक्ताला भेटण्यासाठी स्वामीमहाराज आश्रमात आले. अंतरीचे मनोगत श्रीगुरुमहाराजांनी त्यावेळी प्रगट केले. "आम्हाला फार वाटत होते की अमरेश्वरहून या पादुका मस्तकी धारण करून आणाव्यात व पोचवाव्यात. परंतु येथे पादुकांचे वास्तव्य एकदां व्हावे तो हेतु गुरूमाऊलींनी ओळखून या चोरीचे निमित्त करून आमची हौस पुरी केली. त्यांचाच हा निवास आहे तो धन्य झाला. या पादुका आता चातुर्मास ठेवून घेऊ नंतर आम्ही त्या स्वतः आणून अमरेश्वरला पोचवू."

अमरेश्वर विश्वस्त कसे नाही म्हणणार? गुरुभक्तांची तीव्र इच्छा कोण नाकारणार? तो सेवेकरी खजील होऊन परत चालला होता. त्याला तसे सोडले नाही. 'प्रसाद घ्या व नंतर जा पण पुन्हा असे करू नका' असे सांगितले.

आश्रमाच्या देवघरात वेगळे आसन तयार करून पादुका आसनस्थ झाल्या. रोज यथासांग पूजा घडू लागली. पहाटे ५॥/६ वाजता काकडा सुरू झाला. प. पू. श्रीगुरुमहाराज त्यावेळी पहाटे काकड्यासाठी खाली येत असत. प. पू. श्रीगुरुमहाराजांना इतका आनंद झाला होता की त्यांनी पं. आत्मारामशास्त्रींना बोलवून घेतले. वाडीसारखी काकड आरती करण्याची विनंती केली.

'"तो पूर्ण आनंद गुरूसमर्थ' ' प. प. श्रीस्वामीमहाराजांनी केलेल्या वर्णनाप्रमाणे श्रीगुरुंनी आनंदी आनंद केला यात शंकाच नाही. प. पू. श्रीगुरुमहाराजांनी चार महिन्यानंतर स्पेशल गाड़ी करून आपण स्वतः जाऊन पादुका अमरेश्वर मंदिरात पोचवून शिवाय संस्थेला देणगी दिली.

पू. श्रीदत्तमहाराजांना पडलेल्या स्वप्नाप्रमाणे पादुका आश्रमात हजर व्हाव्यात व श्रीगुरूमहाराजांची इच्छा पूर्ण व्हावी, यांत ईश्वरी संकेत दिसतो. पुन्हा एकदा पू. श्रीदत्तमहाराज व प. पू. श्रीगुळवणीमहाराज यांचे नाते कसे अतूट होते याची प्रचीती आली.

याच अमरेश्वराचा जीर्णोद्धार प. पू. श्रीदत्तमहाराजांनी केला आहे. श्रीवासुदेवानंदपीठ व श्रीवासुदेव निवास दोन्ही स्थाने सुंदर पवित्र ठेवण्याची धुरा ईशगुरुकृपेने त्यांनी सांभाळली होती.

चराचरी व्यापकता जयाची । अखंड भेटी मजला तयाची

परंपदी संगम पूर्ण झाला । विसरू कसा मी गुरुपादुकाला ।

या श्लोकाप्रमाणे गुरुपदी आपण सर्वही एकरूप होऊया.

क्रमशः -

**************************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-४५ *

प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराज स्मारकातर्फे तुळजाभवानी आरोग्यधाम

श्री वामननिवासात श्रीगुरुमहाराजांचा जन्मशताब्दी उत्सव उत्तम तऱ्हेने पार पडला. दरवर्षी प. पू. श्रीगुळवणीमहाराजांची पुण्यतिथी या वास्तूतच साजरी होत असते. त्यानंतरचा मोठा कार्यक्रम म्हणजे पू. श्रीदत्तमहाराजांचा सहस्रदर्शन शांती सोहळा. हा कार्यक्रम पार पडल्यावर श्री वामन निवासाचे संपूर्ण स्वरुप आणखीनच बदलले.

यज्ञादिक कार्यक्रम, वेद पठण, नामजप या गोष्टींमुळे वामननिवास शुद्ध पवित्र झाला. पू. श्रीदत्तमहाराजांच्या मनात या ठिकाणी एक आवश्यक असे सेवाकार्य सुरु करावयाचे होते. म्हणून या ठिकाणी मूर्तीची स्थापना केली नाही. एकतर मूर्ती म्हटले की पूजाअर्चा व्यवस्थित करणे आवश्यक. तेव्हा हे देवकार्य वेगळ्या प्रकारांनी व्हावे अशी त्यांची इच्छा होती.

आपल्याला मिळणारा मानवदेह हा वारंवार मिळणारी गोष्ट नाही. सत्चिदानंद स्वरुप प्रत्यक्ष अनुभवण्याचे सामर्थ्य या मानवी देहात आहे. श्रीसमर्थ रामदास म्हणतात,

धन्य धन्य हा नरदेहो। येथील अपूर्वता पाहो । जो जो किजे परमार्थ लाहो। तो तो पावे सिद्धिते ॥

या नरदेहाचे आरोग्य सांभाळले पाहिजे. पू. श्रीदत्तमहाराजांचे म्हणणे असे होते की, आपल्याकडील माताभगिनी फार सोशिक असतात. त्या स्वतःच्या प्रकृतीची पुष्कळ हेळसांड करतात. तेव्हा त्यांना थोड्या मूल्यात औषधोपचाराची व्यवस्था उपलब्ध व्हावी. सर्वच भगिनी नोकरी करीत नाहीत. असलेल्यांनाही मिळालेला पैसा आपल्या प्रकृतिकरिता खर्च व्हावा असे वाटत नाही. तेव्हा त्या जे कष्ट सोसत असतात त्याकरिता त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेतली जावी म्हणून श्री तुळजाभवानी आरोग्यधाम काढून हे सेवाकार्य येथे घडावे. अशी श्रीगुरुमहाराजांची पू.श्रीदत्तमहाराजांना प्रेरणा झाली होती. शिवाय प्रत्येक गोष्टीला भगवंताचे अधिष्ठान लागते.

वामननिवास ही वास्तू अतिशय पवित्र आहे. त्या अधिष्ठानात आरोग्यधाम काढल्यामुळे मनास एक अध्यात्मिक आधार सापडतो. मनाचा धीर वाढतो. या ठिकाणी योगासने शिकविली जात. नामसाधनाही येथे करता येते. पुष्कळ भगिनींना त्या ठिकाणी मनःशांती मिळते. श्री तुळजाभवानी हिचे सामर्थ्य आपण महाराष्ट्रवासी जाणतोच. पण प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांची ही कुलदेवता आहे. प. पू. श्रीधरस्वामीमहाराजांनी तुळजाभवानीची महापूजा दरवर्षी करावी असे श्रीगुळवणीमहाराजांना सांगितले होते. पू. श्रीदत्तमहाराज दरवर्षी तुळजापूरला जाऊन हिची महापूजा करीत असत. म्हणून आरोग्यधामला त्या शक्तीपीठाचे नाव दिले.

हे प.प. लोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांचेही स्मारक आहे. प. पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराजांनी वासुदेवनिवासमध्ये आपल्याबद्दल कोणतीही गोष्ट राहू नये म्हणून काळजी घेतली होती. मग वामननिवासाला ते कसे हो म्हणाले याचे आश्चर्य वाटत होते . पू. श्रीदत्तमहाराज प. पू. श्रीगुळवणी महाराजांच्या पुण्यतिथी उत्सवाच्या समारोपाच्या भाषणात म्हणाले, 'संतांच्या वागण्याचा उलगडा तात्काळ होत नाही तो योग्यवेळी होत असतो. स्वामी लोकनाथतीर्थांचे नांवे काहीतरी सेवा करण्याचा हेतू श्रीगुरुमहाराजांच्या मनात होता. वामननिवास स्थापन झाला तर त्यामध्ये आपल्याला त्यांचे स्मारक करता येईल असे वाटून त्यांनी वामननिवासाला संमति दिली. हे वामन निवासाच्या अनुमतीने सिद्ध झाले . त्यामुळे आमच्याही मनातील शंका पूर्णपणे दूर झाली. प. प. श्रीलोकनाथतीर्थांचे स्मारक ही प. पू. श्रीगुरुमहाराजांची प्रेरणा आहे,' असे महत्त्वपूर्ण उद्गार पू.श्रीदत्तमहाराजांनी काढले.

त्यामुळेच प.प. लोकनाथतीर्थांचे स्मारक म्हणून त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आरोग्यधाम उघडून आयुर्वेदिक औषधे देऊन आरोग्यसेवा सुरू करण्यात आली आली होती. दि. १-४-१९९३ श्रीरामनवमीच्या शुभमुहुर्तावर तुळजाभवानी आरोग्यधामाच्या आंतररुग्ण विभागाचे उदघाटन पू. श्रीदत्तमहाराजांच्या हस्ते करण्यात आले.

क्रमशः –

****************************************

## ⁎ प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-४६ ⁎

कविश्वरांच्या वास्तुचा जिर्णोद्धार

नरसोबाच्या वाडीलाच पू. श्रीदत्तमहाराजांच्या पिताजींचे घर आहे. या ठिकाणी महाराजांचे आजोबा पू. श्रीवक्रतुंडमहाराज ह्यांनी वास केला होता. वडिल धुंडीराजमहाराज हेही येथे राहिले. हे घर श्रीदत्तमहाराजांचे जन्मस्थान आहे. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज ह्यांची श्रीदत्तमहाराजांच्या बाबतीतील भविष्यवाणी या घरातच उच्चारली गेली. संन्यासी असल्याने अत्यंत कडक सोवळे कधीही कोठेही न जाणारे श्रीवासुदेवानंद स्वामीमहाराज, श्रीदत्तमहाराजांना बघण्यासाठी १० दिवसाच्या आतच ह्या घरात गेले. प. पू. श्रीगुळवणीमहाराज ह्या घरात आलेले आहेत. पू.श्रीदत्तमहाराजांचा जन्म, मुंज, शिक्षण, विवाह या ठिकाणी झाला

आहे. घर जुने झाल्यामुळे तेथे कोणी रहात नसल्याने त्या घराची दुरुस्ती करणे, मंदिराच्या जिर्णोद्वारा इतकेच महत्वाचे काम होते. ते काम देऊळगावराजा येथील लोकांनी पूर्ण केले आहे. श्रीदत्तमहाराज व आईसाहेब ह्यांनी श्रीवक्रतुंडमहाराजांचा फोटो हातात घेऊन गृहप्रवेश केला.

वासुदेव निवासातील अतिरुद्र अनुष्ठान

आश्रमामधे अनेक धार्मिक अनुष्ठाने यज्ञयाग, पारायणे चालू असतात. नामजपाचे सप्ताहही चालतात. अशा या निरनिराळ्या वेदानुष्टानाने आश्रमातील वातावरण नेहमी पवित्र व प्रसन्न असते हा फरक जाणवतो. आपले मन आनंदित होते. साधनाला बसले तर वातावरणातील निरोगीपणामुळे लक्ष चटकन लागते. याला, ही अनुष्ठाने, रोजची यथासांग पूजा, नैवेद्य व धार्मिक अधिष्ठान कारणीभूत आहे. या ठिकाणी मोठे यज्ञ-याग होतात, अनुष्ठाने होत असतात हे सद्गुरूंच्या कृपेचे फळ आहे

अतिरुद्राभिषेक ११ दिवस व नंतर पाच दिवस महारुद्र स्वाहाकार असा फार मोठा धार्मिक कार्यक्रम पार पडला. या अतिरुद्र अनुष्ठानासाठी निरनिराळ्या ठिकाणाहून ऋत्विज आलेले होते.

अतिरुद्र अनुष्ठानाचा तपशील आपल्या सर्वांना माहीत असावा म्हणून खाली देत आहो.

१ लघुरुद्र = १२१ रुद्रावर्तन

११ लघुरुद्र =१३३१ रुद्रावर्तन = एक महारुद्र

११ महारुद्र=१४६४१ रुद्रावर्तने = अतिरुद्र

अकरा दिवसपर्यंत ३५ ब्राह्मण रोज ८ ते १२ हा रुद्राभिषेक करीत असत. प. पू. श्रीगुळवणी महाराजांच्या देवातील प्रसाद पादुकांवर हा अभिषेक होत असे. रोज सायंकाळी गायन प्रवचन, असाही कार्यक्रम ठेवलेला होता. दररोज अन्नदान झाले. इतके सर्व व्यवस्थित पार पडले व पू. श्रीदत्तमहाराजांच्या चित्ताला परम संतोष झाला.

प्रसाद पादुका.

श्रीवासुदेव निवासातील देवघरातील प्रसाद पादुका या प. पू. योगीराज श्रीवामनरावजी गुळवणी महाराजांच्या मातोश्रींना प्रत्यक्ष मिळालेल्या प्रसाद पादुका आहेत. प. पू. श्रीगुरुमहाराजांच्या मातोश्रींची पवित्र स्मृती व पारमार्थिक अधिकार दोन्ही यात सामावलेले आहेत. या सदगुरु म्हणजेच शिवगुरु पादुका आहेत. अनेक वर्षे यांचे काळजीपूर्वक जतन, पूजन, भक्ति हे सर्व प. पू. श्रीगुळवणी महाराजांनी केलेले आहे. नित्य पवमानरुद्र अनुष्ठानपूर्वक पूजा असते, असे सुपुजित झालेले हे देव पाहून पाहणाऱ्याचे मन भक्तीभावनेने फुलून येते.

या प्रसाद पादुका, श्री तुळजाभवानी माता, व सद्गुरु श्री वासुदेवानंद सरस्वती यांच्यासाठीच, प. पू. श्रीदत्तमहाराजांनी पानशेत धरण फुटल्यावर आश्रमाचा संकल्प केला. प. पू. श्रीदत्तमहाराज यांच्या अंतरंगात सदगुरुंचे स्थान किती अढळ आहे, त्याचे महत्व त्यांना किती आहे, हे वेळोवेळी दिसून येते. त्याप्रमाणेच  अतीरुद्र अनुष्ठान त्याच प्रसाद पादुकांवर व्हावे, ही जी  पू. श्रीदत्तमहाराजांची योजना, त्यात त्यांच्या अतीव अशा गुरुभावना आहेतच, त्या पादुकांचे महत्त्व किती आहे, याची कल्पना आपल्यालाही यावी, अशी त्यांची इच्छा होती.

या वेदोक्त व भक्तीयुक्त अशा  अनुष्ठानाने सद्गुरु प्रसन्न झाले आहेत व आशीर्वाद सर्व साधक मंडळींना मिळाला आहे. आपल्या सर्वांवर सद्गुरुमहाराजांचा कृपावर्षाव झाला आहे. पू. श्रीदत्तमहाराजांनी स्वतः हजर राहून, हे पूजन सर्वांच्या कल्याणासाठीच करुन घेतले आहे.

क्रमशः –

******************************************

## * प्रयाग : प.पू.श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचा चरित्रग्रंथ भाग-४७ *

प. पू. श्रीदत्तमहाराजांचा उपदेश

संसारात / व्यवहारात समाधानी असणे चांगले. पण या परमार्थात असमाधान शेवटपर्यंत राहाणे चांगले. श्रीगुरुचरित्रात गोष्ट आहे. दीपक गुरुंची सेवा करीत असतो. त्याला वाटते की मी करतोय ती गुरुंची सेवा कमीच आहे.

आपण जे पहातो ते खरे आकाश नाहीच. खरी पंचमहाभूते फार सूक्ष्म आहेत आणि ध्यान धारणेच्या अभ्यासाने आपली बुद्धी सूक्ष्म झाल्याशिवाय त्यांचे खरे स्वरुप समजणार नाही.

दीपकाने देवाकडे काय मागितले ती ओवी श्रींनी म्हणून दाखवली. त्यात जे मागितले ते किती महत्त्वाचे आहे ते सांगितले.

एकाग्रतेचा / ध्यानाचा अभ्यास झाला म्हणजे बुद्धी सूक्ष्म होते आणि मग त्या बुद्धीला अनाकलनीय असा कोणताच विषय राहात नाही. मन एकाग्र केले की तत्क्षणी कोणत्याही गोष्टीचे ज्ञान होऊ शकते.

ही मनाची एकाग्रता साधनेचा अभ्यास करुनही साधते. शिवाय एरव्हीसुद्धा ध्यान धारणेचा अभ्यास चालू ठेवावा. आपल्या मनाची स्थिरता जास्तीत जास्त साधणे महत्त्वाचे आहे. नुसती प्रवचने वाचून किंवा ऐकून काय उपयोग? त्याप्रमाणे आपण वागले पाहिजे.

आपल्या साधकावस्थेत काहीच बदल झाला नाही, हे आपण कोण ठरविणार? असे म्हणणे म्हणजे आपल्यालाही काहीतरी समजायला लागले, असे म्हणावे लागेल. आपल्यात काही फरक पडलाय की नाही हे सद्गुरु ठरवतील.

पण त्याचबरोबर आपल्या वासना इच्छा कमी कमी होताहेत की नाही, हे आपण जरुर तपासून पहावे, तेवढे आपल्याला समजते. आपल्या हातून जर कर्मानुष्ठान व्यवस्थित घडत असले तर फरक पडलेला आपल्याला जाणवतो.

आपल्या हातून काहीच पुण्यकर्म घडत नाही हे म्हणणे चुकीचे, तसेच फक्त मीच अमुक, तमुक करु शकतो, दुसरे कोणीही तसे करू शकणार नाही, हेही म्हणणे चुकीचे आहे. आपल्याला पुण्यकर्म करीत राहण्याची बुद्धी होणे ही कृपा काय कमी आहे? असे किती तरी लोक आहेत की ज्यांना जरा देखिल पुण्यकर्म करावेसे वाटत नाही.

प्रापंचिक/व्यावाहरिक/सामाजिक व्याप कमी कमी करीत आणून तो वेळ जास्तीत जास्त साधनेला देता येतो. आपली झोप कमी होत नाही म्हणून अडून बसण्याचे कारण नाही. नोकरी धंदा करणाऱ्या माणसांना एकदम तहानभूक कमी करुन कसे चालेल?

शास्त्रवचनांवर विश्वास ठेवून शेवटपर्यंत राहाणे महत्त्वाचे. मोठे महाराज शेवटपर्यंत स्नान, संध्या कर्मे करीत असत. नामस्मरण, देवांची/गुरुंची सेवा/ नवविधा पैकी कोणती ना कोणती तरी भक्ती सतत व्हायला पाहिजे. मनोभंग / वासना क्षय होणे महत्त्वाचे.

साधने व्यतिरिक्त आपले चित्त जास्तीत जास्त आत्मानात्म विचार/चिंतन/सद्ग्रंथ वाचन याकडे लावले पाहिजे, जेणे करून आपलं लक्ष संसारापासून दूर होईल. साधनेत आत्मानात्म विचार सद्गुरुकृपा असेल तर आपोआप येतात आणि तो अभ्यास होतो नाहीतर आपण स्वतः ते तत्वविचार आठवून त्यांचे चिंतन करावे.

सदगुरुंनी उपदेश केला मार्गदर्शन केले तर साधकाची प्रगती लवकर होते.

## कठोरता नको

मुलांना बोलताना आपण अतिशय कठोरपणाने बोलू नये असे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे सांगणे होते. मुले आपल्यावर अवलंबून असतात. ती काहीच बोलू शकत नाहीत. यामुळे आपल्या शब्दांना फार धार येते. आपणही या मुलांच्या भूमिकेतून पूर्वी गेलेलो असतो. पण आपण ते विसरतो. त्यामुळे मुलांची फार केविलवाणी अवस्था असते. वाटेल त्यांनी बोलायचे, अशी परिस्थिती होते. तीच गोष्ट वृद्धांच्या बाबतीत असते. त्यांनाही तुच्छतेने व ऊपहासात्मक वागविण्यात येते. ही गोष्ट चांगली नाही.

## शरीरशास्त्र व मन यांचा विचार

तरुण पिढी म्हणते, सर्वच देवाने निर्माण केले आहे, मग कांदा लसूण खायला काय हरकत आहे? त्याबाबत पू. श्री महाराजांचे विचार लक्ष वेधून घेणारे आहेत-

शरीरशास्त्राचा विचार पूर्वकाली पुष्कळ सूक्ष्म केलेला आहे. शरीर व मन चांगले रहावे आहे अशी इच्छा असेल तर हा केलेला विचार आपण मानला पाहिजे. पूर्वासुरींनी जितका खोल विचार केला आहे, तितका सामान्य स्थूल बुद्धिने विचार करता येणार नाही. हे खायला काय हरकत आहे ,असे आपल्या मनाला वाटते. पण त्याचा परिणाम कसा होईल हे लक्षात येत नाही. अन्नाने मन तयार होते ,मन सात्विक बनायला पाहिजे, चांगले विचार यायला पाहिजेत. आग्रह सुटला पाहिजे . याद्दष्टीने त्यांनी जो विचार केला आपण कुठे करू शकतो.

क्रमशः –

******************************************

## * प्रयाग : प.पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र अंतिम भाग-४८ *

प.पू.ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे संपूर्ण जीवन चरित्र म्हणजे गंगेप्रमाणे पाप, ताप हरण करणारा, मन शुद्ध करणारा जीवन प्रवाहच. या जीवन गाथेचे स्मरण, मनन आणि चिंतन साधकांचे सदैव उन्नयनच करीत राहील आणि त्याला मोक्षमार्गावर पुढे पुढे नेत राहील. आज फाल्गुन शुद्ध चतुर्दशी श्री दत्तमहाराजांच्या पुण्यस्मरणाचा दिवस ! त्यानिमित्त श्रीं चरणी श्रद्धापूर्वक अभिवादन ! गेली ४७ दिवस सुरु असलेल्या चरित्र चिंतन मालिकेचा अंतिम भाग.

सन १९९९ चा हा प्रारंभ. पूजनीय श्री महाराज आणि आईसाहेब दोघांचीही प्रकृती आता क्षीण झालेली. तरीही लोकोद्धाराचे कार्य मात्र तितक्याच जोमाने सुरु होते. १० जानेवारी १९९९ रोजी आईसाहेबांनी अनपेक्षितपणे देह ठेवला. याप्रसंगी श्री दत्तमहाराजांनी त्यांच्या कपाळावर हात ठेवला आणि अत्यंत स्थिरचित्ताने, साक्षीभावाने उदगारले "तब्बल ६८ वर्षांचा सहवास संपला ". सौ आईसाहेबांनी देह ठेवल्यावर श्रीदत्तमहाराजांचे वागणे असंग वृत्तीची आठवण करून देणारे होते.

६ फेब्रुवारी, १९९९ रोजी, माघ वद्य षष्ठी या तिथी प्रमाणे श्रीदत्तमहाराजांचा वाढदिवस होता. श्रीमहाराजांनी नव्वदाव्या वर्षात पदार्पण केले. यानिमित्त श्रीवासुदेव निवास मध्ये सकाळी 'दिगंबरा-दिगंबरा' ची धून झाली. त्या दिवशी संध्याकाळी श्रीमहाराज संध्येसाठी पाटावर येऊन बसले; पण अशक्तपणामुळे संध्या नीट करता येईना. तेंव्हापासून स्नानसंध्या करता येत नाही म्हणून त्यांनी घन आहार घेणे थांबवले. फारच आग्रह झाला तर थोडी पेज, चहा किंवा कॉफीचा एखादा घोट घ्यायचे. आहार नसल्यामुळे देह जरी क्षीण होत गेला, तरीही वृत्ती अंतर्लिन, शांत असायची. १ मार्च १९९९ उजाडला तोच मुळी रेणुकानिवास मध्ये गांभीर्य घेऊन. सकाळी ८ वा. कॉफी पुढे केली, कपातील सर्व कॉफी श्री महाराजांनी प्यायल्याने सगळ्यांनाच बरे वाटले. आणखी थोडी कॉफी आणली त्यातील एक घोट घेतला. स्वतःच्या कपाळावर उजवा हात आडवा धरून, भिंती वरील घड्याळात किती वाजले ? हे पहिले. सकाळचे ८ वाजून २५ मिनिटे झाली होती. श्रीमहाराजांनी डोळे पूर्ण उघडले. स्थिरचित्ताने शांतपणे, तेजस्वी दृष्टीने एकवार सर्वांकडे पहिले. एक श्वास थोड्या अधिक वेगाने आंत ओढून घेतला आणि डोळे मिटले.

अवतार समाप्ती झाली. हि वार्ता वेगाने सर्वत्र पसरली. तो संपूर्ण दिवस आणि रात्र दर्शनासाठी आलेल्यांची रांग काही संपतच नव्हती. 'दिगंबरा' चा नामघोष सतत सुरूच होता. शरीरशास्त्राला अचंबित करणारे असे काही त्या दिवशी पाहायला मिळाले. श्रीदत्तमहाराजांचा  चिन्मय देह तब्बल २४ तास ठेवला असूनही शरीरात कोणतीही विघटनाची प्रक्रिया सुरु झाली नव्हती . उलट देह अधिकाधिक तेजस्वी होत गेला. परब्रह्म स्वयंप्रकाशी असते याचेच प्रतीक असणारी घटना होती.

२ मार्च १९९९ रोजी सकाळी आठ वाजता अंत्ययात्रा निघाली. सजवलेल्या गाडीमध्ये चिन्मय देह ठेवण्यात आला.  श्रीवासुदेव निवास, श्रीवामन निवास येथे उपस्थितांनीं दर्शन घेऊन अंतयात्रा वैकुंठ स्मशान भूमी येथे पोहोचली. सद्गुरूंची लौकिक सोबत आता संपली या विचाराने साधक भक्त यांना शोक अनावर झाला. शास्त्र विधी पूर्वक चंदनाच्या चितेवर त्या सुवर्णकांतीमय  देहाला अखेरचे संस्कार करण्यात आले. 'श्रीदत्तमहाराज' म्हणून  ईश्वराने धारण केलेला 'लीलाविग्रह' तेजामध्ये सामावला.

परंतु प्रज्ञा, प्रतिभा, ज्ञान, भक्ती आणि महायोग यांचे ते सगुण  साकार रूप आजही साधकांच्या हृदयात स्थिर आहे.

प.पू. श्रीदत्त महाराज देहरूपाने आज आपल्यासमोर नसले तरीही त्यांचे 'विचारधन' रूपाने ते सदैव आपल्याला मार्गदर्शन करीतच आहेत.

'उपायवनवसंत', 'निंबार्कदर्शन', 'दत्तवाक् सौरभ', 'दत्तवाक् सुधा',  विचारधन'

या ग्रंथाच्या रूपाने तसेच, श्रीवासुदेव निवास त्रैमासिकांमध्ये सन १९७३ पासून प्रकाशित श्रीमहाराजांचे विद्वत प्रचुर असे लेख, प्रवचने आजही उपलब्ध आहेत.

त्रयस्थ व्यक्तीला सुद्धा कळावे याकरिता चरित्र कथनामध्ये विविध प्रसंगी श्रीवासुदेव निवास गुरुपरंपरा तसेच अन्य परंपरेतील महान सत्पुरुषांच्या पहिल्या नावाचा उल्लेख नाईलाजाने करावा लागला. हा अपराधच आहे, त्याबद्दल श्रींचरणी क्षमाप्रार्थी आहोत 🙏

श्रीमहाराजांच्या परम मंगल चरणी वंदन करून या  चरित्र मालिकेमध्ये  इथेच विश्राम घेऊया !

विद्वत्तेचा महामेरू, कृपा दृष्टीचा सागरू।

घनगंभीर मौनाचा आगरू, ब्रह्मश्री दत्तमहाराज॥

ज्या ज्या स्थळीं मन जाय माझे ।

त्या त्या स्थळीं हे निजरुप तूझे।।

मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी।

तेथे तुझे सद्‌गुरु पाय  दोन्ही ।।

******************************************

***श्रीगुरुचरणारविंदार्पणमस्तु! श्रीगुरुदेवदत्त!!***

******************************************